
ई~ दिवाळी अंक
नोव्हेंबर २०१०
जमिनीवर काढली सुबक रांगोळी
आकाशकंदील खुलवी शोभा सांजवेळी
विचारांना उजाळेल पणतीची झळाळी
हसत खेळत साजरी करुया दिवाळी...
पणती
पणती

## संपादकाच्या लेखणीतून ...

लहानपणापासूनच मला दिवाळी अंकांबद्दल विशेष असं अप्रुप वाटत होतं. दिवाळी अंक वाचणं हा माझा एक छंद होता असे म्हटले तरी चालेल. त्यातील लिखाण, चित्रे, कविता, प्रवासवर्णने मला खुप आवडायचे. जसा जसा मोठा होत गेलो तसं तसं कामाच्या व्यापामुळे म्हणा किंवा इतर काही वैयक्तिक कारणांमुळे दिवाळी अंक वाचण्याचे प्रमाण कमी झाले. मनात वाटत होतं कुठेतरी की आपण सुद्धा एक दिवाळी अंक लिहावा पण प्रिंटींगचा खर्च, आयोजक आणि जहिराती शोधणे, डिसाईनिंगचा खर्च हा एकूणच प्रपंच काही मला जमण्यासारखा नव्हता.पण जिद्द मात्र होती दिवाळी अंक काढायची. मग नक्की करावे तरी काय ? असा विचार मनात आला.आजचे युग हे संगणकप्रधान आहे असे म्हटले तर काही वावगं वाटू नये कोणाला. अगदी लहान मुलांपासुन ते वयोवृद्धांपर्यंत संगणकाचे वेड (क्रेझ) वाढत आहे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे वयोवृद्ध मंडळी तर संगणकातील नवनविन गोष्टी पाहण्यास उत्सुक असतात. बऱ्याच जणांना मी आजपर्यंत संगणक शिकवला आहे मग अगदी त्यात गृहिणींपासून ते वयोवृद्धांपर्यंत, लहानांपासून ते थोरल्यांपर्यंत सगळयांचाच समावेश आहे !

संगणक वापरणाऱ्यांची संख्या आता काही हातावर मोजण्याइतकी राहिलेली नाही. दैनंदिन जीवनात संगणकाचा वापर अनिवार्य झाला आहे असे चित्र तुम्हा आम्हा सगळयांनाच बघयला मिळत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे मराठी माणूसही या क्षेत्रात मागे नाही. मराठी ब्लॉगिंग क्षेत्र कात टाकताना दिसत आहे आणि हे क्षेत्रही मराठी साहित्यात महत्त्वाचे योगदान देताना दिसत आहे. अनेक मराठी संगणक तज्ञ मंडळींनी अटकेपार नावलौकीक कमावला आहे.काही मराठी साईट्स आपली संस्कृती जपण्यासाठी विविध उपक्रम राबवताना मला दिसतात आणि मनाला आनंद मिळतो. आपणही काहीतरी माय मराठीसाठी करावे असे मनापसून वाटत होतं. म्हटलं माझ्या थोड्याफार अवगत संगणकीय ज्ञानाचा उपयोग करून काही करता आले तर फार बरे होईल.त्यातूनच मला ही ई दिवाळी अंकाची संकल्पना सुचली आणि ती त्रित अंमलात आणायचे ठरवले. आता ती कितपत रुचेल आणि आवडेल हे तुम्ही मायबाप वाचक मंडळीच ठरवतील.

आधी मी या ई दिवाळी अंकाचे नाव शब्दांकुर असे ठेवले होते आणि बऱ्याच जणांना ते आवडले देखील होते पण शब्दांकुर म्हणजे नुसते शब्द आले, इतर कलांचा काय असा प्रश्न मला पडला.लिखणाबरोबरच, चित्रकला, हस्तकला या आणि यांसारख्या इतरही काही कला आहेत की ज्यांना विसरून चलणार नाही आणि शब्दांकुर नावाचा वापर म्हणजे मला या इतर कलांवर सपशेल वगळल्यासारखे वाटले आणि मग कलाविष्कार या नावावर मी शिक्कामोर्तब केले. त्या अनुषंगानेच मला मुखपृष्ठ आणी मलपृष्ठाची संकल्पना सुचली.

या ई दिवाळी अंकासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले अशा सर्व लेखक, कवि, चित्रकार, प्रसारक आणि वाचक मंडळी यांचा मी शतशः ऋणी आहे. त्यांचे ऋण शब्दांत फेडणे फारच कठीण आहे तरी त्यांनी केलेल्या उपकारांची कृतज्ञता आणि जणिव म्हणून मला हे नमूद करावेच लागेल.ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांची नावे घ्यायची म्हटली तर खुप मोठी यादी होईल आणि चुकून काही नावे राहिली तर ज्यांची नावे लिहीली नाहीत त्यांना वाईट वाटेल म्हणून नावे घेण्याचे प्रकर्षाने टाळावे लागले. परंतू ज्यांनी स्वत:च्या साईट्स आणि स्वत:चे ब्लॉग्स सांभाळून कलाविष्कारला काहीना काही सहित्यरुपी मदत केली, कलाविष्कराच्या प्रचाराला हातभार लावला त्या माझ्या मित्रमैत्रिणींच्या ब्लॉग्सच्या / साईट्सच्या इमेजेस खाली जोडलेल्या आहेत, त्यावर क्लिक केलेत की त्यांच्या वैयक्तिक ब्लॉग/ साईट्सवर तुम्ही जाल.

हा ई दिवाळी अंक पी डी एफ़ या प्रकारातच काढण्याचे मुख्य कारण म्हणजे, पी डी एफ़ हा फ़ाईल फ़ोरमेट हाताळण्यास अतिशय सोपा आहे आणि पुस्तक प्रकारात असल्या कारणाने तुम्हाला हा कायम स्वरुपी साठवता येतो. ज्यांच्याकडे इंटरनेट कनेक्शन नाही अशांना हे पुस्तक इतर सी. डी, पेनड्राईव्ह, किंवा इतर पोर्टेबल डिवाईसेस च्या माध्यमातून एकमेकांना नक्कीच देता येईल. हा ई दिवाळी अंक आपल्याला ओनलाईदेखील वाचता येईल आणि ऑफ़लाईन देखील !ऑफ़लाईन वाचण्यासाठी तुम्हाला हा ई डिवाळी अंक थेट डाऊनलोड करावा लागेल.

या ई दिवाळी अंकात लेख, कविता, छायाचित्रे, चित्रे, विनोदी कविता, किस्से इत्यादिंचा भरगच्च खजिना असेल याबद्दल शंकाच नाही. हा पहिला अंक असल्यामुळे या अंकात काही त्रुटी नसतीलच असे मी नाही सांगू शकत. या अंकात समाविष्ट लेखक, कवी, चित्रकार, छायाचित्रकार आणि संबंधित मंडळींशी तुम्ही थेट ई मेलद्वारे संपर्क साधू शकता त्यासाठी मी संबंधित लिखाणाच्या शेवटी लेखकाचे नाव दिले आहे, त्यावर तुम्ही क्लिक केले की थेट त्या लेखकाला मेल पाठवू शकता किंवा त्या नावावर / चित्रावर नुसता माऊस पोईंटर ठेवला आणि क्लिक केले नाही तरी संबंधित व्यक्तीचा ई मेल पत्ता तुम्हाला दिसेल (mailto: या अक्षरांपुढे असलेला तो ई मेल पत्ता/ आयडी), तसेच संबंधित चित्रांवर /छायाचित्रावर क्लिक करुनही तुम्हाला त्या चित्रकाराशी /छायाचित्रकाराशी ई मेल द्वारे संपर्क साधता येईल.कलाविष्कारचे पहिले ही साहित्यिक मंडळी आहेत त्यांनी मदत केली नसती तर आज कलाविष्कार तुमच्या समोर आलेच नसते कदचित ! आणि दुसरे कर्तेकरविता तुम्ही मायबप वाचक मंडळी आहात.

या ई दिवाळी अंकात मी अनुक्रमणिका दिलेली नाही, कारण बहुतांश मंडळी साहित्याचे नाव आणि साहित्यिकाचे नाव यावर भर देऊन त्याच साहित्याकडे जास्त वळतात आणि इतर साहित्याच्या पदरी मात्र उपेक्षा राहते असे एकुणच मला दिसुन आले. या ई दिवाळी अंकातील लेखमालामध्ये काही ८ ते १० पानांचे लेख आहेत तर काही अगदी अर्ध्या पानांचे पण प्रत्येक साहित्य वेगळया प्रकारचे आहे. काही ना काही वेगळे आहे त्यात हे नक्की ! कवितांच्या बातीत म्हणाल तर काही ठिकाणी प्रेम कवितांचा वर्षाव आहे पण जे नवोदित कवी आहेत त्यांनी प्रेमावर का होईना कविता केल्यात, कोण जाणे पुढील अंकात हेच कवी इतर विषय ही हाताळतील . म्हणजे मी ही अपेक्षा तरी नक्कीच व्यक्त करतो. पाककृती आल्याच नाही म्हणून त्यांचा समावेश नाही केला. दोन लेख त्यातल्या त्यात विनोदी आहेत, दोन- तीन कविता ही विनोदी आहेत आणि बाकी हसा आणि हसवा मध्ये काही छोटे छोटे विनोद आहेत अगदी हलके फुलके असे. पाककृती आल्याच नाही, कलादर्शनी मध्ये खुपसे चित्रण आणि छायाचित्रण आहे.काही साहित्य वास्तवाची जाण करून देतात तर काही काळीज हळवं करतात.ज्यांना लिखाण Html फ़ॉरमेट मध्ये देणे शक्य नव्हते त्यांनी हाताने लिहुन, स्केन करून, पी डि एफ़ स्वरुपात पाठवले. त्यांनी केलेल्या हे सहकार्य मी कधीच विसरू नाही शिकत.शक्य तितके सगळे साहित्य मी घेतले आहे पण काही राहिले असल्यास क्षमस्व !

ही दिवाळी आपणा सर्वांना स्वस्थ आरोग्याची, भरभराटीची, आनंददायी जावो हिच सदिच्छा ! आणि हो फटाके फोडताना लहान मुले तसेच अबाल वृद्धांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या. शक्यतो कमी आवाजाचे, धूर कमी निर्माण करणारे अथवा धूर न निर्माण करणारे असे फटाके वापरा. आपल्या आनंदाच्या नादात दुसऱ्याचा आनंद हिरावुन घेऊ नका ! आपणही आनंदी रहा आणि इतरांनाही आनंदी ठेवा

कलाविष्कारला आपण वाचक मंडळी भरभरून प्रेम द्याल अशी आशा आहे. तुमच्या प्रतिक्रिया आणि सुचना मला ई मेल द्वारे कळवू शकता. जेणेकरून त्यांचा पुढच्या वर्षीच्या ई दिवाळी अंकात सुधारणा करण्यात मला नक्कीच उपयोग होईल. मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ वगळता इतर पानांवर वरती Header ला कलाविष्कारचा ई मेल आयडी आहे. कलाविष्कार वर माऊस फ़िरवला की तुम्हाला तो दिसेलच

संपर्क:

- प्रथमेश सुरेश शिरसाट (http://www.lekhaankan.co.cc/)

ई-मेल पत्ता :. kalaavishkaar@gmail.com , prathmesh.shirsat@gmail.com

© कलाविष्कार या ई दिवाळी अंकामधील मधील चित्रे, छायाचित्रे,लेख, कविता, इत्यादिंचे सर्व हक्क संबंधित लेखक आणि व्यक्तिंच्या स्वाधीन.

© कलाविष्कार लोगो, मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ याचे सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन.

* या ई दिवाळी अंकात मांडलेल्या विचारांशी आणि मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. *

संपादन, प्रकाशन, मांडणी, मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि डिसाईनिंग

प्रथमेश सुरेश शिरसाट




प्रथमेश शिरसाट आणि शिवगुण डिझाईन यांची संयुक्त कलाकृती

✱ कलाविष्कारचे मित्र ब्लॉग /साईट्स ✱

लेखांकन इथे कलेला किनारा नाही !

बेधुंद मनाच्या लहरींवर

समर्पण एक बहुउद्देशीय संस्था

भविष्याच्या अंतरंगात !!

मराठी मन

मोगरा फुलला

मी मराठी

SHIVGUN DESIGN Designing the Future

धुंद रवीचं बेधुंद जग

माझी दुनिया

# लेखमाला

## समर्थांची लेखन कला

|श्रीराम समर्थ| |जय जय रघुवीर समर्थ|

एक दोन वर्षांपूर्वी मी माझ्या एका गुरुमित्रामुळे समर्थ चरणी दाखल झालो आणि ज्ञानाचे एक नवे विश्व माझ्यासाठी खुले झाले. मनाचे श्लोक तोपर्यंत अडगळीत टाकणारा हा क्षुद्र जंतू तेव्हापासून समर्थांच्या प्रेमात पडला. रामदास ह्या नावातच समाजाला एकत्र आणण्याची आणि योग्य दिशा दाखवण्याची एक अद्भुत शक्ती आहे हे मनापासून पटले. जो मनुष्य राम आणि त्याचे दास ह्यांना एकाच नावात गुंफून जर इतक्या सहजतेने एकत्र आणू शकतो तर त्याला समाजाला एकत्र आणण्यासाठी काय केले पाहिजे ह्याचे निश्चितच उत्तम ज्ञान असले पाहिजे. ग्रंथ शिरोमणी दासबोध वाचताना तर ह्याचा जागोजागी प्रत्यय येतो. पण दासबोध वाचल्यानंतर माझं एक मत मात्र निश्चित झालं की, बाकीचे संत साहित्य हे पेन्शन खाता खाता वाचले तरी चालेल पण पहिल्या पगारापासून पेन्शन खाण्याची वेळ येईपर्यंतचे आयुष्य कसे घालवावे हे उमजण्यासाठी तरुण वयातच दासबोध वाचणे गरजेचे आहे. मूर्खलक्षण, उत्तम लक्षण, स्वगुण परीक्षा आणि दासबोधातील सगळेच दशक हे आयुष्याची प्रत सुधारणाऱ्या वाटेवरच्या अतिशय महत्वाच्या पायऱ्या आहेत. त्यांवरून चालणारा मनुष्य आयुष्याच्या शेवटी "कीर्तीरूपी" उरेल ह्याद शंकाच नाही. आणि अनेक मान्यवर म्हणतात तसे बाकीचे संत साहित्य आणि दासबोध ह्यांच्यात अजून एक भेद असा की बाकीचे संत साहित्य हे निश्चितच महान आहे पण ते तुम्हाला मधुर मार्गाने संसारातून निवृत्तीकडे नेते तर दासबोध अतिशय रोखठोक पद्धतीने संसार करण्यास प्रवृत्त करतो. निवृत्ती आणि प्रवृत्ती मधला फरक येतो तो इथे. रामभक्तीच्या नौकेतून हा भवसागर कसा पार करावा हे अतिशय मोजक्या शब्दांचे खेळ करीत त्यांनी समाजाला सहजतेने शिकवले. बाकी शब्दांचे खेळ करावेत तर समर्थांनीच. वानगीदाखल त्यांनी श्री रामास आळविताना लिहिलेल्या "आरंभी वंदिन अयोध्येचा राजा" ह्या अभंगाचे उदाहरण सादर करतो..

आरंभी वंदिन अयोध्येचा राजा
भक्ताचिया काजा पावतसे

पावतसे महासंकटी निर्वाणी
रामनाम वाणी उच्चारिता

उच्चारिता राम होय पापक्षय
पुण्याचा निश्चय पुण्यभूमी

पुण्यभूमी पुण्यवंतासी आठवे
पापियाना ठवे काही केल्या

काही केल्या तुझे मन पावीजेना
दास म्हणे जन सावधान

वरील अभंगातील ठळक केलेले शब्द वाचताना आपल्या ध्यानात येईल की किती कौशल्याने ही समर्थांनी रचना केली आहे. प्रत्येक दुसऱ्या ओळीतील शेवटचा शब्द हा पुढच्या कडव्यातील पहिल्या ओळीतला पहिला शब्द आहे. त्यामुळे कुठलंही कडवं विसरल्या सारखं जर वाटू लागल तर फक्त शेवटचा शब्द आठवा. पुढची ओळ लगेच आठवेल. तसं पहिलं तर कुठलंही संत साहित्य वाचलं तर आनंद हा मिळतोच पण जर बारकाईने वाचल तर तो आनंद द्विगुणीत होतो. तरी जाता जाता समर्थांकडे एवढेच मागणे मागेन, सदा सर्वदा योग तुझं घडावा| तुझे कारणी देह माझा पडावा||

मकरंद केतकर

ई~ दिवाळी अंक

नोव्हेंबर २०१०

## माझी लुंगी खरेदी - पुण्यातल्या दुकानातुन.....

मी एक नशीबवान माणुस आहे. आयुष्यानी मला सगळं सगळं दिलं. प्रेम करणारी बायको... ऐकुन घेणारी मुलगी.... समजुन घेणारा बॉस..... कौतुक करणारे मित्र... सांभाळुन घेणारे सहकारी..... आदर देणारे शेजारी आणि.....

....आणि अजुन काय हवं आयुष्यात? मी तर ढगातुनच चालायचो. जमिनीवर तरंगायचो.... पण मी हे विसरलो होतो की आपल्याला ढगात अढळपद मिळायला आपण काय ध्रुवबाळ नाही. अर्थात तो ध्रुवबाळ जरी पुण्यात खरेदीला आला असता तरी.... असो.

मला फक्त एक लुंगी घ्यायची होती हो... माझ्या विशेष अपेक्षा, आवड-निवड, निकष असलं काहिही नव्हतं... किती वेळ लागायला हवाय एक लुंगी घ्यायला? १० मिनिटं? मलाही असंच वाटलं होतं. एका दुकानात जायचं, लुंगी मागायची आणि पैसे देऊन यायचे.... १० मिनिटं !

....पण सुमारे १० तास लागले आणि दुकानं.... डझनभर !

...... आणि ह्या भयावह अनुभवानंतर काय घालणार मी ती लुंगी ? ती बघीतली तरी किंचाळत डोंगराकडे पळत जातो मी. मला तर लुंगी-फोबीयाच झालाय.... जर मी तिकडं दक्षिणेत रहायला असतो तर एव्हाना आत्महत्याच केली असती.

मी लुंगी खरेदी करायची म्हणुन आप्त-इष्टांना सोबत येणार का म्हणुन विचारलं तर.... प्रेम करणारी बायको तटस्थ झाली, ऐकुन घेणारी मुलगी बहिरी झाली, समजुन घेणा-या बॉसनी अजुन समजुन घेतलं आणि एक दिवसाची पगारी रजा दिली, कौतुक करणारे मित्र गायब झाले आणि शेजारी अजुन आदरानी पाहायला लागले. मग मी मंगल पांडेसारखा त्या शेकडो दुकानदारांसमोर एकटाच उभा राहिलो...

(मला खात्री आहे की तुम्ही मंगल पांडे हा पिक्चर पुर्ण पाहिला नाहीये. कारण हे वाचायला तुम्ही उरलाच नसता. भोपाळ गॅस दुर्घटनेनंतरची भारतातली सगळ्यात मोठी दुर्घटना होती ती ज्यात लोक बेशुद्ध पडले आणि परत शुद्धीवर आलेच नाहीत !) ..........असो. उगाच विषयांतर नको. ह्याविषयी पुन्हा कधीतरी लिहिन.

.....तर मी खरेदीसाठी एकटाच रस्त्यावर आलो.

दुकान नंबर १
ह्या दुकानात मालक एकटेच कान कोरत बसले होते. मी काहि बोलायला लागणार इतक्यात त्यांचा चेहरा इतका वाकडा व्हायचा की माझं धाडसंच व्हायचं नाही. एकशेतीस ग्रॅम मळ बाहेर काढल्यानंतर त्यांनी हात झटकला आणि पुन्हा खोदकाम चालु केले.
त्यांच्या मागेच खुप सुंदर सुंदर लुंग्या रचुन ठेवल्या होत्या. त्या पैठणीच्या मोहासाठी जसं वहिन्या आदेश बांदेकर भाऊजींचे अनाकलनीय अबोध असे विनोदाचे बाण सहन करायला तयार व्हायच्या, तसं मी सुद्धा त्या लुंग्यांसाठी कानातली घाण सहन करत तिथंच उभं राहिलो.

हाताला रग लागल्यानंतर जसं त्यांनी हात बदलायला घेतला तसं मी पण पवित्रा बदलला आणि दुकानात झेप घेतली.
मी : मालक, लुंगी हवीये.
दुकानदार : दुकानात माणुस नाहीये.
(मग तुम्ही काय बैल आहत काय ?, हा प्रश्न मी गिळला....)
मी : अहो.... हे काय इथेच तर आहेत, तुमच्या मागे... दाखवा ना !

दुकानदार : दाखवायला माणुस नाहीये.
मी : तुम्ही नुसतं समोर ठेवा. मी माझं बघतो.
दुकानदार : काढायला माणुस नाहीये.
मी : मग मी काढु का ?

मी असं म्हंटल्याबरोबर..... त्यांच्या कानातल्या मळापेक्षा घाण, नापसंतीदर्शक, तुच्छ कटाक्ष त्यांनी माझ्याकडे टाकला. ह्यावरुन मला दोन गोष्टी समजल्या.
०१. दुकानात माणुस नाही.
०२. गि-हाईक माणुस नाही.

मी गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर २
पुढच्या दुकानात सगळी माणसं हजर होती. पण जरा विचित्र उभी होती. दोघं जण गालाला गाल लाऊन आणि तिसरा त्यांच्या डोक्याला गाल लाऊन असे बसले-उभे होते. बहुतेक मालक आले नसतील, त्यामुळे सगळे जण कोंडाळं करुन क्रिकेटची कॉमेंट्री ऐकत बसले होते. आणि गालांच्या मध्ये ट्रांझीस्टर होता.

सकाळ-सकाळी कुणी ते क्रिकेट ऐकत, बघत, बोलत असले ना की डोकंच भडकतं माझं ! इंग्रजांनी १५० वर्ष राज्य केल्याचा मला जेवढा राग नाही तेवढा त्यांनी इथे क्रिकेट आणल्याचा आहे. हा एक रिकामटेकड्या नतद्रष्ट लोकांचा दळभद्री खेळ आहे, असं माझं ठाम मत आहे... आधिच माझी क्रिकेटविषयी इतकी तळमळ आणि त्यात कामाच्या वेळेला हि भंकसगिरी.... तरिही मी आत शिरलो.

मी : मला लुंगी हवीय.
दुकानदार : दुकानात मालक नाहीयेत.
मी : मला मालकांची नाही, नविन लुंगी हवीये..... दादा, या इकडे आणि लुंगी दाखवा.
दादा : ---
मी : दादा, लुंगी !
दादा : ---
मी : ओ दादा, जरा लुंगी दाखवा ना !
दादा : दोनच ओवर थांबा. लंच टाईमला देतो.
मी : ओवर म्हणजे काय ? आणि सकाळी १० वाजता लंचटाईम ? लंचटाईमला तुम्ही जेवायला गेल्यावर कशी देणार लुंगी ?
दादा : आमचा नाय हो.... मॅचमधला.
(असं म्हणुन तो, "कशाला येतात मॅचच्यादिवशी येड्यावानी " असं काहीतरी पुटपुटत पुन्हा निघुन गेला.)

माझ्या जीवाचा संताप संताप झाला. मी म्हंटलं की मालकांचा फोन नंबर द्या तर त्या निर्लज्ज माणसानी तो दिला. मी रागारागात फोन फिरवला तर तिथच एकाच्या खिशात वाजला. तो माणुस वेड्यासारखा हसत काय होता... नाचत काय होता.... कपड्यांचा ढिग उडवत काय होता.... (कुणीतरी कुणाला तरी सिक्स मारली तर ह्यांना काय होतं देवालाच ठाऊक...)
मी : उगाच आगाऊपणा करु नका. ह्यांचा नाही मालकांचा नंबर हवाय.
दादा : ह्येच तर आहेत मालक....

मी गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर ०३

सदरच्या दुकानात मी सुमारे २० मिनिटे उभा राहिलो पण माझ्याकडे कुणी ढुंकुनही बघितलं नाही. ह्यावेळात एक भिकारी आला तर दुकानाचे मालक "ए हाड...." असं जोरात ओरडले....

तो भिकारी आणि मी..... गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर ०४

थोडा वेळ बाजारात फेरफटका मारल्यानंतर एका दुकानात मालकच्या जागेवर मालक आणि सेवक असे दोन्ही वर्ग होते. पण गि-हाईकं नव्हती. मी आनंदाने आत शिरलो.

मी : मालक, मला लुंगी हवीये.
मालक : (माझ्यातुन आरपार बघत त्यांच्या माणसांना) .....ह्यांना लुंगी दाखवा.

मला बघुन एकजण कपड्यांच्या ढिगाखाली घुसला... दुसरा माळ्यावर चढला... तिसरा न आलेला फोन उचलुन बाहेर गेला. पण एकजण गुटखा खाण्यात मग्न असल्याने बरोब्बर जाळ्यात 'घावला'.

मी : नमस्कार. मला लुंगी हवीये.
तो : सॉएब.... टोमाला पोण ऑट्टाच्चाच टॉयम घावोला कारॉव यॉयला... बॉल्लाआट्ता....
मी : तुम्ही जरा तो गुटखा थुंकुन येता का ? मी तुम्हाला नविन घेउन देईन.... (ते त्याचे माझ्या हाता-तोंडाशी आलेले 'तुषारंचे वैभव' पुसत मी म्हणालो.)
तो तिथच पलिकडे 'थुकुन' आणि तिथल्याच एका कापडाला तोंड पुसुन म्हणाला,
तो : बोला साहेब...
मी : मला लुंगी हवीये. एकदम ट्रॅडीशनल हवीये. पांढरी...किंवा लाईट रंगाची. चेक्स किंवा लाईनींग असलेली...
तो : अशी कुणी वापरत नाही साहेब आता.... नविन फॅशनची घ्या...
मी : मला तशीच हवीये... नाहीये का ?
तो : होती... पण मी आत्ताच त्याला तोंड पुसलं राव.... कुणी घेत नाही अशी, खुप दिवस पडली होती म्हणुन....
मी : ठिक आहे. दाखवा आहेत त्या....
सेल्समन : ही बघा... एकदम लेटस्ट डिझाईन.... अजुन बाजारात असा प्रकार यायचाय... (असं म्हणुन त्यानी मला प्लेन हिरवी लुंगी दाखवली.)
मी : कुठाय डिझाईन ?
सेल्समन : डिझाईन सोडा... रंग बघा साहेब... मोराकडे पण असा हिरवा रंग मिळायचा नाही. एकदम फ्रेश... बाहेर पडलात तर वळुन वळुन पाहाणार लोकं....
(एक तर मी मोराशी कसलिही स्पर्धा करणार नव्हतो आणि लोकांनी वळुन वळुन बघायला मी काय ऑफिसला घालुन जाणार होतो काय.....?)

मी : पण हा हिरवा रंग जरा अंगावर येतोय हो....
सेल्समन : रंगाचं सोडा. कापड बघा साहेब.... एकदम हलकं... लुंगी घातलीये का नाही ते पण कळणार नाही...
मी : ------ !!!! ????
सेल्समन : हात तर लाऊन बघा साहेब.... एकदम ढाक्क्याची मलमल....
मी : हं, मऊ आहे पण किती ट्रान्सफरंट आहे. चुकुन बाहेर गेलो तर लोक वळुन वळुन बघतील. जरा दुसरा प्रकार दाखवा ना...
सेल्समन : ह्याच प्रकारात हिरव्याच्या ऐवजी गुलाबी रंग दाखवु.... ?
मी : गुलाबी ?? छे... काहितरी दुसरं दाखवा ना....
सेल्समन : ........... हे बघा साहेब... एकदम कडक प्रकार.... मार्केटमध्ये कुठही दाखवा असा आयटम आणि फुकट घेउन जा हा..... एकदम लेटस्ट डिझाईन....

ह्यावरही काही डिझाईन नव्हतं त्यामुळे मी डिझाईनचं सोडुन रंग पाहायला लागलो.... छान होता रंग...

हलकासा निळा त्यावर पांढ-या रेषा... पण एकदम कडक प्रकार होता... म्हणजे ते मणिपुरी का कुठल्या नृत्य प्रकारात ते चटया घालुन नाचतात ना तसं वाटायला लागलं....

मी : अजुन काय असेल तर दाखवा ना... नाही आवडलं हे पण....
(खरं तर त्यानी मला दोनच प्रकार दाखवले होते पण त्याचा चेहरा मी 'त्याचा मानसिक छळ करुन अदखलपात्र गुन्हा करतोय' असा झाला.)

सेल्समन : हे घ्या... हे सोडुन काहिच नाही आपल्याकडे... एकदम लेटेस्ट डिझाईन आणि रंग.... (असं म्हणुन त्यानी एक लुंगी टेबलावर आपटली.) खरंच एकदम लेटेस्ट डिझाईन आणि रंग... मी तरी कुठे पाहिला नव्हता.... काय वर्णन करु त्या लुंगीचं...
' आम्रखंडात शेजवान नुडल्स मिसळुन ते मिश्रण पालकाच्या गर्द हिरव्या पातळ भाजीत बुडवुन खाऊन पिवळया कापडावर जर एखादं आजारी मांजर ओकलं ' तर कसं दिसेल, अशा डिझाईन आणि रंगाची ती लुंगी होती.

मी ती पहिली हिरवी लुंगी घेउन त्याला अस्तर लावुन घ्यावं असा विचार करायला लागलो. त्याला किंमत विचारली तर २७० रुपये म्हणाला. ती उभी चटई १९५ रुपायाची होती. माझा चेहरा पाहुन त्याला काय कळायचं ते कळालं....
सेल्समन : " घ्यायची नाही तर बघायची कशाला... परवडत नाही तर...........

मी गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर ५
आता बराच वेळ झाला होता आणि माझी लुंगी खरेदी अजुन तशीच राहिली होती. एका दुकानात शिरलो तर तिथला माणुस म्हणाला की १ वाजलाय.
मी : मग ?
तो : काय नविन आहात काय पुण्यात ?
मी : काय संबंध ?
तो : हे विचारताय म्हणजे नविन आहात. १ वाजता आमचं दुकान बंद होतं. ४ ला परत उघडतं.
मी : का ?
तो : आम्ही माणसं आहोत. आम्हाला जेवायला लागतं.
मी : तीन तास ?
तो : वामकुक्षी.......
मी : दुपारच्या वेळेला ?
-------(एक हिडीस हास्य) ---------
मी : म्हणजे कामाच्या वेळेला ?
तो : कुणाचं काम ?
मी : कुणाचं म्हणजे ? आमचं !
तो : मग तुम्ही नका झोपु... आम्ही झोपणार...
मी : पण आमचं काम तुमच्याकडे आहे. ते तुमचं पण कामच आहे ना....
तो : असं कोण म्हणतं.... ?
मी : मी...! तुमचं गि-हाईक....
तो : हे कुणी ठरवलं ? समजा तुम्हाला चक्का हवाय तर तुम्ही माझं गि-हाईक कसं...
मी : एक मिनिट.. चक्क घ्यायला मी तुमच्याकडे का येईन ? इथे येउन मी चक्का का मागेन ?
तो : मागितलात तरी मिळणार नाही.
मी : अरेच्चा... कापडाच्या दुकानात येउन चक्का मागायला मी काय वेडा आहे का ?
तो : ते मी कसं सांगु शकेन ?
मी : विषय बदलु नकात. माझा मुद्दा असा आहे की आमचं काम तुमच्याकडे आहे आणि ते तुमचं पण कामच

आहेच.
तो : तर मग आमचा मुद्दा असा आहे की आमची कामं आम्ही आम्हाला हवं त्या वेळात करतो. १ ते ४ नाही म्हणजे नाही.

त्याच्याशी बोलणं अशक्य आहे असं वाटत असतानाच माझं घड्याळात लक्ष गेलं तर १२.५५ झाले होते.
मी : पण घड्याळात बघा... एकला अजुन ५ मिनिटं बाकी आहेत.
तो : तुमचं घड्याळ ५ मिनिटं मागे असेल.
मी : पण तुमच्याही भिंतीवरच्या घड्याळात १२.५५ झालेत.

त्या नालायक माणसानी, काच नसलेल्या त्या घड्याळात बोट घालुन काटे फिरवले आणि १२.५५ चा ०१.०० केला आणि म्हणाला ०१.०० वाजला, तुमच्या घड्याळातल्या ३.५५ ला या....

मी गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर ६ व ७
एक नंतरही चालु असलेलं दुकान शोधता शोधता बराच वेळ गेला. पण शेवटी मी एक होजीअरीचं दुकान शोधलंच. ह्यावेळेस मी ठरवलं होतं की मिळेल त्या रंगाची, डिझाईनची, किमतीची लुंगी घ्यायचीच.

मी : मालक, लुंगी मिळेल का ?
होजीअरीन : काय राव तुम्ही ? होजीअरी मध्ये येऊन लुंगी मिळेल का म्हणुन विचारताय ? एक वेळ चेन्नईमध्ये मिळणार नाही पण इथे मिळणारच.... हॅ...हॅ...हॅ... !
( मी त्याच्या बरोबर त्या जोकवर हसण्याच्या मनःस्थितीत नव्हतो.)
मी : ....नाही दिड वाजतोय म्हणुन विचारलं.
होजीअरीन : मग? दिड वाजता लुंगी विकल्यानी काय अपशकुन होतो का ? हॅ...हॅ...हॅ... !
मी : नाही... बहुतक लोकांचं दुकान १ वाजता बंद होतं. ४ ला परत उघडतं.
होजीअरीन : आम्ही धंदा करायला आलोय झोपा काढायला नाही. हॅ...हॅ...हॅ... !
मी : व्वा.... मग एक लुंगी द्या.
होजीअरीन : कसली पाहिजे ? (इथे तो हसला नाही. म्हणजे त्याला न हसता बोलता येत होतं)
मी : कसलीही द्या.
होजीअरीन : रंग ?
मी : कुठलाही चालेल.
होजीअरीन : चेक्स चालेल ?
मी : पळेल.
होजीअरीन : लुंगी घालुन पळु नका पडाल.... हॅ...हॅ...हॅ...
मी :द्या २ लुंग्या.
होजीअरीन : ठिक आहे. पण इथे नाहीये.
मी : अहो, आत्ता तर म्हणालात की होजीअरी मध्ये येऊन लुंगी मिळेल का म्हणुन काय विचारताय....
होजीअरीन : म्हणजे ह्या दुकानात नाही आमच्या त्या बाजुच्या दुकानात लुंग्या ठेवतो. इथे फक्त बनियन, अंडरवेअर आणि शेरवानी ठेवतो. लुंग्या तिकडे... तुमचा साईज काय आहे ?
मी : लुंगीचा ?
होजीअरीन : अंडरवेअर-बनियनचा...(हॅ...हॅ...हॅ...) ....आलाय तर घ्या दोन जोडी....
मी : नाही, नको. आधि लुंगी घेतो.
होजीअरीन : आधि लुंगी कशी ? आधि अंडरवेअर-बनियन मग लुंगी. बाहेरुन अंडरवेअर घालायला आपण काय सुपरमॅन नाही. हॅ...हॅ...हॅ... हॅ...हॅ...हॅ... हॅ...हॅ...हॅ... हॅ...हॅ...हॅ...
मी : कुठय तुमचं बाजुचं दुकान... ?
होजीअरीन : बारक्या, ह्यांना आपल्या शेजारच्या दुकानात टाकुन ये....

दुकानदारांचं 'टाकुन बोलणं' नेहमीचंच पण हे 'टाकुन येणं' जरा नविनच होतं. बारक्या आणि मी त्या बाजुच्याच दुकानाकडे सुमारे १५ मिनिटं चालत राहिलो आणि जाता जाता कुठल्यातरी बारीक बोळात बारकु महाराज अंतर्धान पावले. त्या सातव्या दुकानापर्यंत मी पोहचु शकलो नाही. मग पुन्हा परत ह्याच दुकानात आलो तर शटर डाऊन...
त्यावर लिहलं होतं... दुपारी ०१.३० ते ०५.३० बंद ! (हॅं...हॅं...हॅं... हॅं...हॅं...हॅं... हॅं...हॅं...हॅं...)

ह्यावेळेस मी गुपचुप दुकानाबाहेरच होतो.

दुकान नंबर ०८

भुकेल्या पोटी तहानेने व्याकुळ झालेलो लुंग्याधिर असा तो मी ४ वाजेपर्यंत वणवण भटकत राहिलो. एक बरं आहे की आशा नेहमी अनुभवावर मात करते त्यामुळे आयुष्य थांबत नाही. मी पण न थांबता पुढच्या दुकानासमोर मानसिक तयारी करत उभा राहिलो. मी माझे तोंड उघडायच्या आतच दुकानातुन एक हाक आली.....

"बोला मालक...."

(.....तुम्हाला सांगतो टचकन डोळ्यात पाणी आलं माझ्या. ते दस्तुरखुद्द दुकानाचे मालक आणि मी एक क्षुद्र गि-हाईक.... माझी पायरी ओळखुन मी त्यांच्या दुकानाची पायरीही चढलो नव्हतो.... ते स्वतः आणि आपण स्वतःहुनच मला हाक मारताहेत...? मला बोलावताहेत, काय हवय ते विचारताहेत....? मला मालक म्हणताहेत...? खुप गहिवरुनच गेलो हो मी.... काय बोलावं सुचेनाच.
मग मी ते मायेचे दोन शब्द कानात भरुन घेतले, ते हर्षोन्मादाचे कढ आवरले, खिशातुन रुमाल काढला आणि डोळे पुसुन आत गेलो.)

दुकानदार : बोला मालक....
मी : मला लुंगी हवीये.
दुकानदार : वर बांधणार का खाली ?

(मी अवाक. वर का खाली म्हणजे काय ? त्यांना कंबरेच्यावर... ढेरीच्याखाली.. असं काही उत्तर अपेक्षित होतं का काय ? किंवा ते आपल्यात मुंजीमध्ये बटु बांधतो तसं मागुन पुढे आणि मग क्रॉस करुन परत मागे नेऊन मानेमागे गाठ असं लुंगी बांधण्याची काहीतरी फॅशन वगैरे आली असणार. पण माझ्या संपुर्ण देहाचा घेर पाहता किमान पावणेदोन तरी लुंग्या लागणार आणि वर आरशात मीच मला दिसायची भिती....)

मी : नाही, वर नाही.... मी खालीच बांधेन... नेहमीसारखी... साडीसारखी गोल गोल.... पण वरती पदर वगैरे घेणार नाही.
दुकानदार : मग खाली मोठ्ठी झालर देऊ का... ब्राईट निळ्याला खाली केशरी रेंगाची ? आणि चंदेरी रंगाची पट्टी असेल एकदम बारीक खाली....
(मी पुन्हा आवाक. एक तर ब्राईट निळी लुंगी... त्यात त्याला मोठ्ठी झालर...त्यात ती केशरी रंगाची ?? चेंदेरी पट्टी ??? मला ओळखणारी आसपासची २६४ माणसं मला बघुन लोळुन लोळुन हसताहेत, असं मला दिसायला लागलं.)

मी : नाही हो... असलं काही नको. एकदम साधी. पांढरी आणि सोबत बरा रंग.. चेक्स वगैरे दाखवा किंवा...
दुकानदार : चालेल आणि एक काम करु... .
(तो महान इसम मला काय हवंय हे न ऐकताच चालुच झाला होता....)
एक काम करु.... ....खालुन चुण्या घेऊन घट्ट बांधु आणि वर ओपनच ठेऊ... असा व्ही शेप....

(मी वच्याक... मला पुन्हा ते भयानक दृश्य दिसायला लागलं.... माझ्या पायाला खालुन लुंगी घट्ट बांधली आहे आणि वरुन ओपनच आहे. पण पडु नये म्हणुन मी दोन टोकं धरुन उभा आहे. पाऊस पडतोय आणि 'दिनवाणा मी' लुंगीत गारा वेचतोय.............)

केवीलवाणा मी : मालक तुम्ही फक्त लुंगी दाखवा. ती कशी बांधायची मी बघेन....
दुकानदार : दिवसा का रात्री ?
रडवेला मी : तुम्ही फक्त लुंगी दाखवा. ती कधी बांधायची मी बघेन मालक....
दुकानदार : तुमच्यासाठीच का पावण्यांसाठी ?
हताश मी : तुम्ही फक्त लुंगी दाखवा हो प्लीज.
दुकानदार : बर किती दिवस ठेवणार ?
निराश मी : अहो... तुम्ही लुंगी दाखवा ना प्लीज. मला दोन लुंग्या हव्यात. माझ्यासाठीच. रात्री घालायला. किती दिवस ठेवणार, ह्याच काय उत्तर देऊ मालक ?.... फाटेपर्यंत ठेवेन... म्हणजे जवळ ठेवेन. अंगावरुन रोज सकाळी काढणार..... तुम्ही लुंगी दाखवा ना प्लीज.
दुकानदार : बर.. ठिक आहे. तुमचं नशिब जोरावर आहे राव. आजच नविन माल आलाय. तिनंच लोकांनी वापरलाय... जवळजवळ ब्रँड न्यु !!
(जवळजवळ ब्रँड न्यु.... हे शब्द कानात घुमायला लागले. माझीच लुंगी आधि वापरलेले तुळु, पंजाबी आणि मद्रासी असे पुर्ण, अर्ध्या आणि पाव लुंगीतले तीन जण मला दिसायला लागले.) मी त्या दुकानातुन बाहेर पडणार इतक्यात.... शक्य तितक्या हिडीस आवाजात मालक हंबरले...
मालक : ए सोपान्या.... गि-हाईक बघ....

गि-हाईक बघ................? गि-हाईक बघ म्हणजे मग इतका वेळ काय चाललं होतं ? हा प्रश्न मला पडणार इतक्यात मालकांनी कानाचा ब्लु-टुथ काढला आणि फोन बंद केला.... ! ते ब्राईट निळी, खालुन चुण्या, किती दिवस ठेवणार हे सगळं दुस-याच कोणाला तरी होतं.... मी गुपचुप सोपानरावांसमोर झोळी पसरुन उभा राहिलो....

सोपानराव : हं.... ?
मी : मला लुंगी हवीये.
सोपानराव : असले लुगेसुंगे आयटम आमी इकत न्हाइ.
मी : ??
सोपानराव : चष्म्याचं दुकान सम्होर आहे.
मी : ????
सोपानराव : आम्ही निस्त मंडपाचं कापड, ड्येकोरशन, मांडव असले आयटम इकतो.
मी : अहो पण, बाहेर तर तुम्ही त्या बोर्डावर एका लुंगी घातलेल्या माणसाचं चित्र लावलय.
सोपानराव : हा मंग... आमचे मोठ्ठे मालक हेत ते... अन शेजारच्या रेनकोट-छत्रीच्या दुकानावर एका साधु म्हाराजांचा फोटु लावलाय म्हनजे त्यांनी काय लंगोट इकायचे काय ?

त्या अशुद्ध माणसाच्या तर्कशुद्ध बोलण्यानी बेशुद्ध होऊन.... मी गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर ९
मी दिसेल त्या दुकानात डोकाऊन समोरचा माणुस माझा किती अपमान करेल ह्याचा अंदाज घेत हिंडत होतो. इतक्यात एका दुकानात मला एक मारवाडी भाभी बसलेल्या दिसल्या. मी आत शिरलो.

मी: भाभी, मला एक लुंगी हवीये.
तर एकदम.... आगीचा बंब जाताना जसा ठणठणाट होतो तसाच पण जरा जास्तच गंजलेल्या घंटेचा असा बसका आवाज झाला. मी इकडे तिकडे पाहिलं तर ती गाडी दिसलीच नाही. मग कळालं की भाभी बोलताहेत.

भाभी : थे एमएसईबीरो बील देवाने आया हो काई.... ?
(माझी भंबेरी उडाली. जिथं मी हिंदीचीच चिंधी करतो तिथं ही बया तर मारवाडी का राजस्थानी बोलत होती.)

मी : हिंदी बोलेंगे क्या ? गुजराती, राजस्थानी मेरे पल्लु नही पडती....
भाभी : (तिनी एक राजस्थानी कलाकुसर केलेली साडी हातात ठेवली आणि म्हणाली...) गुजराथनी साडीमाटे राजास्थानरी कलाकुसरकराडा पल्लु !
मी : आपका कुच गैसमज होगयला हय.. मेरे को घरमे डालने के लिये एक, दो लुंग्या चाहिये थ्या....

ती आत गेली आणि सतरंज्या घेउन आली. मग आम्ही दोघं 'डम्ब-शरात्स' खेळायला लागलो. मी तिला खाणाखुणा करुन सांगायला लागलो की असं पोटाभोवती बांधायचं, कंबरेइतक्या उंचीचं असं... वगैरे...
चनीयाचोळी, सिलेंडर, केरसुणी, छत्री, पोतं असे वेगवेगळे ट्राय मारल्यानंतर ती मान हलवत 'ह्यां ह्यां ह्यां' असं रेकत दुकानाबाहेर गेली आणि १० मिनिटांनी शेजारच्या दुकानातुन माझ्या कंबरेच्या उंचीचा पाणी साठवायचा प्लॅस्टीकचा ड्रम घेउन आली.

मी खचलोच. मला पडलेले यक्षप्रश्न असे -
१. मला पाणी साठवायचा प्लॅस्टीकचा ड्रम हवा जरी असता तरी मी कपड्यांच्या दुकानात का येईन ?
२. कपड्यांच्या दुकानात आलोच तर माझ्या पोटाकडे हात दाखवुन ड्रम का मागेन ?
३. मी चेह-यावरुन एमएसईबीचं बील द्यायला आलोय, असं वाटतं का ?
४. काही बायकांचे आवाज पुरषांसारखे का असतात.... ?
५. काही पुरुष मंडळी, मराठी किंवा हिंदी न येणा-या बायकांना दुकानावर का बसवतात ?

अनुत्तरीत मी : भाभी, आपका मिस्टर बाहेर गया है क्या..? ये दुकान मे कोई दुसरा मर्द वगैरा नही है क्या..? आप अकेले हो क्या ?

तिनी त्याचा काय अर्थ काढला काय माहित पण तिनी कोणलातरी फोन केला. अचानक तिचा नवरा आला आणि तिनी त्याला काहितरी कळवळुन सांगितलं. तो गरगरीत मारवाडी माझ्याकडे जळजळीत नजरेनी पाहायला लागला. ते तप्त वारं माझ्या दिशेनं वाहतय हे पाहुन मी......

....मी गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर १०
आता बास झालं असा विचार करुन घरी जाणार होतो पण इतक्या अपमानानंतर मी साधि लुंगी घेऊ शकलो नाही हा अपमान मला सहनच होईना. सहज घड्याळात पाहिलं तर ०३.५५ वाजुन बराच वेळ झाला होता म्हणजे त्या दुकान नं ५ मधल्या 'माणसा'ची वामकुक्षी झाली असणार.

खरं तर ते दुकान खुप लांब होतं पण मी डगमगलो नाही. डोळे फिरलेले पण नजर शाबुत, डोकं फिरलेलं पण विचार काबुत.... पाय बोंबलत होते पण दुकान बोलावत होतं... अंग ठणकत होतं पण ध्येय खुणवत होतं.... शेवटी मी त्या दुकानात पोहचलोच...

मी हश्श हुश्श करत तिथल्या एका स्टूलवर बसलो. खुप घामाघुम झालो होतो म्हणुन त्या वाद घालणा-या इसमाला पंखा लावायला सांगितला तर म्हणाला की आम्ही संध्याकाळी ५ नंतर पंखा लावत नाही. मी कारण विचारलं नाही, वादही घातला नाही. चुकुन मिळालंच तर बघावं म्हणुन पाणी मागितलं...

मी : जरा पाणी मिळेल का ?
तो : ए छोटु... जरा दोन स्पेशल कोकम सरबत घेऊन ये. (म्हणजे पाणी पण मिळणार नव्हतं तर...)
मी : आता तरी दुकान उघडं आहे का ?

तो : हे तुम्ही बाहेरुन विचारलं असतं तर 'हो' म्हणालो असतो, पण तुम्ही आत बसुन विचारता आहात. हे म्हणजे..
मी : मी तुमची माफी मागतो ह्या प्रश्नासाठी. पण मला लुंगी हवीये. दाखवता का ?
तो : आम्ही तयार कपडे विकत नाही. फक्त कापड विकतो. लुंगीच कापड देऊ शकलो असतो पण त्याची किरकोळ विक्री आपण करत नाही. तागाच्या तागा तुम्हाला घ्यायला लागेल.
मी : मला काय सगळ्या सोसायटीला लुंग्या वाटायच्या नाहीयेत. आणि हे सांगितलं का नाही मला ?
तो : मग मी हे काय करतोय असं तुम्हाला वाटतय ?
मी : म्हणजे मगाशी का नाही सांगितलंत ?
तो : कधी ?
मी : मी आलो होतो तेंव्हा. १२.३० ला...
तो : तुम्ही ०१.०० वाजता आला होता !
मी : हं... तेच ते... तेंव्हा का नाही सांगितलंत ?
तो : कारण तेंव्हा तुम्ही माझं गि-हाईक नव्हता. दिसेल त्याला "आम्ही तयार कपडे विकत नाही. फक्त कापड विकतो." असं सांगत बसायचं का आम्ही ?
मी : दिसेल त्याला नाही पण निदान जो दुकानात येईल त्याला तरी ?
तो : मग सांगितलं की तुम्हाला आत्ता...
मी : आत्ता नाही हो... तेंव्हा...
तो : तेंव्हा ०१.०० वाजला होता...

मी गर्भगळीत होऊन बसुन राहिलो. मी पुन्हा एकदा वादविवादात हरलो होतो. पुन्हा एकदा पदरी निराशाच पडली होती. इतक्यात छोटु दोन कोकम सरबत घेऊन आला. मग त्या दोघांनी सरबत पिलं आणि....

...आणि मी गुपचुप दुकानाबाहेर पडलो.

दुकान नंबर ११
थोडा वेळ शांत डोळे मिटुन बसलो एका दुकाना बाहेर. मग उठलो आणि नविन जोमाने लुंगी शोधायला लागलो. शेवटी मला ते दुकान सापडलंच. तिथे लुंग्यांचा एक वेगळा सेक्शन होता. मी जाऊन उभा राहिलो तर त्या सेल्समनने मला तिन वेगवेगळ्या रंगांच्या, त्यातल्या प्रत्येकातल्या वेगवेगळ्या तीन डिझाईन्सच्या आणि त्यात वेगवेगळ्या तीन किमतीच्या अशा सुमारे २६-२७ लुंग्या दाखवल्या.
मला २ पसंत पडल्या आणि मी भाव विचारला तर तो म्हणाला की.....
"नववर्षाची सूट वजा करुन दोन लुंग्यांचे ९० रुपये." मी आनंदाने नाचुन पाकीटातुन ९० रुपये काढुन त्या दुकानदाराला दिले तर.....
......तर त्याच्या डोळ्यात पाणी ! मग तो भिकारी मला म्हणाला की "देव, तुमचं भलं करो. आज काल कोण देतय ९० रुपयांची भीक ? "
मी खडबडुन जागा झालो. अजुनही त्याच दुकानाबाहेर होतो. पण खुप उशीर झाला होता. फाटकी का होईना पण तो लुंगी घातलेला भिकारी दूर गेला होता.... माझे ९० रुपये घेऊन.

स्वप्न फुकट असतात हि गोष्ट आज खोटी निघाली. पैसे गेल्याचं दुःख नव्हतं, लुंगी मिळाली नाही ह्याचा त्रास होत होता. आता एक शेवटचं दुकान बघायचं, नाहीतर 'ते' करायचंच असं ठरवलं.... त्यात खुप मोठी रिस्क होतीच पण आता प्रश्न इभ्रतीचा होता......

दुकान नंबर १२
मी रस्त्याच्या ह्या बाजुला होतो. ते कपड्यांचं शेवटचं दुकान त्या बाजुला होतं. मध्ये रस्ता आणि रस्त्यावर गाड्यांची, विक्रेत्यांची आणि माणसांची तुफान गर्दी... घड्याळात पावणेनऊ झाले होते म्हणजे अजुन १५ मिनिटांनी ते सगळे 'माणुस' असल्यामुळे जेवायला, झोपायला जाणार....

मी विजय दिनानाथ चौहानसारखं 'अग्निपथ अग्निपथ' असं म्हणत त्या प्रवाहाच्या विरुद्ध पोहत शेवटी त्या दुकानापर्यंत पोहचलोच. तिथंच त्या दुकानाबाहेर पदपथावरुन त्या जोखमीच्या पण खुप कामाच्या वस्तुची खरेदी करुन आत शिरलो.

आयुष्याविषयी कमालीची विरक्ती वाटावी असे सगळयांचे चेहरे होते. कुणीही माझी दखल घ्यायला तयार नव्हते. मी आत गेलो. एकच प्रयत्न करावा आणि मगच 'ते' करावं असा विचार करुन काऊंटरवर जाऊन उभा राहिलो....

मी : मला लुंगी हवीये.
माणुस : उद्या या... आजची वेळ संपलीये.
मी : अहो पण ०८.५० झालेत आणि अजुन १० मिनिटं आहेत.
माणुस : हो... पण तो वेळ ह्या कपड्यांच्या घड्या घालायला लागतो. तुम्ही मदत केलीत तर ३ मिनिटात होईल आणि मग ७ मिनिटं उरतील.

मी घड्या घालायला घेतल्या. किती वेळ घालत होतो कुणास ठाउक पण तो माणुस म्हणाला, आता बास करा. ०९.०० वाजले. बाकीच्या घड्या उद्या करु.

आता मात्र माझी सहनशक्ती संपली. माझ्या संतापाचा ज्वालामुखी फुटला आणि मी तांडव करत माझे तिसरे नेत्र उघडले. 'ते' करण्याची वेळ आलीच होती.... रौद्रावतारात नृत्य करत मी दुकानाचे शटर खाली ओढले आणि नुकताच विकत घेतलेली ती जोखमीची पण खुप कामाची वस्तु बाहेर काढली.

....................तो एक कोयता होता...!

चटकन उडी मारुन मी काऊंटरच्या पलिकडे गेलो आणि तो कोयता मालकांच्या मानेवर ठेवला.... आणि गरजलो...

" हरामखोरांनो.... किती छळणार रे नराधमांनो...? बास आता... खुप झालं. गुपचुप एका रांगेत कान धरुन उभं रहा नाहीतर तुमच्या मालकाचा गळा कापुन ठेवेन. मालक, खबरदार जर पैसे बाहेर काढाल तर... आत टाका सगळे पैसे नाहीतर हिशोबाची वही फाडुन टाकीन तुमची..."

(मग मालकाला एक गुद्दा घालुन त्यालाही त्या कामगारात उभा केला. अजुन माझा राग शांत झाला नव्हता...)

" काय समजता तुम्ही मला.... ? एमएसईबीची बीलं वाटणारा शिपाई ? नालायकांनो... गि-हाईक म्हणजे मातापिता. पण त्यांच्यासमोर एकेकटे कोकम पिता तुम्ही ? १ नंतर दुकान बंद ठेवता.... ५ नंतर पंखा बंद ठेवता होय.... एका लुंगीसाठी १२-१२ दुकानं फिरवता काय मला ? १२ उठाबशा काढा आणि स्वतःभोवती १२ वेळा फिरा...."

(कोयत्याच्या भितीनी कामगारांनी पटापटा तसं केलंही पण मालकांना एकही उठाबशी निट काढता येईना.. म्हणुन शेवटच्या ९ उठाबश्यांना मी सूट दिली आणि फे-या वाढवल्या.. अर्थात त्यानंतर सगळे पडलेच होते. पण मी उभाच होतो... त्वेषात... जोशात...)

" गलिच्छ माणसांनो... तुमच्या जन्माच्या वेळेस त्या नर्सनी आंघोळ घातल्यानंतर कधी कान धुतला होता का नाही तुम्ही? त्या तुमच्या घाणेंद्रियात गोम कशी घुसत नाही ? लाज वाटली पाहिजे तुम्हाला दुपारी झोपताना...

आणि खबरदार जर बायकोला मराठी येत नसताना दुकानात बसवाल तर.... ड्रम मध्ये कोंबुन मारेन... केरसुणीने झोडपेन.... सतरंजीसकट धुवुन काढेन तुम्हाला.... अरे... अंडरवेअर आणि शेरवीनी ठेवता येते तुम्हाला पण लुंगी नाही काय... भामट्यांनो.... "

(माझ्या वेडेपणाची झांक मला त्यांच्या चेह-यावर स्पष्ट दिसत होती. गुंडांपेक्षा लोक वेड्यांना जास्त घाबरतात हि नविनच माहिती मला कळाली. हळुहळु माझ्या रागाची जागा दुःखानी घेतली आणि माझ्या हातातला तो कोयता गळुन पडला. मग डोळयातुन आसवं गळायला लागली..... )

"...भिकारी समजता तुम्ही आम्हाला.... १२.५५ दुकान बंद करता आणि एक वाजलाय म्हणता.... एकेकटे कोकम पिता..... गुटखा खाऊन तोंडावर उडवता.... "

मला लहान मुलासारखं रडताना पाहुन सगळे माझ्याभोवती गोळा झाले. एकानी मला पाणी दिलं. मालक माझ्या पाठीवरुन हात फिरवयला लागले. त्यांनाच मिठी मारुन बराच रडल्यावर त्यांनी हातात एक गिफ्ट पॅक केलेली पिशवी ठेवली.

"लुंगी आहे....!" - ते म्हणाले.

माझा विश्वासच बसेना. त्यांचे आभार मानुन मी तडक घराकडे पळत सुटलो आणि घरी आल्यावर ते पॅकेट उघडुन लुंगी पाहिली. तीच ती....
' आम्रखंडात शेजवान नुडल्स मिसळुन ते मिश्रण पालकाच्या गर्द हिरव्या पातळ भाजीत बुडवुन खाऊन पिवळया कापडावर आजारी मांजर ओकलेली '

...हल्ली कुठं लुंगी दिसली की मी किंचाळत डोंगराकडे पळत जातो आणि चार-चार दिवस येत नाही. तिथं इतकं शांत वाटतं की इकडे यावंसं वाटतंच नाही. तिथे कायमचं सेटल व्हायचा विचार करतोय....

..........तसंही तिथं वल्कलं विकत घ्यायला लागत नाहीत....!

धुंद रवी

## पुरस्कार

पुलावरुन धडधड करत राजधानी एक्सप्रेस निघून गेली. रोजच्या प्रमाणेच आजही भिकू जागा झाला. तो पळत पळत गल्लीत असलेल्या सार्वजनिक नळावर गेला. हात, पाय, तोंड धुतलं. बायको मुलं अजून झोपलेली होती. त्याने समोरच्या हॉटेलातून चहा आणि गरमागरम भजी आणली आणि चहा बरोबर तो भजी खाऊ लागला. भज्यांचा खमंग वास बायको मुलांच्या नाकात शिरला, तशी ती उठली.

बायको बघत राहिली. मुलांनी हात, तोंड न धुताच कागदातून भजी ओढून खायला सुरवात केली होती.भजी संपली अन भिकूचं लक्ष कागदाच्या तुकड्याकडे गेलं. 'अरे हा तर आपलाच फोटो..' भिकूच्या तोंडून अभावितपणे बाहेर पडलं. फोटोत तो आपल्या बायको- मुलांबरोबर बसला होता. शेजारी फाटक्या गोधडया, चिंध्यांची गाठोडी ठेवलेली होती. साडीच्या चिंध्या पांघरलेल्या बायकोचा फाटका पदर डोक्यावर होता. मुलं माकडाप्रमाणे दात विचकत होती. भटक्या जिवनाचा तो वास्तव फोटो होता.

भिकूने तो फोटो सगळयांना दाखवला. फोटोखाली लिहिलं होतं, 'पुलाखालचं घर' . प्रथम पुरस्कार ५००० रु. अजय शर्मा- मुंबई.

आता त्याला आठवलं. काही दिवसापूर्वी एक फोटोग्राफर तिथे आला होता. त्या सगळयांना निट न्याहळून बघितल्यावर , त्यांचा फोटो काढण्याची ईच्छा त्याने प्रदर्शीत केली. मुलं तर एकदम खुश झाली. त्याने सांगितल्या तशा पोझेस त्यांनी दिल्या. जाण्यापूर्वी फोटोग्राफरने भिकूच्या हातावर ५० रु. ठेवले. त्या दिवशी सगले आनंदात होते. त्या दिवशी सगळयांनी भज्यांबरोबर जिलबीही खाल्ली. भिकू आता विचार करु लागला, ५००० रु। म्हणजे किती वेळा ५० रु?

सौ. उज्ज्वला केळकर

## 'My मराठी' नव्हे 'माय मराठी'

'My मराठी' ....हे वाचणच जरा खटकतंय ना !!! तुम्ही विचार करत असाल की मी हे असं का लिहिलं आहे, कारण सध्या महाराष्ट्रात 'माय मराठी' नव्हे, तर '**My** मराठी' आहे.

"मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" हे शिव-छत्रपती शिवाजी महाराजांचं सूत्र आहे. शिवरायांनी इ. स. १६४२ च्या सुमारास स्वराज्य स्थापनेची सुरवात केली. त्या काळात पारशी भाषेचा प्रचंड प्रभाव होता, परंतु राज्य व्यवहाराची भाषा मराठी असल्याने मराठीचच प्रभुत्व राहिलं गेलं. पण सध्या याच शिवरायांच्या महाराष्ट्रात मराठी भाषेची होणारी गळचेपी तसेच मराठी कडे होणारे दुर्लक्ष पाहता सर्वांनाच महाराजांच्या या सूत्राचा विसर पडलेला दिसत आहे.

अहो तुम्हीच पाहा ना....आज लहान मुलांच्या शाळेपासून ते मोठ्यांच्या नोकरी-धंद्या पर्यंत एकच सिध्दांत दिसून येतो तो म्हणजे, 'इंग्रजी शिकूया आणि मराठी विकुया.' 'आपली बोली - आपला बाणा, मी मराठी' हे आता फक्त बोलण्यापुरते किवा ऐकण्यापुरतेच राहिले आहे. शिव-छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेल्या सूत्राला आज खरोखरच तडे जात आहेत. आज महाराष्ट्रात 'मराठी भाषी कमी आणि हिंदी भाषी धनी' हेच समीकरण पाहायला मिळत आहे. आश्चर्याची गोष्ट हीच की, हे एवढं पाहूनही सर्व मराठी मावळे अजून गप्पच....

आता या सर्व परिस्थितीला जबाबदार कोण???, माझ्या या प्रश्नाच उत्तर अगदी सोपं आहे, या अशा परिस्थितीला दुसरं-तिसरं कोणी नाही, तर आपण स्वतःच जबाबदार आहोत. कारण आपण आज खूप शिकलोय त्यामुळे आपल्यालाच मराठी बोलण्याची लाज वाटते... हल्ली कोणाशीही सहज जरी बोलायला गेलं तर प्रामुख्याने हिंदी - इंग्रजीचाच वापर केला जातो आणि तेही मराठी माणसांच्याच तोंडून ...!!! त्याचं उत्तर नेहमी ठरलेलंच असतं **"ya I am Maharashtrian, but I can't speak Marathi"** तुम्हीच सांगा आता, काय मोठ्या हुद्द्यावर गेलेला मराठी माणूस "मराठी भाषा" विसरू शकतो???, काय तो हुद्दा त्यांना मराठी बोलू नका असं सांगतो???, नाही ना..... मग हि अशी मराठी भाषेशी तडजोड का?, म्हणजे जेव्हा गरज असते तेव्हा " माय मराठी नाहीतर **My** मराठी"......

आपणही या सर्वांच्या मध्ये येतो कारण, टॅक्सिवाले, रिक्षावाले, भाजीवाले यांच्याशी बोलताना हिंदीतूनच बोलतो ना..... अहो बोला त्यांच्याशी मराठीतून, पाच-सहा वेळा विचारा त्यांना मराठीतूनच, सातव्यांदा त्यांना कळेलंच की तुम्ही काय बोलत आहात ते आणि जरी नाही कळलं तर त्यांना हे समजून चुकेल की तुम्हाला मराठीचा किती अभिमान आहे ते आणि त्यांना हि भाषा शिकणे किती गरजेच आहे तेही...सध्याची हि अवस्था हा महाराष्ट्र आपला राहिलाच नाही अशी दाखविणारी आहे.

परंतु सर्वच मराठी लोक असे नाहीत...अजूनही बरेच लोक असे आहेत ज्यांना माझा महाराष्ट्र म्हणण्यात गर्व वाटतो, ज्यांना महाराष्ट्राचा अभिमान आहे, ते स्वतः मराठीतच बोलतात आणि वेळ आल्यावर मराठीवर सुध्दा बोलतात, आणि असेही काही लोक आहेत जे महाराष्ट्राचे रहिवासी नसताना देखील खूप छान प्रकारे मराठी बोलतात. अहो आपलेच काही बांधव जे परदेशात राहतात परंतु तरीही त्यांची मराठी कितीतरी छान असते. मला कोणत्याही भाषेबद्दल द्वेष नाहीये, मला मराठीचा अभिमान आहे. तुम्ही विकासासाठी किवा प्रगतीसाठी नवीन तंत्रज्ञान शिका, इंग्रजीत प्राविण्य मिळावा, परंतु मराठीलाही तितकच प्राधान्य द्या.

"गर्व आहे मला या महाराष्ट्राच्या मातीचा,
सुखाने येथे नांदणाऱ्या बहुगुणी जातीचा
जरी असंख्य रंग चढविले गेले याच मराठी
बोलीला,
पण लक्षात ठेवा जावू देणार नाही तडा
आम्ही महाराष्ट्राच्या या ख्यातीला......"

सांगण्याचं तात्पर्य एवढंच आहे की, "मराठा तितुका मेळवावा आणि महाराष्ट्र धर्म वाढवावा" हे सूत्र आणि "मराठी माणूस" या दोन्ही गोष्टी जर महाराष्ट्रात टिकवायच्या असतील तर आता पासूनच तुम्ही स्वतः सुरवात करा, जास्तीत जास्त मराठीचा वापर करा, मग समोर कोणताही परप्रांतीय असला तरी हरकत नाही, पण सुरवात जरूर करा....

नाहीतर खरोखरच "आपली बोली - आपला बाणा" "मराठी पाऊल पडते पुढे" हे सर्व इतिहासात जमा होईल आणि तो इतिहास सांगताना आपल्यालाच "माय मराठी' नव्हे, तर '**My** मराठी" असा सांगावा लागेल...

✍ अतुल देखणे

## ठंडी पाणीपुरी

अशी क्वचितच एखादी व्यक्ती असेल जिला पाणीपुरी आवडत नाही. पाणीपुरीच्या त्या आंबटगोड आणि किंचीत तिखट चवीचे लाखो दिवाने आहेत. काही जण अगदी झणझणीत तिखट पाणीपुरी खातात. पाणीपुरी खाऊन झाल्यावर शेवटी एक मिठी पुरी किंवा शेवबटाटापुरी खाल्याशिवाय पाणीपुरीची खाद्याराधना पूर्ण होत नाही. समोर कितीही गि-हाईकं असू देत, पाणीपुरीवाल्याची ही खासियत आहे की तो कुणाला किती पु-या दिल्या आणि कुणाचे किती पैसे झाले हे तो बरोबर लक्षात ठेवतो.

प्रभादेवीला सिद्धिवानयकाच्या देवळाच्या बाजूला बरीच छोटी मोठी खाऊची दुकानं आहेत. विजय स्वीट्स हे त्यातलंच एक. इथे आवर्जून खाण्यासारखी गोष्ट म्हणजे ही ठंडी पाणीपुरी.... थंडी नाही ठंडी पाणीपुरी. ही पाणीपुरी आपल्या नेहमीच्या पाणीपुरी सारखी, गरम गरम रगडा टाकून बनवलेली पाणीपुरी नाही हं! ही आहे ठंडी पाणीपुरी.

ठंडी पाणीपुरी म्हणजे छान छान पांढरट रंगाची बुंदी घातलेली, थंड गोड्या आणि तिखट पाण्यातून बुडवून काढलेली पाणीपुरी. एकदा खाऊन मन भरणार नाही. पहिल्या वेळेस गेले होते तेव्हा मीच तीन प्लेट पाणीपुरी खाल्ली होती. पतिदेवांच्या खास शिफारशीमुळे मी विजय स्वीट्सकडे माझा मोहरा वळवला नाहीतर त्यादिवशी चायना स्पाईस हे माझं लक्ष्य होतं पण ते नंतर कधीतरी, असं म्हणून विजय स्विट्सच्या त्या पाणीपुरीवाल्याला 'एक प्लेट' असं मी फर्मावलं. जणू काही मी त्याला जग जिंकण्याच्या मोहीमेवर धाडतेय अशा अविर्भावात त्याने मान डोलावली आणि बाह्या सरसावल्या. समोर आधीच ४-५ गि-हाईकं उभी होती. माझ्या मागून आणखी ३ गि-हाईकं त्याच्या पुढ्यात उभी राहिली पण जराही विचलीत न होता, त्याने सर्वांच्या ऑर्डस स्विकारल्या आणि आपल्या कार्याला आरंभ केला.

प्लेटमधे पहिली पुरी आली आणि घरी बनवायला आणलेल्या शिंपल्यांतून मोती निघावा तसा आनंद झाला मला. एक पुरी जेमतेम दातांखाली येते न येते तोच पाणीपुरीवाल्याने दुसरी पुरी तयार केली होती. मला शंका आली की सर्व गि-हाईकांना सोडून हा फक्त मलाच पाणीपुरी देतोय की काय? पण आजूबाजूला पाहिल्यावर लक्षात आलं की प्रत्येकजण माझ्याचसारखा तोंडात पुरी ठेवून प्लेटमधे आलेल्या दुस-या पुरीकडे अचंबित होऊन पहात होता. तिसरी पुरी खाल्यावर मला कुठेतरी जास्त तिखट खाल्ल्याची जाणीव झाली आणि मग 'तिखा कम' अशी मी केलेली आर्जव त्याने मंदपणे मान डोलावून ऐकून घेतली.

तिखट चवीमुळे नाकात आणि डोळ्यांत जमा झालेलं पाणी अनुक्रमे सूँ सूँ करीत ओढत, रूमालाने पुसत असतानाच पहिली प्लेट संपली. दुसऱ्या प्लेटच्या वेळेलाही हातांचं आणि तोंडाचं कार्य असंच परस्पर सहमतीने पार पडलं. आता तिसरी प्लेट खावी की न खावी या विचारापर्यंत येण्याआधीच त्याने 'और दूँ' असं विचारलं. मला उगीचच तो चॅलेंजर आणि आपण डिफेंडर असल्यासारखं वाटलं. आता एक दोन खाल्ल्याच आहेत तर तिसरी पण 'होऊन जाऊ दे' असं मनाशी म्हणत मी त्याला तिस-या प्लेटची ऑर्डर दिली. ती प्लेट संपवतानाच ही पाणीपुरी आपल्याला बेहद्द आवडलीय़ हे माझ्या लक्षात आलं. आपल्यासोबतच इतर कितीतरी गि-हाईकांची मागणी तो पाणीपुरीवाला जितक्या तत्परतेने पुरवत होता, ते पाहून 'अनंत हस्ते कमलावराने देता, किती घेशील दो कराने', असं म्हणून त्याला हात जोडावेसे वाटले आणि मी माझ्या नकळत चौथी प्लेट मागवली.

चौथी प्लेट संपल्यावर पाचवी खायला काय हरकत आहे, असा विचार मंदपणे मनात तरळत होताच पण मी मनाला आवर घातला. पुन्हा या पाणीपुरीचा आस्वाद घेण्यासाठी इथे नक्की यायचं असं पक्कं ठरवलं. शेवटची शेवबटाटापुरी खाऊन मी माझ्या पाणीपुरी खाद्याराधनेची तिथेच सांगता केली.

कांचन कराई

## देवनागरीत विचार मांडा!

अर्थपूर्ण आवाजाला भाषा म्हणतात. भाषा बोलली आणि ऐकली जाते. भाषेला लिपीने आकृतीबद्ध केले. आपण मराठी भाषेत बोलतो आणि देवनागरी लिपीमध्ये लिहितो. तांत्रिक दृष्ट्या मराठी आपली बोलीभाषा आणि देवनागरी ही आपली लेखीभाषा. हिंदी आणि संस्कृत या बोलीभाषांची लेखीभाषा देवनागरीच आहे. बोलीभाषेसाठी बोलायला तोंड आणि ऐकायला कान ही दोन इंद्रिये लागतात. लेखी भाषेसाठी वाचायला डोळे आणि लिहायला हात ही दोन इंद्रिये लागतात. जन्मानंतर मूल आवाजापासून सुरुवात करून बोलीभाषेपर्यंत अनुभव घेत घेत मजल मारते. शुद्ध भाषा ऐकायला मिळाली तर मूल शुद्ध बोलू लागते. लेखीभाषा शिकण्यासाठी शास्त्रशुद्ध शिक्षण घ्यावे लागते. सर्वसाधारणपणे हे शिक्षण शाळांमधून मिळते. हे शिक्षण दोन प्रकारचे असते, डोळ्यांनी अक्षर ओळख शिकावी लागते आणि हाताने ते अक्षर गिरवायला शिकावे लागते.

व्याकरण आणि शब्दसंग्रह या दोन गोष्टी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी अत्यावश्यक आहे. मराठी भाषिक व्यक्तीला बोलीभाषा आणि लेखीभाषा, दोन्हींचे, बऱ्यापैकी ज्ञान शाळेमध्ये मिळते. पण आजकाल कॉलेजमध्ये गेल्यावर बोलीभाषा मराठीच राहते, मात्र लेखीभाषा इंग्रजी होते. संगणक आल्यापासून भाषा लिहिण्यासाठी अक्षरे गिरविण्याची आवश्यकता राहिलेली नही. सर्वसाधारणपणे संगणकात रोमन लिपीचा की-बोर्ड असतो. त्यामुळे संगणकावर इंग्लीश भाषा लिहिणे सोपे जाते. काही वर्षात अशा मराठी व्यक्तींना मराठीत हाताने लिहिता येत असले तरी देवनागरीचा स्टॅंडर्ड फ़ॉंट नसल्यामुळे स्टॅंडर्ड की-बोर्ड नाही म्हणून संगणकावर देवनागरीमध्ये लिहिता येत नाही.

दररोजच्या कामासाठी देवनागरीत लिहिण्याची जरूरत नसल्यामुळे अशा मराठी व्यक्तींना देवनागरीत लिहायला प्रवृत्त कसे करायचे , हा एक गहन प्रश्न होता. पण त्रांसलिटरेशन टूल आल्यामुळे हे काम सोपे झाले आहे. मराठीचे इनपुट रोमन लिपीमध्ये या टूलच्या साह्याने संगणकात टाकले की त्याचे आऊटपुट देवनागरीमध्ये मिळते. ते आऊटपुट कॉपी/स्पेशल कॉपी करून साध्या देवनागरीमध्ये/युनीकोडमध्ये कन्व्हर्ट होते. युनीकोडमधले देवनागरीचे आऊटपुट इंटरनेटवरही वापरता येते.

सध्या खूप साऱ्या मराठी भाषिकांना इंटरनेटवर देवनागरीत आपले विचार मांडता येत नाही, ही वस्तुस्थिती बदलण्यासाठी या ट्रांसलिटरेशन टूलचा प्रचार करणे जरूरीचे झाले आहे. इंटरनेटवर तर हे खूप सोपे आहे. हे टूल मिळविण्यासाठी सर्च इंजिन वपरायचे आहे. बस्स! तसे पाहिले तर भारतात इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर ई-मेलसाठी हे टूल देत आहेत. निदान ई-मेल तरी देवनागरीमध्ये करता येते, हे इंटरनेटवरच्या मराठी नेटिझन्सना लक्षात आणून दिले पाहिजे. पण हे टूल वापरण्यासाठी इंटरनेटवर असणे आवश्यक आहे. इंटरनेटवर असे टूल मोफत मिळते. ते डाऊनलोड करून घेतले की केव्हांही वापरता येते. इंटरनेटवर देवनागरीत ब्लॉगींगसाठी तर हे खूपच कामी येते. संगणकावर आणि इंटरनेटवर देवनागरीचा उपयोग वाढविण्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने आपल्या आप्तस्वकीयांचे मन वळवायला पाहिजे.

सुहास फणसे

## " सौर उर्जा" -' वापर' आणि 'प्रचार'

गेली अनेक वर्ष महाराष्ट्रातील जनतेला वीजभारनियमाने त्रस्त केले आहे, पाण्याचा साठा व पावसाच्या अनियमितपणामूळे वीज प्रकल्पातून वीज निर्मितीला खंड पडलेला दिसतो. राजकारणी मात्र वीज निर्मितीबाबत कमालीचे उदासीन दिसतात मात्र' "वीजभारनियम" येत्या काही महिन्यात बंद होईल'. असे आश्वासन जनतेला बेमालूमपणे देत आहेत.वीज भारनियमामुळे शेतकरी, उद्योग-धंदे, व्यापार आणि विध्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भविष्यात नव्याने वीज प्रकल्प महाराष्ट्रात कार्यान्वित होईल आणि वीज भारनियमन रद्द होईल ह्या एका आशेवर आस धरून जनता बसली आहे ;परंतु त्याची अंमलबजावणी किंबहुना त्यासाठी प्रयत्न केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून कुठेही होताना दिसत नाही.होय...

म्हणूनच सदर वीज भारनियमाला सामोरे जाण्याकरिता महाराष्ट्र शासनाने सूर्य- किरणांच्या माध्यमातून वीज निर्मिती केली जाते, त्या सौर उर्जा यंत्र ( **solar system** ) पद्धतीचा मोठ्या प्रमाणावर' वापर' आणि 'प्रसार' केल्यास नक्कीच विजेच्या दाहकतेपासून सर्वांची किंबहुना महाराष्ट्राची सुटका होईल असे वाटते.

"सौर उर्जा" हे वीज मिर्मिती यंत्र शहरातील खासगी इमारतींना त्यांच्या परिसरातील व सार्वजनिक कामातील लागणाऱ्या वीजेकरिता अटीपूर्वक वापरण्यास बंधनकारक केल्यास बहुतांशी विजेची "बचत" होईल. त्याच प्रमाणे शासकीय व केंद्रशासित उपक्रमांना देखील सौर उर्जेच्या माध्यमातून विजे करिता प्राधान्य दिल्यास विजेचे भारनियमन आपण मोठ्या प्रमाणात टाळू शकतो.

सध्या बाजार पेठेत सौर उर्जा यंत्राची किंमत अतिशय महागडी आहे. केंद्र सरकारने त्यावरील जाचक "कर" मोकळे करून त्याची किंमत सर्वसामान्य जनतेला परवडेल अशा स्वरूपात विक्री करता उपलब्ध केल्यास महाराष्ट्रातील लाखो शेतकरी सौर उर्जामुळे आपल्या शेती विषेयक धोरणात आमुलाग्रः आणि प्राधान्याने प्रगती करतील. आज वीज हि जीवनातील महत्वाची घटक व गरज बनून राहिली असताना सौर उर्जेच्या माध्यमातून आपण वीज निर्मितीला पर्याय शोधून महाराष्ट्रात क्रांती करू शकतो . त्याकरिता महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांची "मानसिकता " सकारात्मक दृष्टीची हवी .

मंगेश धोंडी गावडे

# नेत्रदान - एक राष्ट्रीय गरज

( श्री. वि. आगाशे )

जगातील एकूण नेत्रहीन व्यक्तींपैकी २० टक्के म्हणजे सव्वा कोटी नेत्रहीन भारतात असून त्यातील ३० लाख नेत्रहीन व्यक्तिंना नेत्ररोपणाने दृष्टी प्राप्त होऊ शकते. सगळयाच नेत्रहीनांना नेत्ररोपणाने दृष्टी मिळू शकत नाही. ज्यांची पारपटले निकामी झाली आहेत, परंतु बाकीचा डोळा चांगल्या स्थितीत आहे, त्यांनाच दृष्टी प्राप्त होऊ शकते कारण नेत्ररोपण म्हणजे संपूर्ण डोळ्याचे रोपण नव्हे तर फक्त ह्या पटलाचेच रोपण होय. ह्यालाच सर्वसाधारणपणे आपण नेत्ररोपण म्हणतो. मृत व्यक्तींच्या नेत्रदानामुळेच हे नेत्ररोपण करणे शक्य होते.

नेत्रदान हे रक्तदानाप्रमाणे जिवंतपणी नव्हे तर ते मरणोत्तरच करावयाचे असते. कुठल्याही जिवंत व्यक्तीस नेत्रदान करता येत नाही.

तीस लाखांना दृष्टी देणे आपल्याला फारच सोपे वाटेल, पण तसे नाही, कारण आपली भयानक, तिडीक आणणारी निंद्य अनास्था !

दरवर्षी भारतात सुमारे ८० लाख मृत्यु होतात. परंतु ह्यातील फक्त पंधरा हजार व्यक्तींचेच नेत्रदान होते.

भारतात जी नेत्ररोपणे होतात त्यासाठी मोठ्या प्रमाणात दान केलेले नेत्र हे श्रीलंकेसारख्या आपल्या छोट्याश्या शेजारी राष्ट्राकडून आलेले असतात.

ही भयानक वस्तुस्थिती आपल्यासारख्या ११८ कोटीं पेक्षाही अधिक लोकसंख्येच्या मोठ्या राष्ट्राला आत्यंतिक लाजिरवाणीच नव्हे काय ?

आपला देश विविध आघाड्यांवर स्वयंपूर्ण होत आहे. तो ह्या आघाडीवरही स्वयंपूर्ण व्हावा असे आपल्यासही नक्कीच वाटेल. **म्हणूनच ही एक राष्ट्रीय गरज ठरते.**

नेत्रदान हे फारच सोपे असून त्यासाठी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे -

- नेत्रदानास धार्मिक बंधन नाही. कुठला धर्म अशा महान कार्यास विरोध करेल ?
- काही दिवसांच्या बालकापासून अगदी १०० वर्षांच्या स्त्री-पुरुषांपर्यंत कोणाचेही नेत्रदान होऊ शकते.
- कुठल्याही प्रकारचा चष्मा लावणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले, मधुमेही आणि रक्तदाब पिडीतही नेत्रदान करु शकतात.
- मृत व्यक्तीस एड्स, अलार्क (रेबीज), कावीळ, कर्करोग, सिफीलीस, धनुर्वात किंवा विषाणूंपासून होणारे रोग, तसेच नेत्रपटलाचे रोग असल्यास अशा व्यक्तींचे नेत्र रोपणासाठी निरुपयोगी ठरतात. परंतु ही नेत्रपटले संशोधनासाठी वापरतात. तेव्हा अशा व्यक्तींचे नेत्रदान व्हावे की नाही हे कृपया नेत्रपेढीच्या डॉक्टरांनाच ठरवू द्यावे.
- अपघातात मृत झालेल्या व्यक्तींचे डोळे, म्हणजेच नेत्रपटल चांगल्या स्थितीत असल्यास स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीने नेत्रदान होऊ शकते.
- ज्यांचे पारपटल चांगले आहे - परंतु इतर काही दोषांमुळे अंधत्व आलेले आहे अशा अंधांचेही नेत्रदान होऊ शकते.
- मृत्युनंतर लवकरात लवकर, ३ ते ४ तासांपर्यंत (अपवादात्मक स्थितीत ६ तासांपर्यंत) नेत्रदान होणे आवश्यक असते. म्हणूनच नेत्रदानाची इच्छा मृत्युपत्रात व्यक्त करु नये. ते निरर्थक असते. कारण मृत्युपत्र काही दिवसांनंतरही उघडले जाते.
- नेत्रदानासाठी जवळच्या नेत्रपेढीचे प्रतिज्ञापत्र मात्र जरुर भरावे. त्यातून आपली इच्छा लेखी स्वरुपात व्यक्त होऊन ती साक्षीदार म्हणून सही करणाऱ्या जवळच्या नातलगांना, वारसांना माहीत होते. आपली इच्छा जवळचे नातलग, शेजारी, मित्र मैत्रिणी ह्यांनाही आवर्जून सांगावी, किंबहुना प्रतिज्ञापत्र भरताना ते सामूहिकपणे, एकत्र बसून चर्चा करुन भरणे सर्वोत्तम होय ! त्यातून आपली इच्छा आणि ह्या कार्यासही एक सामूहिक बळ प्राप्त होते. तसेच आपली इच्छा फलद्रुप होण्याची शक्यता बळावते.
- नेत्रपेढीकडून आपल्यास एक कार्ड मिळते. आपण नेत्रदान केलेले असल्याचे दर्शविणारे हे कार्ड कायम आपल्यासोबत बाळगावे.
- आपल्या डायरीत आसपासच्या सर्व नेत्रपेढ्यांचे दूरध्वनी क्रमांक ठळकपणे नोंदवून ठेवावेत तसेच भिंतीवरही लावावेत.
- नेत्रदात्याच्या मृत्युनंतर नेत्रपेढीला लगेच नेत्रदानाविषयी कळविणे महत्त्वाचे असून हे काम नातलग, शेजारी, मित्र मैत्रिणी करु शकतात. त्या वेळेच्या भावनात्मक स्थितीचे कारण काही जण सांगतात परंतु ते लटके आहे. अशा स्थितीतच जेव्हा आपण नातलग, ओळखीच्यांना वगैरे दूरध्वनीवरुन कळवितो तसेच नेत्रपेढीलाही दूरध्वनीवरुन कळवायचे एवढेच !
- मृत व्यक्तीने ज्या नेत्रपेढीचे प्रतिज्ञापत्र भरले आहे त्याच नेत्रपेढीला कळविणे आवश्यक नाही. त्या ठिकाणच्या जवळच्या नेत्रपेढीला कळविणे वेळेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.
- **मृत व्यक्तीने प्रतिज्ञापत्र भरलेले नसतानाही वारसदार व्यक्ती मृत व्यक्तीचे नेत्रदान नेत्रपेढीला कळवून करु शकतात.** ह्या दृष्टीने नेत्रदानाचे महत्त्व, राष्ट्रीय आवश्यकता पाहता कळकळीचे आवाहन करावेसे वाटते की आपल्या परिसरात, नात्यात कुणाचा मृत्यू झाल्यास मृत व्यक्तींच्या नातलगांना नेत्रदानाविषयी जरुर सुचवावे, त्यासाठी प्रवृत्त करण्याचे प्रयत्न करावेत. अशा प्रकारे जिवंतपणीच आपण नेत्रदानविषयक मोठे काम करु शकाल.



- **नेत्रपेढीला कळवितानाच कृपया खालीलप्रमाणे महत्वाच्या बाबी पार पाडाव्यात -**
    - डॉक्टरांकडून मृत्यू प्रमाणपत्र त्वरित मिळवावे. शक्यतो त्यांनाच १० सी. सी. रक्ताचा नमुना घेऊन ठेवण्यास सांगावे.
    - मृताचे डोळे व्यवस्थित बंद करुन पापण्यांवर बर्फ अथवा ओल्या कापसाच्या / कापडाच्या घड्या ठेवाव्यात. शक्य असल्यास डोळ्यात आयड्रॉप्स टाकावेत.
    - पंखे बंद करावेत तसेच वातानुकूलन यंत्र असल्यास ते जरुर चालू ठेवावे.
    - मृत व्यक्तीचे डोके उशीवर शरीरापासून सुमारे सहा इंच तरी उंच ठेवावे.
- नेत्रपेढीला कळविल्यावर नेत्रपेढीचे डॉक्टर मृत व्यक्ती जेथे असेल तेथे येऊन नेत्र काढून नेतात. ह्यासाठी जास्तीत जास्त अर्धा तास लागतो आणि त्यासाठी जंतुविरहित खोलीची आवश्यकता नसते. नेत्र काढल्यावर कृत्रिम नेत्र किंवा कापसाचे बोळे ठेवून पापण्या व्यवस्थितपणे बंद केल्या जातात त्यामुळे मृत व्यक्तीचा चेहरा विद्रूप दिसत नाही.

हे नेत्र खास फ्लास्कमधून नेत्रपेढीत नेले जातात. त्यावर काही प्रक्रिया करुन ४८ तासांच्या आत नेत्रपेढीच्या प्रतीक्षा यादीप्रमाणे दोन ते सहा उपलब्ध नेत्रहीन व्यक्तींना बसविले जातात.

व्यक्ती मृत झाली तरी डोळे दोन ते सहा दृष्टीहीनांना भयाण अंधःकारातून बाहेर काढून त्यांना नवजीवन देण्याचे महान कार्य करतात.

आपणही हे अमूल्य दान करु शकतो. कदाचित जीवनभर आपण समाजाच्या उपयोगी पडू शकत नाही परंतु मरणानंतर तरी नेत्रदानाने जरुर उपयोगी पडू शकतो. दोन दृष्टीहिनांच्या रंगहीन जीवनात अमूल्य दृष्टीचे रंग भरु शकतो.

आपले मंडळ, संघटना, कार्यालय, शिबीर, शैक्षणिक-सामाजिक संस्था, शिवजयंती, नवरात्र, गणेशोत्सव, गृहनिर्माण संस्था वैगेरे ठिकाणी भित्तीचित्र प्रदर्शनासह **नेत्रदान-एक राष्ट्रीय गरज** हे श्री. वि. आगाशे यांचे माहितीपूर्ण आणि उद्बोधक व्याख्यान जरुर आयोजित करा.

**आयोजित करा -**

**दृष्टी** हा श्री. वि. आगाशे यांचा नेत्रदान आणि इतर सामाजिक विषयांवरील कवितांचा कार्यक्रम

**डोळस दान** ही श्री. वि. आगाशे लिखित एकांकिका

नेत्रदानावरील कविता आणि एकांकिकेच्या पुस्तकांसाठी संपर्क साधा.

**- अधिक माहितीसाठी संपर्क साधा -**

१. श्री. वि. आगाशे, सी - ५४, अशोकल्प / रश्मी संकुल, मनोरुग्णालय मार्ग, ठाणे (प.) - ४०० ६०४. ९९६९१६६६०७
✆ - २५८०५८००, २५५९४०४९, २५५९२२४२ (पुष्पा आगाशे)
e-mail :shreepad.agashe@gmail.com
BLOG : www.netradaan.blogspot.com

२. श्री. अनिल आगाशे, अलिबाग ९८५०९६५४५२

३. श्री. गोविंद काजरोळकर, कुर्ला
✆ - २५२३११५८ ९८६७७६७९७१

**मुंबई आणि आसपासच्या नेत्रपेढ्या**

| | | | |
|---|---|---|---|
| **गिरगाव** | हरकिसनदास रुग्णालय | ६६१०६२२५/२००/२६३ | |
| **भायखळा** | जमशेदजी डग्गन, जे. जे. | २३७५०१०२ | २३७६०९४३ |
| **मुंबई सेंट्रल** | नायर रुग्णालय | २३०८१४९१ | २३०८१७५८ |
| **परळ** | फक्त के.ई.एम.साठीच | २४१३६०५१ | २४१३१७६३ |
| | आय.बँक को. ऑर्डि.सेंटर | २४१६४३४२ / २४ | |
| **दादर** | गोखले नेत्रपेढी | २४२२१८२० | २४२२७४२५ |
| **माहीम** | हिंदुजा रुग्णालय | २४४४९१९९ | २४४६७५७५ |
| | सोमैया रुग्णालय (रोटरी) | २४०९०२५३ | |
| **विलेपार्ले** | कूपर रुग्णालय | २६२०७२५४ / ५६ / ५७ / ५८ | |
| **बोरीवली** | समर्पण नेत्रपेढी | २८०११५५३ | २८६२४४०४ |
| **दहिसर** | रोटरी नेत्रपेढी | २८९९०७०७/९८२१७०१९१९ | |
| **वसई** | ब्लाईंड रीलीफ असो. | २३२२३८७ | २३२४१०७ |
| **शीव** | टिळक रुग्णालय नेत्रपेढी | २४०६३००० | २४०६३३०२ |
| | त्वचादानासाठी संपर्क | २४०६३३२५ | |
| **वडाळा** | आदित्यज्योत नेत्रपेढी | २४१७७६०० | २४१८१००१ |
| **घाटकोपर** | अर्पण नेत्रपेढी | २५०६७२९३ | २५०६०८९७ |
| | राजावाडी रुग्णालय | २५११५०६६ | २५११५०६७ |
| **मुलुंड** | क. वि. ओ. नेत्रपेढी | २५६१९३५६ | २५६४५२७८ |
| **ठाणे** | सहियारा ट्रस्ट नेत्रपेढी | ९३२१३११९१९/२५३४१९१९ | |
| | | ९३२०६११९१९/२५४४९०५१ | |
| | | ९३२०४११९१९ | |
| | | ९८९२६५७६५६ | |
| **डोंबिवली** | मानव कल्याण केंद्र | २४४५५७४ / ९५६६ / ९५७३ | |
| **कल्याण** | माधव नेत्रपेढी | २२०५१४८/१६३३ | |
| | | ९२२४४८४०९१ | |
| **पनवेल** | लक्ष्मी नेत्रपेढी | २७४५३४७ | २७४५२२८ |

(नवी मुंबई, कल्याण, भिवंडी, अंबरनाथ, अलिबाग, कर्जत, नागोठणे, खोपोलीपर्यंत)

**संपूर्ण मुंबईसाठी हॉट लाईन (तरुण मित्र मंडळ) १९१९**

| | | | |
|---|---|---|---|
| **पुणे** | जनकल्याण नेत्रपेढी | २४४५७२५६ | २४४५०२६४ |
| | नायमपल्ली सरकारी नेत्रपेढी | | २६१२८००० |
| | राष्ट्रीय नेत्र संस्था | २५५३६३६९ | २५५३६३२४ |
| | रुबी हॉल क्लीनिक | २६१२३३९१ ते ९८ | |
| | महात्मा गांधी रुग्णालय | २४४७९४४३ | २४४७७५७२ |
| | सेनादल रुग्णालय | २६३०६०४१ | |

**आधी मानवधर्म नेत्रदान प्रथम करा, नंतरच क्रियाकर्म दहन किंवा दफन करा.**

**मृताची, नातलगांची वाढते शान, जाणीव माणुसकीची, जनहो करा नेत्रदान !**

**जाता जाता सहजी शक्य, अमुल्य नेत्रदान करावे, दृष्टिहीनांना दृष्टिदान, नवजीवनच द्यावे.**

श्रीपाद आगाशे

## माझं चुकतंय तरी कुठे ?

गेल्या तीन दिवसात माझ्या हातुन अक्षम्य अपराध झालेत आणि माझे सगळे गुन्हे मला मान्य आहेत. पण प्लीज एकदा माझं ऐका आणि मला सांगा की....

'माझं चुकतय कुठे... ?'

परवा धोब्याला इस्त्रीसाठी होते-नव्हते ते कपडे दिले आणि काल टॉवेलवर त्या मुर्ख धोब्याची (का मुर्ख मी कोणास ठाउक... !) वाट बघत बसलो. आता ऑफीसला उशीर होणार आणि विनाकारण बॉसच्या शिव्या खाव्या लागणार ह्या विचारानी संतापलो आणि त्या धोब्याच्या घरी जाऊन त्याला धुवावं असं विचार करायला लागलो.
पण बनियन आणि टॉवेलवर जाणं प्रशस्त दिसणार नाही म्हणुन त्याला फोनवरच धुवायचं ठरवलं. त्याला फोन लावल्यावर एक आगाऊ आवाजाच्या बाईनी मला डोक्याला झिणखिण्या आणणारा एक मेसेज दिला...
" आपण ज्या व्यक्तीशी संपर्क साधु इच्छित आहात, ती व्यक्ती सद्ध्या भारताबाहेर प्रवास करत आहे ".
बेगडेवाडी का घेभडेवाडी... अशा कुठल्यातरी गावावरुन आलेला आपला धोबी कुठं पोहचला अशा विचारात मी बेशुद्ध पडणार इतक्यात दारावरची बेल वाचली. मी जरासं घाबरत... (किंवा लाजत असेल) दार उघडलं...
आणि पाहतो तर काय....
तोच तो आमचा हरामखोर धोबी दात काढत... जणु काही मला दिवाळीची भेट म्हणुन त्यानी कपडे आणले आहेत अशा कौतुकात.... जीवाचा संताप संताप व्हावा इतक्या प्रसन्न चेह-यानी.... मळक्या बनियनवर उभा.
मी निशःब्द आणि निशःस्त्र असल्यानं, कृतकृत्य होऊन अत्यंत कृतज्ञतेने त्यानी केलेल्या लज्जारक्षणासाठी आभार मानुन माझे कपडे ताब्यात घेतले. नेहमीप्रमाणे त्याच्याकडे द्यायला सुट्टे पैसे नसल्यानी त्यालाच ते लक्षात ठेवायला सांगुन, त्याच्या परदेशवारीविषयी विचारताच म्हणाला,
" हं...हं... ते व्हय... त्यो माझा डायलरटोन आहे."
माझ्या तोंडाला फेस आला.
मला कळेना....
तीन किलोमीटर बनियनवर (तो ही मळका.. आणि ते ही धोबी असताना...) येणा-या, अक्षम्य अपराध करुन दात काढणा-या आणि असली इंटरनॅशनल रिंगटोन असणा-या त्या धोब्याचं दरवाज्यापलिकडचं ते स्वछ... आनंदी... मोकळं जग....!!
आणि दरवाज्याच्या आतलं माझं चिडचिडलेलं... मरगळलेलं..... कसलाही टोन नसलेलं बेसुर जग.... ??
'माझं चुकतय कुठे... ?'

--------------------

"काय..... ? तीस रुपये ???"

हे मी इतक्या जोरात ओरडलो की.....

थांबा... तुम्हाला सविस्तरच सांगतो.

काय झालं, काल मस्त पावसाळी हवा होती म्हणुन बायकोला जरा भजी किंवा काहीतरी चटपटीत कर असं म्हणालो तर रागातीशयानी बघायला लागली. जसं काही मी तिला शाही रबडीच करायला सांगीतलं होती. "आटे डाल का भाव पता है क्या" असं काहीतरी हिंदीत वैगेरे बोलायला लागली.

त्यात मी हिंदीत तिच्याशी भांडु शकत नाही, हे तिला माहित आहे. (तसं मी तिच्याशी कुठल्याच भाषेत भांडु शकत नाही, पण ह्या वेळेस न भांडण्याचं कारण 'बायकोच्या रागाचा उसळलेला डोंब नसुन माझी हिंदीची बोंब' हे होतं.) पिठाचा आणि डाळीचा भजीशी संबंध काय, मला कळेना.

"मग निदान कोथिंबीरीच्या वड्या तरी करं" असं म्हणालो तर कपाटातुन थर्मामीटर घेऊन आली आणि मला ताप आलाय का बघायला लागली.

च्यामायला... मला कळेनाच... माझं चुकतय कुठे... ?

मग इंग्रजीत बडबड करत मी कोथींबीर आणायला बाहेर पडलो. (तसं ती अगदी उच्चविद्याविभुषीत आहे, पण का कोण जाणे, माझं इंग्रजी तिला जडंच जातं थोडं. बहुतेक मी एकदम हाय क्लास शब्द वापरत असणार. .........असो..!)

तर मी सरळ भाजीवालीकडे गेलो. (ही मराठी बाई आहे. मागे एकदा एका हिंदी भाजीवाल्याकडे गेलो आणि "जरा सव्वाशे ग्रॅम पडवळ देना" असं म्हणालो तर अजुबाजुच्या बायका इतक्या हसल्या की त्यानी ते प्लॅस्टीकच्या पिशवीत घालुन वर फुकट दिलं असतं, तरी मी घेतलं नसतं.).

तर मी त्या मराठी बाईकडे कोथिंबीर मागितली आणि ह्या वेळेस आजुबाजुची लोकं माझ्याकडे आदरानी पाहयला लागली. त्या बाईनी मला कोथिंबीर, तिही न मागता एका पिशवीत घालुन दिली आणि म्हणाली "तीस रुपये !"

"काय..... ? तीस रुपये ???"

हे मी इतक्या जोरात ओरडलो की.....

जाऊ द्या.. कशाला उगाच स्वतःची झालेली शोभा सांगा. नाही परवडत एखाद्याला ३० रुपयाची कोथिंबीर. पण म्हणुन काय.... असो.... त्या अमानुष, असुरी, असह्य, अविस्मरणीय धक्क्यातुन मी सावरायच्या आधिच मला एक फोन आला. पलिकडुन एक गोड बाई... माफ करा, गोड आवाजाची बाई जे म्हणाली ते पुढिलप्रमाणे,

"सर... आमच्या कंपनीकडुन तुमची एका लकी कुपनसाठी निवड करण्यात आली आहे आणि त्यानुसार २ वर्षातुन १० वेळा, ७ दिवस आणि ६ रात्री तुम्हाला काश्मीरला एका ५ स्टार हॉटेलमध्ये राहण्याची सुवर्णसंधी आहे. पण त्यासाठी तुम्हाला ३ दिवसाच्या आत फक्त ९०,००० रुपये भरायचे आहेत. तर कधी येताय... ?"

त्या सगळया आकड्यांनी मला इतकं गरगरलं की मी काय बोलतोय मलाच कळेना. मी तिला म्हणालो की हे कुपन तुम्ही दुस-या कोणाला तरी विकुन त्या बदल्यात मला कोथिंबीरीच्या ३ गड्ड्या द्याल का ?

तिनी मला इंग्रजी भाषेत (बीप बीप) शिव्या घातल्या... गड्डी परत दिली म्हणुन भाजीवालीनी मराठीत (बाप बाप) शिव्या घातल्या आणी तसंच घरी परत आलो म्हणुन बायकोनी हिंदीत मेरे इज्जत की धंज्जीया उडा दी !

का वागतात ह्या सगळया बायका असं ? मला सांगा, माझं चुकतय कुठे... ?

--------------------

आज सकाळी माझ्या ५ वर्षाच्या मुलीचा अभ्यास घ्यायला बसलो होतो. आजकालची मुलं म्हणजे भारी उर्मट आणि आगाऊ आहेत हो ! जराही अभ्यास करायला नको दुसरं काय...

आमच्या वेळेला कसं... म्हणजे मी अभ्यासात जरी हा नसलो तरी एकदम हा ही नव्हतो. म्हणजे खुप काही अगदी हे नाही पण म्हणजे... आमच्या वेळेला अभ्यासापेक्षा व्यवहारज्ञान जास्त महत्वाचं असायचं.. म्हणजे पास नापास काय... म्हणजे अगदी सगळयाच विषयात किंवा प्रत्येक वर्षी असं नाही पण... असो....

तर मग मी तिच्या होमवर्कची वही घेतली आणि पहिला बॉम्ब इंग्रजीचा. म्हणजे मला तसा काही प्रॉब्लेम नाहीये इंग्लिशचा... पण तिच्या आईलाच जिथं माझं हाय क्लास इंग्लिश कळत नाही, तिथं त्या चिरमुरडीला काय कळणार. मी वही उघडली पण इंग्लिश सारखं काही दिसेना. काहीतरी 'फोनीक साऊंड' असा होमवर्क होता. मला

कळेना हो... हे फिजिक्स किंवा इंजीनीयरींग चे विषय हल्ली ज्युनिअर केजीला कधीपासुन आलेत ?

मग कळालं... म्हणजे मुलीकडुनच कळालं की इंग्रजी अक्षरांचे उच्चार आपण ज्या प्रकारे करतो त्याला 'फोनीक साऊंड' म्हणायचं. अर्थात हे सांगताना ती तिच्या आईसारखं डोळ्यातुन "बावळाट" असं म्हणायला विसरली नाही. नंतर ती ते तोंडानी पण म्हणाली. पण माझी चुक नव्हती हो.... आम्ही Z ला झेडच म्हणायचो... आता त्याला ज्ज्ज्ज्ज्सस्स्स्झ्झ्झ्झी म्हणतात हे मला बापड्याला कसं कळणार. बर तो विषय टाळुन तिला आय फॉर आयस्क्रिम असं शिकवायला गेलो तर म्हणाली, "चूक ! आय सेझ ई, आय फॉर ईग्लु... नॉट आयस्क्रीम !!"

आमच्या इंग्रजीच्या दाते मास्तरांची शपथ.... ती काय बोलली मला अजुन कळालं नाहीये.

पोमोग्रएनेट म्हणजे नक्की कुठलं फळ.. माहित नव्हतं. मुळ्याला इंग्रजीत काय म्हणायचं... माहित नव्हतं. त्या इंग्रजी कविता वैगेरे आपल्याला कधी जमल्याच नाहीत. गाणी म्हणता येत नाहीत, चित्र काढता येत नाहीत. पर्पल आणि व्हायोलेट ह्याला माझ्याकडे एकच जांभळा हा शब्द आहे हो.... पण तिच्याकडुन तीच ती नजर पुन्हा आल्यानी मी ते ही बंद केलं.... माझं नशीब तिला गणित विषय नाही, नाहीतर....

काय आहे..... माझं गणित पण इंग्लिश सारखं जरा हाय क्लासच आहे. पण म्हणुन जे घडलय ते सगळं तिनी जाऊन आईला सांगणं चुकच होतं.

मग दोघींनी मिळुन माझी शाळा घेतली.... हल्ली माझा मराठी बाणा जरा जागा व्हायला लागलाय पण आज बायको आणि उद्या मुलगी फाडुन खातील म्हणुन गप्प आहे.

एक सांगु तुम्हाला, मी सोडुन बाकीचे सगळे बरोबरच असतात. तो धोबी, ती भाजीवाली, ती टेली-कॉलर, बायको, मुलगी, हे तर असतातच पण वॉचमन, बसचा कंड्क्टर, दुकानदार, ट्रॅफिक पोलीस, भिकारी, ती मराठी माणसं , हिंदी माणसं, इंग्रजी माणसं, कन्नड, तेलगु, हिब्रु माणसं.... आजुबाजुची दिसणारी सगळीच माणसं... सगळेच बरोबर असतात... मी सोडुन !

मला मान्य आहे की मी चुक आहे. पण मला एक सांगा....

" माझं चुकतय कुठे... ?"

धुंद रवी

## **SSuite Office MS Office** आणि **Open Office** ला **SSuite Office** झटपट पर्याय

मायक्रोसोफ़्ट ओफ़िस सुट आणि ओपन ओफ़िस ही दोन महत्त्वाची सोफ़्टवेअर्स हल्ली सगळीकडेच हमखास वापरली जातात. याच सोफ़्टवेअर्सचे काही अवशेष वापरून गुगल डोक्स सारखी सुविधा देखिल सुरु झाली आहे. गुगल डोक्स हे तुम्हाला ओनलाईन एडिटिंग ची सुविधा देते. मायक्रोसोफ़्ट ओफ़िस हे पेड सोफ़्टवेअर आणि ओपन ओफ़ीस मोफ़त सोफ़्टवेअर असल्याचे आपल्या सर्वांनाच माहित आहे. ही दोन सोफ़्टवेअर्स उत्तम असली तरी ही इंस्टोल केल्यावर आपल्या हार्ड डिस्कवरील २०० ते ३०० एम बी हून अधिक जागा व्यापतात. अर्थात हल्ली हार्ड डिस्क स्वस्त आणि मस्त झाल्या असल्यामुळे आपल्याला त्याचे काहीच वाटत नाही. शिवाय मायक्रोसोफ़्ट ओफ़ीस हे पोर्टेबल सोफ़्टवेअर या प्रकारात मोडत नाही म्हणजे तुम्हाला मायक्रोसोफ़्ट ओफ़ीस प्रत्येक संगणकावर इंस्टोल करावे लागते .जर तुमच्या कडे हे सोफ़्टवेअर नसेल तर मग या सोफ़्टवेअरला सपोर्टिंग डोक्युमेंट्स उघडत नाहीत. उदाहरणार्थ .doc (MS Word format), .xls (MS Excel format) किंवा .odt (Open Document Type) उघडण्यासाठी तुमच्याकडे मायक्रोसोफ़्ट ओफ़िस तसेच ओपन ओफ़ीस ही सोफ़्टवेअर्स असणे गरजेचे आहे. नाहीतर मग तुम्हाला त्या फ़ाइल्स गुगल डोक्सवर अपलोड करून वाचता येतात. ओपन ओफ़ीस चे पोर्टेबल व्हर्शन उपलब्ध असले तरी पुन्हा साईज चा प्रोब्लेम येतो.

मायक्रोसोफ़्ट आणि ओपन ओफ़िस या दोन अवाढव्य सोफ़्टवेअर्स च्या तुलनेत काही छोटे सोफ़्टवेअर याच दोन सोफ़्टवेआर्सना पर्याय मला सापडला ज्याचे नाव आहे SSuite Office याचि वैशिष्ट्ये सांगायची झाली तर या सोफ़्टवेअरला मुर्ती लहान पण किर्ती महान ही उपमा द्यावी लागेल. कींबहुना हीच उपमा त्याला योग्य अशी आहे.

SSuite Office ची वैशिष्ट्ये

१.सगळ्यात मुख्य म्हणजे याची साईज फ़क्त १७.३ एम बी इतकी आहे.


२.अतिशय सहज सोपे आणि युसर फ़्रेंडली.

३. हे सोफ्टवेअर चकटफ़ू असुन झिप फ़ाईल मध्ये येते म्हणजेच आपण ते पेन ड्राईव्ह किंवा सी डी मधून कूठेही घेऊन जाऊ शकतो.


४. इंस्टोलेशनची गरजच लागत नाही, कारण हे सोफ्टवेअर झिप फाईल मध्ये उपलब्ध आहे.

यात फक्त एक त्रुटी आहे ते म्हणजे यात प्रेसेंटेशन्साठि काहीच सुविधा नाही पण ही त्रुटी वगळता हे लहान सोफ्टवेअर मायक्रोसोफ्टाणि ओपनओफीस च्या तुलनेत कितीतरी पटीने सरळ आणि सुटसुटीत आहे.

SSuite Office सोफ़्टवेअर डाऊनलोड करण्यासाठी येथे क्लिक करा.




तुम्हाला वरील चित्रा दाखवल्या प्रमाणे एक झीप फ़ाईल मिळेल. त्यावर राईट क्लिक करून ती जिथे हवी तिथे एक्स्ट्रेक्ट करा. झीप फ़ाईल एस्ट्रेक्ट केल्यावर तुम्हाला थेट १ फ़ोल्डर आणि ४ फ़ाइल्स एक्स्ट्रेक्ट होतात त्यात्तील Autorun.inf ही फ़ाईल जर तुमचा antivirus चांगला कार्यरत असेल तर आपोआप डिलिट होते.





उर्वरित फईल्स/ फोल्डर्सपैकी StartUpMenu.exe या फ़ाईलवर क्लिक करा तुम्हाला खालील प्रमाणे एक मुख्य खिडकी दिसेल.




ज्यात प्रामुख्याने दोन गटांत विभाजन झालेले तुमच्या निदर्शनास येईल पहिला गट म्हणजे Main Application आणि दुसरा म्हणजे Utilities या दोन्ही गटांत एकुण मिळून तब्बल १८ विविध पर्याय दिसतील त्यांची नावे आणि थोडक्यात माहिती चित्रांद्वारे खालीलप्रमाणे आपल्यासाठी देत आहे. वापरण्यास हे सोफ्टवेअर अतिशय सोपे असल्याने एका ओळींत त्याची माहिती देता येते.

१. WordGraph हे जवळ जवळ MS Word किंवा Opent Document Type सारखेच आहे.


यात तुम्हाला मायक्रोसोफ्ट वर्ड आणि ओपन ओफीस टेक्स्ट डोक्युमेंट ची जवळपास सर्वच वैशिष्ट्ये आढळतील.




२. Receive My EZmail हे Microsoft Outlook सारखेच एक ई मेल क्लाईंट आहे. ज्याद्वारे आपल्याला आउटलूकसरखेच ईमेल्स पाठविणे, रिसिव्ह करणे वगैरे फंक्शन्स वापरता येतात.




३.Accel हे जवळ जवळ MS Excel सारखेच आहे.यात तुम्हाला मायक्रोसोफ्ट एक्सेल आणि ओपन ओफीस स्प्रेडशीट ची जवळपास सर्वच वैशिष्ट्ये आढळतील.




४.Windows Explorer चा वापर आपल्या संगणकातील सर्व ड्राईव्हस आणि त्यांतील फोल्डर्स तसेच विविध फाईल्स एकत्रितरित्या पाहण्यासाठी केला जातो.





५.Desktop search and Find Engine मध्ये तुम्हाला फ़ाईल्स आणि फ़ोल्डर्स शोधता येतील, म्हणजेच आपला नेहमीचा सर्च पर्याय जो आपल्याल Start -----> Search येथे मिळतो.




६.Surf The Internet वर क्लिक केल्यावर तुमच्या संगणकातील Default Internet browser, Default Homepage सकट उघडेल.





७.PDF Memo Creator एक उत्तम पी डी एफ़ क्रिएटर आहे.ज्याद्वारे तुम्ही PDF (Portable Document Format) या प्रकारचे डोक्युमेंट कोणत्याही अन्य सोफ्टवेअरशिवाय बनवू शकता.




८. Envelope Printer ही सुविधा खास करून ज्यांना Envelope वर पत्ता किंवा नाव छापायचे आहे त्यांना उपयोगी पडेल.





९. Instant Messenger म्हणजे एक प्रकारची लॅन मेसेजिंगची उत्तम सोय असणारी सुविधा या प्रणाली मध्ये कार्यरत आहे.




१०. My Address Book मध्ये आपण आपले कोण्टेक्ट्स साठवू शकतो अगदी मायक्रोसोफ़्टचे Address Book असते की नाही तसेच.या मध्ये आपल्याला Export चा पर्याय देखील उपलब्ध आहे,





११ .My Note Book ही अगदी छोटी सुविधा आहे, पटापट Dictation घेताना किंवा काही नोट्स लिहिण्यात नक्की कामी येऊ शकते.




१२. My Money म्हणजे तुमचे पेटी केश बुकच समजा.तुमचे पैसे आले किती आणि गेले किती याचा हिशोब अगदी रिपोर्ट सकट देणारी एक अनोखी सुविधा होय.





१३. Agnot Security Box मध्ये तुम्ही तुमची कुठलिही फ़ाईल ४ अंकी पासवर्ड देऊन सुरक्षित करू शकता, तसेच त्याच फाईलला पासवर्ड काढून मुळ स्वरुपात देखील आणू शकता.




१४. EZPhoto Editor मध्ये तुम्हाला इमेज एडिटींगची साधी, सरळ आणि सोपी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.





१५. Windows Clipboard हि सेवा तुम्हाला क्लिपबोर्ड वर तुम्ही काय केले ते दर्शवते याचाच वापर आपल्याला कट, कोपी पेस्ट च्या कामात होत असतो.(तुम्ही कट /कॉपी केलेला मजकूर तुम्ही रिफ्रेश करेपर्यंत क्लिपबोर्डवर साठून राहत असतो)




१६. File Printer हि सेवा .prn नावाच्या प्रिंट फ़ाइल्स थेट प्रिंट आऊट देण्यासाठी वापरता येते.




१७. Tetris D नावाचा एक पारंपारिक आणि छोटा गेम देखील या प्रणालीत समाविष्ट आहे.



१८. My Calender Diary ही सुविधा म्हणजे आपली दैनंदिनीच आहे , आपल्या पुढील कार्यक्रमाची नोंद आपण यात करू शकतो.




इतक्या सगळ्या गोष्टी एकाच सोफ्टवेअरमध्ये आणि तेही एका क्लिकवर ....आहे की नाही भन्नाट ! हे सोफ़्टवेअर म्हणजे मला आत्तापर्यंत सापडलेल्या दुर्मिळ सोफ़्टवेअर्सपैकी एक आहे. एकतर अशी सोफ़्टवेअर्स फ़ार कमी असतात किंवा मग आली तरी ती जास्त लोकप्रिय होत नाहीत का कुणास ठाऊक पण हे सत्य आहे. जितकी प्रसिद्धी मायक्रोसोफ्ट ओफ़ीस किंवा ओपन ओफ़ीस ला आहे त्यापेक्षा कितीतरी पट उत्तम सोफ़्टवेअर्स या माहिती मायाजालावर उपलब्ध आहेत. पण आपला हात मायक्रोसोफ़्ट आणि ओपन ओफ़ीस सारख्या बऱ्या सोफ़्टवेअर्सवर बसल्याने आपण नविन सोफ़्टवेअर शोधतच नाही ब-याचदा, आणि यामुळेच कदाचित SSuite Office सारखी छोटी पण महत्त्वाची सोफ़्टवेअर्स कोणी ढुंकनसुद्धा बघत नाहीत...

आपण हे सोफ़्टवेअर नक्की वापरून बघा, खात्रीपूर्वक सांगतो तुम्हाला ते नक्कीच आवडेल आणि

हे छोटे पण भन्नाट सोफ्टवेअर आपल्याला कसे वाटले ते मला जरूर कळवा.

प्रथमेश सुरेश शिरसाट

## जागतिकीकरणाच्या खेळात कामगारांची गळचेपी

नव्या युगाच्या जागतिकीकरणात आज 'कामगार' खाजगीकरणाच्या गोंडस नावाखाली सर्वत्र भरडला जातोय. मुंबईतील गिरणीकामगार नेस्तनाबुत झाल्या नंतर आजमितीस येथील कामगार नव्या जिद्दीने आणि नेटाने उभा राहतोय हेई नसे थोडके असे म्हणावे लागेल. अनेक कारखाने 'बाजारबासल्या' कारणांनी बंद करून कंपनी मालक त्या जागेत मोठ मोठाले टोवर्स आणि मौल बांधत आहेत.अशा पद्धतीने 'कामगार' देशोधडीला लागत असताना देशातील राजकारणी खुशाल अंधपणाचे ढोंग घेऊन अजगरासारखे सुस्त पडले आहे. नवनवीन धोरण राबविताना औद्योगिक धोरणाबाबत कमालीची उदासीनता व व्यवहारशून्यता आज दिसते. हजारो कामगार संघटना जन्माला येत आहेत, परंतु शेठजींच्या दावणीला स्वतःस बांधून सदर काही संघटना कामगारांनाच तारक नव्हे तर" मारक" ठरत आहेत.

कामगार मग तो तळागालातला वेठबिगारी असो की मोठ्या कारखान्यात अधिकारी म्हणून कार्यरत असो.कामगार धोरण यशस्वीरित्या न आखल्या मूळे नोकरीच्या व मिळकतीच्या टांगत्या तलवारीची ब्याद घेऊन जगत आहेत.अशा प्रतीकुल अवस्थेत कामगार आज जगत असताना नव्या धोरणांनी त्याला उभारी देण्याची नितांत गरज केंद्र सरकारने घेतली पाहिजे.

देशातील कामगार हा राष्ट्राचा मुलभूत पाया म्हणून समजाला जातो.राष्ट्राच्या प्रगती व विकासात "कामगार"हा सिंहाचा वाटेकरी म्हणून गणला जातो ,पनाज कामगारांच्या व्यथा आणि समस्या जाणून घेण्यात कुणाला "सोयरसुतक"वाटत नाही.

आज मुंबई शहरात गिरण्यांच्या जागेवर मोठे मौल्स आणि उच्च किमतीचे वसाहतीचे टोवर्स उभे रहात आहेत.नागरी समस्या पायदळी तुडवून आणि कोणतीही आचारसंहिता न पाळता "टोवर्स" उभे रहात असताना पाण्याचा प्रश्न ,मलनित्सरणाचा प्रश्न ,वाहतुकीचा प्रश्न आ वासून निर्माण झाले आहेत .मुंबईत थोडा पाऊस पडला तरी मुंबई "जलमय"होऊन जाते ,हेच त्याचे प्रत्यंतर नव्हे काय?

एकेकाळी कामगार नेत्यांचा एक वेगळाच दरारा या गिरणी मालकावर होता.कामगार नेत्यांनी कामगारांच्या अनेक न्याय मागण्यासाठी संप व बंद च्या लढ्यातून अनेक लढे यशस्वी करून दाखविले आहे मुंबई शहरात मोल्स व टोवर्स यांना विरोध व्हावा हि अपेक्षा असताना सदर मोल्स मध्ये भूमिपुत्रांना नोकरया मिळाव्यात म्हणून आंदोलने होत आहेत ,या सारखे दुर्दैव ते कोणते .केंद्र -राज्य सरकार आर्थिक धोरण राबविताना ज्यावेळी आर्थिक जमेचा निकष लावूनधोरण राबविते.त्याचप्रमाणे येथील औद्योगिक धोरण राबविण्यात यावे यात कटाक्षाने व प्रामुख्याने "कामगार "हा मुख्य घटक निकष म्हणून गणला जावा.

आज "कामगार" देशोघडीला लागत असताना देशातील मात्तबर प्रामाणिक कामगार संघटना व त्यांच्या कामगार नेत्यांनी आपआपसातले मतभेद बाजूला ठेऊन एकत्र येऊन ,देशाला व कामगारांना "तारक"ठरेल असे कामगार धोरण राबविण्याकरिता दिशा व आंदोलने उभी करावीत अन्यथा...... "कामगार मेला तर राष्ट्र मेले !!कामगाराविना राष्ट्रगाडा न चाले !!!" असे खेदाने म्हणावे लागेल.

मंगेश धोंडी गावडे

## मेंडी कोट

माझ्या घरापासून office चं अंतर २७ km . company ची बस असते घरापासून. जवळपास १ तास लागतो जायला आणि संध्याकाळच्या traffic मुळे यायला सव्वा ते दीड तास लागतो.

१ तास नुसतं म्हणायचा अवकाश, लोकं आ वसतात. पण माझ्यासाठी, माझ्यासाठी म्हणण्या पेक्षा माझ्या group साठी हा १ तास कसा जातो ते कळतच नाही कधी.

आता रोजचा वेळ कसा जातो ते कळत नाही याचं कारण म्हणजे पत्ते. आम्ही (म्हणजे आमचा "मेंडी कोट" group) रोज जाताना आणि येताना मेंडी कोट खेळतो. मेंडी कोट हे पत्त्यातील एका खेळाचे नाव.

तर पुढे जाण्या आधी या मित्रांची तुम्हाला थोडक्यात ओळख करून देतो.

पहिला आणि बहुतेक सगळयांत जुना खेळाडू म्हणजे नितीन. आता सध्या तो आमच्या company मध्ये नाही. काही महिन्यांपूर्वी त्याने company बदलली. सध्याही आम्ही भेटतो तसे. कधी सकाळचं फिरायला, कधी trek ला, तर कधी कधी sandy च्या घरी पत्ते खेळायला. (sandy ची ओळख नंतर करून घेऊच. कारण त्याच्याशिवाय हा group पूर्ण होत नाही. कसं ते पुढे कळेलच तुम्हाला.)

पुढचा गडी प्रथमेश. हा नितीन ला replacement . हा ही माझ्या सारखाच fresher join झाला होता company मध्ये. आणि माझ्या सारखाच यालाही पोरांनी (आणि पर्यायानी मी ही म्हणा हवं तर) या group मध्ये ओढलं. हो पण आता तो ही चांगल्यापैकी खेळतो. मुख्य म्हणजे तो आता आमच्याच team चा एक हिस्सा झाला आहे. सगळे म्हणत असतील पोरांना बिघडवायची कामं यांची. असो... बोलणारे बोलताच राहणार. आपण त्यांची तोंडं बंद करू शकत नाही.

या पुढचा गडी सचिन. या खेळत पटाईत. खेळातही आणि अजूनही बऱ्याच गोष्टींत. हा म्हणजे गोपिकांमाधला कान्हा (एकेकाचं असतं आता नशीब). फक्त बस मध्ये हा आमच्यात असतो. बाकी सारा दिवस काही विचारायला नको. त्याच्या team मधल्या colleagues ना ही हा कुठे आहे याचा कधी पत्ता नसतो. तसं याचं लग्न झालंय बरं का मित्रानो. आणि... त्याला एक मुलगा सुद्धा आहे. बसला ना ऐकून धक्का... याची अजून एक खासियत म्हणजे याला सगळे mobile numbers तोंड पाठ आहेत. आणि त्यामुळेच तो शक्यतो मुलींचे numbers save करून नाही ठेवत. आहो एवढेच न्हवे तर याच्या बायकोचा number पण याच्या mobile मध्ये नाही मिळणार तुम्हाला. तुम्ही कधी याला phone केलात आणि silent वर असल्यामुळे त्याला कळालं नाही आणि त्याने तो उचलला नाही, तर त्याच्या कडून return call ची अपेक्षा ठेवू नये (अर्थात हे फक्त मुलांसाठी सांगतोय मी हो...). काय करणार आता चालायचंच.

या खेळातला महारथी म्हणजे संदीप (Sandy). हा एक अजबच प्राणी आहे. याला predict करणं म्हणजे अशक्यातली गोष्ट आहे. आत्ता एक तर पुढच्या क्षणाला एक असतो हा. मगाशी म्हणालो होतो मी तुम्हाला की याच्याशिवाय हा group पूर्ण होत नाही. कारण या खेळातला हा तेंडुलकर. समोरच्या team वर ४८ कोट चढवल्याशिवाय याला चैन नाही पडत. समोरच्याच्या हातातल्या पानांचा अंदाज अगदी अचूक बांधतो. कोण कुठली उतारी करेल याची आधीच कल्पना असते त्याला आणि त्या प्रमाणे तो आपली खेळी खेळतो. पण जेंव्हा स्वतःवर कोट चढणार आहे असा लक्षात येतं तेंव्हा मग साहेबांची चिडचिड व्हायला लागते. शेवटी खेळच तो. आणि खेळत हे सगळं चालणारच. आपण चलूयात पुढल्या खेळाडू कडे.

त्याच्या तोडीस तोड म्हणजे मनोज. हे दोघे एका team मध्ये असले तर तो डाव एकतर्फी होतो. आणि विरुद्ध team मध्ये असले तर मग काही विचारायलाच नको. डावाच्या शेवटच्या उतारी पर्यंत हा गडी कधीही समोरच्यावर डाव पलटवू शकतो. त्याच्या team मधला एखादा खेळताना चुकला, तर मग हमखास याच्या तोंडून वेडंवाकडं निघणारच. मग आजूबाजूला कोण बसलंय याचा काही विचार नाही. लोकांनाही ते ऐकून आता सवय झालीय. याच्या बद्दलची आणखी एक गोष्ट म्हणजे याला आम्ही इथला visiting employee म्हणतो. कारण हा जास्त काळ US ला आणि कमी काळ India मध्ये असतो.

पुढचा गडी म्हणजे स्वप्नील. आमचा गणपती. हा एकदम साधा आणि भोळा (दिसायला फक्त हो). याचं ही लग्न झालंय. याचं निम्मं लक्ष खेळात आणि निम्मं कुठे असतं कोणास ठाऊक. Office मध्ये पण कधीही याला भेटाल तर तुम्हाला तो कुठेतरी फिरताना आणि phone वर दिसेल. पण ते ही कामाबद्दलच (असं तो म्हणतो). खाणे हा त्याचा weak point आहे. त्याला खाण्यासाठी कधी आग्रह करावा लागत नाही आणि कधी विचारावही लागत नाही. शेवटी जो पोटभर खात नाही तो ब्राम्हण कसला. नाही तर आम्ही बघा, नुसते

नावालाच... असो...

स्वभावानी म्हणाल तर सगळे इतके चांगले आहेत की एकमेकांसाठी काहीही करतील. आम्ही सारे जण एकमेकांच्या आयुष्याचा एक भाग असल्यासारखे आहोत.

मगाशी जसं मी म्हणालो की रोज जाताना आणि येताना आम्ही पत्ते खेळतो. बस मध्ये आमच्या शेवटच्या ६ seats ठरलेल्या असतात. या एका तासात जी काही धमाल, मस्ती, आरडा ओरडा असतो ते विचारू नका. मग बाकी लोकांशी आमचं काही घेणं देणं नसतं. इतके मग्न असतो आम्ही खेळात. हां आता कधी कधी तसं लक्ष उडतं खेळातून सगळ्यांचंच, जेंव्हा एखादी नवीन मुलगी बस मध्ये येते (अर्थात सुंदर असली तरच). पण तेही काही क्षणांपुर्तच. नंतर परत आपल्या खेळात मग्न असतो आम्ही. गैर समज नका करून घेऊत हं. सुंदर गोष्टींकडे माणसाचं नकळतच लक्ष वेधलं जातं. तसा काही टवाळ पोरांचा group नाही आमचा. सारं काही असतं ते timepass , तेवढ्यापुरतच.

अर्थात काही लोकांना या आरडा ओरड्याचा त्रास होत असावा. कारण त्यांच्यासाठी बस म्हणजे रात्रीची अपुरी राहिलेली झोप पुर्ण करण्याचं ठिकाण. असो... काय करणार! पर्याय नाही. एखाद्या नवीन येणाऱ्या व्यक्तीला तर हमखास त्रास होतो या सगळ्याचा (त्यासाठी आम्ही दिलगीर आहोत). पण हळूहळू सवयीचं होऊन जातं सारं. कारण मगाशीच बोललो मी... पर्याय नाही!

इतर बस मधले जरी कधी आमच्या बसला आले की ते ही हेच म्हणतात की त्यांचा रोजचा प्रवास खूप कंटाळवाणा असतो. असा एखादा group आमच्या पण बसला असायला हवा होता.

खरं बोलायचं झालं तर सकाळची ती refreshment असते आमच्यासाठी. इतकंच न्हवे तर दिवसभराची कामाची मरगळ झटकून संध्याकाळीही आम्ही परत डाव मांडून तयार असतो.

बरं आता तुम्ही म्हणाल सगळ्यांबद्दल बोलून झालं याचं पण स्वतःबद्दल काय? माझं नाव संचित. मी या खेळातला सगळ्यांपेक्षा कच्चा खेळाडू. आणि तसंही आता माझ्याबद्दल मीच काय बोलणार. कधी जर योगायोगाने यांच्यापैकी कोणाला जर तुम्ही भेटलात तर त्यांनाच विचार ना... माहिती आहे शिव्याच घालतील ही पोरं माझ्याबद्दल. पण चालायचंच ते सगळं. शेवटी मित्र आहेत ते माझे. मग आता कधी तरी येऊन बघा आमच्या बसला. हो पण एक गोष्ट लक्षात ठेवा - तुम्ही जर झोप पुर्ण करण्याच्या दृष्टीने बस मध्ये येणार असाल तर मग ती होईलच याची guaranty नाही. तर मग मंडळी, भेटू कधी योग आला तर. तो पर्यंत आमच्या सगळ्यांचा राम राम तुम्हाला...

✍ संचित प्रमोद कुलकर्णी

## वादळ !!

"विशाखा, मी वेगळी होतेय " अजूनही आठवतो दिवस !! पायाखालची जमीन सरकवणारा !! एखाद्या भयानक स्वप्नासारखे ते क्षण !!

का बोलली असेल ती अस? पेक्षा ती अस बोलूच कस शकते?जिची सकाळ प्रिया व मनूच्या नवान सुरु होते आणि दिवस रात्री ११ - १२ वाजता नवऱ्याला  गरम गरम पोळया खावू घालून संपतो अशी माया!!

आमच्याकडे आल्यावर सतत धांगडधिन्गा घालणारी माझी मुल आणि त्यांच्यासोबत TV कॉम्पुटरवर यथेच्च मौज करणाऱ्या आमच्या कुटुंबाला "Study and carrier first " अस म्हणणारी , मी तुझ्या मुलांना कधीच अभ्यास करताना पाहत नाही अस म्हणणारी, माझ्या social work आणि क्लबिंग्सला नेहमी नाक मुरडणारी, तासंतास workout करून सासूला देवळात घेवून जाणारी - एक कर्तव्यदक्ष आई, बायको, सून !! मग एकाएकी अस काय झाल असेल?

वाईट मनु आणि प्रीयाबद्दल वाटत होत . त्यांचे केविलवाणे चेहरे डोळयासमोर नाचत होते. निदान त्यांच्याकरता तरी...............

"त्यांना कळेल मोठ झाल्यावर कि आपल्या आईची काहीच चूक नव्हती" तीच उत्तर.

Hmmmmmm .... मोठी झाल्यावर तर सगळीच शहाणी होतात निदान शहाणपणाचा आव तरी आणतात पण हिची हि छोटुली दोन पाखर लहानपणीच मोठी होणार आई असून आईविना !!नुसत्या विचारांनी डोक बधीर झाल.

मुलांनी दार उघडल्यावर लक्षात आल कि आपण घरी आलोय. मुलांना घट्ट मिठी मारली ....डोळयातून केव्हा पाणी सुरु झाल कळल देखील नाही. रविवार असल्यान समीरच खोलीत वाचन सुरु होत "माया वेगळी होतेय " जणू काही माझच घर माझ्यापासून दुरावतय अस वाटायला लागल्याने ओक्साबोक्शी रडली. रविवार असून घरातील वातावरण क्षणात सुतकी !!

"आई पागल झाली का ग माया aunty ? आपल्या बाळांना सोडून जातात का कुणी कधी?" प्रतीशचा प्रांजळ प्रश्न.

"विशाखा तुझ्याकडे असल्या कितीतरी cases येतात" सासुबींचा समजावणीचा सूर ...........

"पण हि case नाही आई, तुम्हाला कस सांगू? तीने "वेगळी होते" म्हटल्यावर तिच्या भावान अक्षरशः मारलं तिला.... तिच्या चीमुर्ड्यांसमोर!! राग प्रत्येकालाच येतो पण त्याच हे असल प्रकटीकरण? सुशिक्षित उच्चभ्रू घरात हा असला अमानुष प्रकार?? पार पार हादरलेय मी आज !! आणि येव्हढ सगळ मला कळूनही थरथरत्या हातानी तिचा हात हातात घेवून मी तिला म्हटले ,"माया निदान प्रिया - मनु करतातरी.... "

ती मात्र पक्की ,"विशाखा, No one is there with me. माझा नवरा, माझी आई, माझे वडील, भाऊ, सासू,........ एकटी असूनही मी डगमगली नाही आणि तू माझा आधार आहेस तूच जर रडत बसलीस तर मी कुठे जावू? मला तुझी साथ हवीय या सर्वात !! खंबीरपणे उभ राहायचंय तुला माझ्यासोबत .......

सतत कानावर आदळत होते ते शब्द आणि प्रत्येक शब्दात त्या चिमुकल्यांचे चेहरे !! माझ्या डोळयांसमोर माझ्या मैत्रिणीचा संसार मोडतांना दिसतोय आणि मी खंबीर राहायचं? कुठून आणायची शक्ती? कुठून आणायचं बळ ? जिथ डोकच बधीर झाल तिथे कसा होणार विचार?

दोन दिवस नुसता विचार करून हिम्मत बांधली आणि फोन हातात घेतला...

" माया आहे?"

"नाही ती ऑफिसला गेलीय, तिच्या सेलवर कॉण्टेक्ट " नेहमीच्याच नम्र स्वरात कुमार - मायाचा - नवरा !!

"पण मला तुमच्याशीच बोलायचं," त्याला सरळ विचारल " काय झाल? मला जरा सविस्तर सांगशील?"

मग त्याच पुराण सुरु झाल..............मी किती छान, माझी काहीच चुकी नाही, तासभर स्वतःच कौतुक !!

" तीन flat बुक केलेय शिफ्ट होते म्हणतेय दोन दिवसात , तुझ्याशी काही बोलली ती?" मी मुद्द्यावर आणत म्हटल.

" आमच्यातील संवाद कधीच संपलाय विशाखा. आम्ही एकमेकांना mail करतो किवा SMS "

"भांडण किवा काही वाद?"

"तो प्रश्नच नाही, तुला तर माहितीच आहे कि ती बोलत असतांना कोणी बोललेले तिला चालत नाही. तरीही मी तिला तिच्या डोळ्यासमोर नकोय. She hates me like anything.मी diamond necklace दिला तिच्या वाढदिवसाला ........ तीन तो box उघडूनदेखील बघितला नाही. तिच्याकरता nano बुक केलीय !! और क्या करेगा कोई????"

"विशाखा, आपण family counceller कडे जायचं? मी गेलो होतो पण ते दोघानाही या म्हणतात. मी दिसलो कि तिची तळपायाची आग मस्तकात जाते..... कस जाणार दोघ? मी वाटल तर बाहेरगावची नौकरी पाहीन पण ती तुझ्या जवळची आहे म्हणून सांगतो तिला थांबव for my two little angels. please help me. " 12 -13 वर्ष एकत्र संसार केल्यावर अस काय झाल असेल? पुन्हा विचारांचं थैमान!!

" विशाखा तुला एक सांगू का? त्या मद्रास्यानी (कुमार) काहीतरी जोरदार लफड केल असणार " आमच्या नवरोजिच प्रामाणिक मत !!

हे सार वर्षभरापासून सुरु होत आणि मला का नसेल सांगितलं याबद्दल मायाने काही ? राहून राहून वाईट वाटत होत अगदी शुल्लक शुल्लक गोष्टींकरता फोन करणारी माया , हे प्रकरण इतक समोर गेल तरी का नसेल सांगितलं मला? Diamond Set बद्दल कुमारने जे काही सांगितलं ते धादांत खोट होत !! कारण त्याच्या Promotion च्या पार्टीत तिने तो सेट घातला होता !! मग खर कोण ? चांगुलपणाचा मुखवटा घातलेला कुमार कि तोडफोड बोलून निर्णयाला पोहोचलेली माया? कुमार म्हणतोय कि त्याच्याच शिफारशीने तिला नौकरी मिळाली , पण नौकरी मिळाल्यावर ती financially Independent होवून घर सोडणार हे माहित असतांना त्याने तिला का नौकरी मिळवून दिली?

वादळ विचारांचे नुसते वादळ !!

"Vishakha can I talk to you now if you don't mind?" सकाळी साधारण १० वाजता कुमारचा फोन !!

"Yes please"

" तिने तुला काय कारण सांगितलं वेगळ व्हायचं? तू तीला कारण विचारलच असशील ना? माझ किवा माझ्या आईच काही चुकल का? आम्ही दोघाही तयार आहोत माफी मागायला पण तीन एकदा तरी आमच्याशी बोलाव अगदी यंत्रयावत वागतेय ती !! घरात मुलांना शाळेचाच tiffin लावलाय ते शाळेत गेले कि लगेच हि Gym आणि तेथूनच ऑफ़िसला निघून जाते. गेल्या १३ वर्षांपासून घरावर तिचंच साम्राज्य आहे. स्वयंपाकघरातील कितीतरी गोष्टी आईला माहित देखील नाहीत. तरीही आईची काहीही तक्रार नाही फक्त मायाने घर सोडून जावू नये. मला कारण सांगतेस का?"

माझ डोक अजूनही जडच !! काय कप्पाळ कारण सांगणार याला? जी कारण मला तिने सांगितलेली आहेत ती जरा तरी valid आहेत का? तरीही तो इतकी गळ घालतोय म्हणून सांगून टाकल........ "तुम्ही तिला फिरायला घेवून जात नाही, shopping लाही नाही आणि तिच्याशी गप्पाही मारत नाही"

कित्ती लाजिरवाणी कारण ....... मला वाटल कि या कारणांवर कुमारही हसेल पण ............. त्याच आयुष्यच एक विनोद बनलेलं तो हसेल तरी कसा?

बिच्चारा स्थितप्रज्ञ !!

मी जेव्हा हि कारण नाव बदलवून मैत्रिणींमध्ये सांगितली तेव्हा त्या अक्षरश: गडगडल्या " Nothing Vishakha its an extra marital affair !!"

Extra marital affair? आणि माया ??? शक्यच नाही तेव्हा तर तिला job पण नव्हता आत्ता आठ दिवसांपूर्वी लागलाय. हे प्रकरण तर १ वर्षापासून सुरु आहे. ती कुठेही socialising ला जात नाही फक्त Gym आणि swimming . ज्या काही आम्ही ५-६ तिच्या मैत्रिणी आहोत तेव्हढ्याच आणि आमचे सर्वांचे नवरे intact आहेत.

मग???

कुमारच फोनवर बोलण सुरूच होत " कैसे और कब ले जाता उसको बहार? सकाळी मुल शाळेत गेल्या गेल्या ती gym मध्ये जाते, मी office ला जाईपर्यन्तही थांबत नाही. संध्याकाळी घरी आल्यावर मुलांचा टेनिस आणि गाण्याचा क्लास!! आणि तिथून आल्यवर मुलांचा अभ्यास. शोपिंगला तिच्यासोबत गेलो तर माझी एकही गोष्ट तिला आवडत नाही दुकानदारासामोरही माझा पाणउतारा करायला मागे पुढे पाहत नाही म्हणून तिला म्हटल कि तुझ्याकडे क्रेडीट कार्ड आहे गाडी आहे आणि ड्राईव्हर हि तर यात माझ काय चुकल?

Hmmm ............. लग्न झाल्यावर १३ वर्षांनी या सर्व गोष्टी? पहिले दोन तीन वर्ष ठीक पण ....................या गोष्टी फक्त मायाच्या घरातच नाहीत तर घरोघरी दिसतात. स्पर्धेच्या युगात आपण इतक धावत असतो कि आपल्या कर्तव्यांसमोर आपली माणस आपल्यापासून कधी दुरावलीत हे कळतदेखील नाही . जिथे दोन माणसातला वाद / संवाद संपतो तिथे ते नात तुटत म्हणतात.

पण हे कारण असू शकत का?.............

मग.............. दोन दिवस माझ मायाला ब्रेन्वाशिंग कारण सुरु झाल - तिला प्रत्यक्ष भेटून, फोनवर, SMS जस शक्य होईल तस मी तिला तासभराच्या वर एकट राहू दिल नाही जोपर्यंत तिनी मला कबुल केल नाही कि ती १५ दिवसांनी शिफ्ट होईल म्हणून !!

"आजच मरण उद्यावर टळल "

मलाही विचार करायला वेळ हवा होता.

अचानक फोन वाजला display नाव वाचून मला आश्चर्यच वाटल.

'स्मिता??' आणि मला फोन?? अगदी प्रत्येक निरोप मायाकडून माझ्याकडे पाठविणारी स्मिता आज मला फोन ??

" Hi dear!! Smita here!!"

"Hi how are you?"

हे हाय हेल्लो झाल्यावर हळू हळू स्मिता राणी मूळ मुद्द्यावर आल्यात " मला आणि मायाच्या आईला तुला भेटायचं आहे. उद्या येवू? "

"आनंदानी!! दुपारी १२ नंतर कारण १२ वाजता समीर office ला जातो आणि ४ च्या आधी कारण ४ वाजता माझी मुल घरी येतात !!"

मनात पुन्हा प्रश्न - मला हे सर्व माहित झाला हे हिला कोणी सांगितलं? मी जे काही कुमारशी बोलले त्यातील शब्द न शब्द !!

दोघीही दुसऱ्या दिवशी माझ्या घरी आल्या . नुसते कुमारचे गुण तो कित्ती चांगला आहे ...........१ तास !!

" काकू, एक विचारू? हे सर्व ठीक आहे पण का मारलं अतुलनी(मायाचा भाऊ ) मायाला?असल्या प्रकरणांनी गोष्टी चिघळतात" मी सरळ मुद्द्यावर !!

तिची आई एकदम तडकलीच !! माझ्याकडून या प्रश्नाची अपेक्षाच नव्हती त्यांना. " तुला काय माहिती विशाखा? त्यादिवशी झाले ते? मायाकडे पूजा होती आम्ही पूजा आटोपून आमच्याघरी येत नाही तेच कुमारचा फोन आला कि हि घर सोडून जातेय आत्ता आवरासावर सुरु झालीय, मग मी आणि अतुल दोघही तसेच वापस गेलो तिला समजावले पण ती ऐकायला तयारच नाही शेवटी अतुलने हात उचलला नाईलाजास्तव !! आई आहे मी तिची !! माझी काय अवस्था झाली असेल तू कर ना विचार? अतुलनी वडिलांचं कर्तव्य पार पाडलं बस !!"

मी स्तब्ध !! आमच्या आई अवाक !!

स्मितानेही मायाच्या आईची री ओढली

" तुला खर काय ते सांगतो आम्ही आता ............... तुला ती कधी हर्बल product बद्दल बोलली?"

"हो तिचे कोणी दोन मित्र आहेत म्हणाली gym मधले पण तिला नाही त्यात इंटरेस्ट "

"तू पाहिलस कधी त्यांना?"

"नाही"

"त्यातील एक बायकोला घेवून प्रियाच्या वाढदिवसाला आला होता एक लठ्ठ lady मायाच्या आईच्या बाजूला बसली होती "

"Didn't notice "

"तिचा नवरा आणि माया यांनी एकमेकांना 436 SMS केलेत दोन दिवसात !! गायत्रीचा नवरा Airtel मध्ये आहे न त्याच्याकडून माहिती काढली. हिने याच दोन दिवसात ५ लाख रुपये withdraw केलेत. म्हणून अतुलनी आणि कुमारनी तिच्यामागे detective hire केलेत."

माझी आणि आईंची स्तब्धता कायम !! माझा तर डोळ्यांवर आणि कानांवर विश्वासच बसत नव्हता.

"विशाखा, माझ्या मुलीला फसविल्या जातंय. हे काही प्रेम किवा लफड नाही ती कुठेतरी trap झालीय. आमच्याशी ती काही म्हणजे काहीच बोलत नाही तूच आता आमच्यातील दुवा आहेस"

"काकू मला थोडा वेळ द्याल? आता १५ दिवस तरी ती वेगळी होणार नाही अस मला सांगितल तिने . भरपूर वेळ आहे. आपण वेळ पडल्यास माझ्या काही seniors चाही advice घेवू. पण आपण सर्व एकमेकांच्या संपर्कात आहोत हे मायाला कळता कामा नये. देवावर विश्वास ठेवा सर्व व्यवस्थित होईल "

भरल्या डोळ्यांनी मायाच्या आईने आमचा निरोप घेतला.

"विशाखा, तू या प्रकरणात बिलकुल पडणार नाहीये हे सर्व विचित्र आणि गंभीर दिसतंय. समीरला जर कळल तर ओरडेल तुझ्यावर !!" सासूबाईन्चि प्रतिक्रिया !! " आई, please मी समीरपासून काहीही लपवित नाही हे तुम्हाला माहित आहे न? मला माझ्या पद्धतीने त्याच्याशी बोलू द्या या विषयावर. तो नाही म्हणणार नाही आणि त्याने जर नाही म्हटलेच तर मी सोडून देईन. पण मला एक सांगा यात प्रिया - मनूचा काय दोष? मी त्यांच्याकरता आता यात लक्ष घालीन. माझ्यावर विश्वास ठेवा."

<u>भाग 3</u>

"आई,आई , प्रिया - मनुची मज्जा आहे सध्या !! "

"???"

"त्यांच्या आई - बाबांमध्ये मस्त COMPETITION सुरु आहे. शनिवारी त्यांचे बाबा त्यांना IMAX ला घेवून गेलेत, सिनेमा नी Video GAMES रविवारी आई G .V .K त दोन दोन दिवस मज्जा मज्जा !! "

प्रतीशच्या या बोलण्यावर हसावे कि रडावे तेच मला कळत नव्हते. आई वडिलांचं SO CALLED भांडण मुल खरोखरच N -JOY करत होती का ? त्यांचे या प्रकारात सारे फाजील लाड पुरविले जात होते हव तेव्हा हव ते मिळत होत. महिन्यातून कधीतरी एकदा कुरकुरे /चिप्स खाणारे प्रिया - मनु आता रोजच त्यावर ताव मारत होते !! त्यांची Health Conscious आईदेखील Office मधून येतांना Burger पिझ्झा आणत होती.

"हे काय सुरु आहे कुमार ?" संध्याकाळी जेव्हा कुमारचा फोन आला तेव्हा मी त्याच्यावर खेकसलेच.

" तुम्ही त्या दोन चिमुरड्यांना का वेठीस धरलेय ??" तुमच्या अशा वागण्यान तुम्हाला काय सिद्ध करायचंय ? They are enjoying your break - up !! "मला आता काहीही सांगू नकोस विशाखा !! I am fed up of all these things !! विश्वास उडालाय माझा या सर्वावरून !! सर्व माझ्या सहनशिलतेबाहेर गेलंय." कुमार "काय झालं ?" मी "मला Notice पाठविलाय मायाने, ५०,००० रुपये महिना आणि २५,००० रुपये घरभाडे असे ७५,००० महिन्याला द्यायचेत तिला आणि पोटगी ६० लाख !! " "नशीब १ करोड नाहि मागितले कारण तिला माहित आहे तू ते देवू शकतोस ' " मला एक पैसा पण नाहि द्यायचाय तिला !! माझ्याशी हि असली कोर्टाची भाषा ?? कोण असेल तिच्यामागे ??? Still I believe she is innocent !! या सर्वांमागे कुणा दुसऱ्याच डोकं काम करतंय !!" "यामागे कुणाचंही डोकं वैगरे नाहीय कुमार !! मी रोज मायाच्या contact मध्ये आहे She is passing through psychological syndrome. यात माणूस कोर्टाची भाषा करत असतो नेहमीच !! याकरता ३ -४ कारण देता येतील - change in hormonal balance which always takes place at the age of 35 - 40 . Second Reason is sudden loss in weight due to over exercising which will lead to nervousness and Depression. या सर्व stages मधून जातांना तुम्हा दोघांमध्ये असलेली Communication Gap आणि तीचा

एककल्ली स्वभाव त्यामुळे सतत टोचणार Neglection !! ती नेहमीच तुमच्या आणि तुमच्या आईच्या गप्पा ऐकायची पण तिचा Ego तिला तुमच्यात येवून बसायला परावृत्त करायचा. Don't worry सर्व व्यवस्थित होईल. " कुमारच्या सततच्या फोन्स नि समीरच डोकं सटकल ," त्याला सांगून टाक विशाखा आता तिला psychiatric कडे घेवून जावून २ -४ shocks दे म्हणून आणि स्वतःही १-२ Shocks लावून घे ! वर्षभर बायकोने हात नाहि लावू दिला तेव्हा याची बुद्धी काय शेण खायला गेली होती कि काय ? and tell him that you receive professional calls only between 12pm to 6pm Don't disturb our private life " Through स्मिता, समीरचा निरोप कुमारपर्यंत पोहोचवला. स्मितालाही एक ना अनेक भरपूर प्रश्न " विशाखा, तू मायाशी रोज बोलतेस असं कुमार म्हणत होता !! सांगितलं का काही तिने तुला त्या सरदारजीबद्दल ?? तू विचारलस त्याच्याबद्दल ??? ते पाच लाख ??? वैगरे वैगरे .........." " नाव घेवून नाहि पण Direct विचारल होत तिला 'any crush ' म्हणून ?? तेव्हा तिने मला चांगलच उडवलं 'At this age?? Not finding interest in existing relationship why for one more ??' तसं नाहि काही दिसतंय, अग तो सरदारजी हर्बल प्रोडक्टचे काम करतो आणि तुला माहित आहे न हे लोक कसे हात धुवून मागे लागतात ??? एकाच दिवशी १० -१० वेळा SMS करतात 'जेवलीस का? काय जेवलीस ?' त्यात काही serious नाही पाच लाखांचं म्हणशील तर ते तिने तिच्या Salary Account मध्ये जमा केलेत Just as Security म्हणून तर तिच्यामागे Detective लावूनही कुमारला काहीही गवसलं नाहि " " विशाखा, एक मोठी पूजा घालतोय आम्ही !! मनुची शांत करायला खास केरळहून गुरुजी येताहेत. मायाच डोकं फिरलंय उद्याच घर सोडीन म्हणतेय काहीही करून तिला पुढल्या गुरुवारपर्यंत थांबव. तिने पूजेला नाहि बसलं तरी चालेल पण तीच घरी असण महत्वाचं, दिवसभर ऑफिसला गेलं तरी चालेल पण रात्री घरी परतण आवश्यक माझ्या मुलाकरता !!" कुमारचा कळकळीचा फोन !!" "Hmmmmmmm ...... तिला आज भेटतेय . Guaranty नाहि देत पण मंगळवारी तिचा flat रिकामा करायचाय. " "का ssss य ???? " तो अवाक झाला. "हो, आता मी जे सांगते ते लक्ष देवून ऐक. उद्या - परवा ती तुझ्याशी बोलायचा प्रयत्न करेल तुझ्याकडून तू सकारात्मक रहा तुझ्या उत्तरांनी तिचे समाधान होणार नाहि शंभर टक्के !! तरीही ती म्हणेल ते ऐकून घे !! कुठलेही लेखी करार करू नकोस पण तोंडी आश्वासने दे !! She is going through Psychological Crisis. तिचं नेलेल समान flat वरून माझ्या घरी आणतेय. हळू हळू ते तुम्हाला तुमच्याकडे दिसेल. त्याकडे दुर्लक्ष करा. धीर धरा सर्व व्यवस्थित होईल. माझ्या आणि मायाच्या रोजच्या भेटी सुरूच होत्या. तिला व्यावहारिक धोके समजावून सांगायचा रोजचा प्रयत्न . लग्न झालेल्या बाईने एकट रहाण किती धोकादायक, आणि तेही मुलगी असताना , घरी नौकर, ड्रायव्हर, आजकाल तर Tution Teacher चाही भरवसा नाहि !! तुला नसेल रहायचं कुमारसोबत तर तू प्रियाच्या खोलीत रहा. पण तुझं त्या घरात रहाण जरुरीच आहे !! तू तुझा विचार करायला स्वतंत्र आहेस मी जबरदस्ती नाहि करणार पण भावनेच्या आहारी जावून चुकीचे निर्णय घेतलेस तर होणाऱ्या परिणामांना सिद्ध रहा. आणि तू वेगळी झालीस तर तुझा साथ देण मला कठीण जाईल. जसं तुझ्या सासूला तू प्रेमाशी केलेली मैत्री आवडायची नाहि तसंच उद्या माझ्या सासून म्हटलं तर मी त्यांना विरोध नाहि करू शकणार म्हणूनच माझी आणि प्रेमाची फक्त हाय - बाय चि मैत्री आहे हे तुला माहितीच आहे." "पण विशाखा, तुला माहित आहे प्रेमाचं प्रकरण अगदी वेगळ आहे तिने घटस्फोट घेतल्यावर एका मैत्रिणीच्या नवऱ्याची रखेल राहाण पसंत केलं. " "कुठलीही प्रकरण वेगळी नसतात माया !! तुझे आई - वडीलही कुमारचीच तारीफ करतात आजही. वेगळी राहणारी Egoistic बाई !! हीच तुझी ओळख राहील. आता तुझा विचार तूच कर. जमल्यास एकदा कुमारशी समोरासमोर बसून बोलून बघ. तुझं मन दहा लोकांसमोर मोकळ करण्यापेक्षा त्याच्यासमोर मोकळ कर. तो तुला नाहि म्हणणार नाहि." "तो घाबरट आहे विशाखा, बदनामीला भितोय " " मग तेच सही माया, घे त्याच्या घाबरण्याचा फायदा !!आणि बोलून टाक जे तुझ्या मनात आहे ते. उगीच भाड्याच्या घरात रहाण्यापेक्षा स्वत:च्याच घरात रहा paying Guest सारखी पैसे घेवून !! म्हणजे तुला प्रिया - मानुकडेही लक्ष देता येईल." " मी विचार करून सांगते", माया. "आज बुधवार शुक्रवारी लंच सोबत घेवू. तोपर्यंत विचार करून ठेव. मंगळवारी ३० तारीख आहे महिनाही संपतोय.flat च भाडं बंद कर. तू रहात नाहीस तिथे. फुकट कशाला पैसा वाया घालवते ?? शिफ्ट करू सर्व सामान मंगळवारी !!" मी माझ्या आणि मायाच्या मैत्रीत आत बाहेर असं काहीही नसल्याने आमच tuning छान. पण आज तीच मैत्री मी पणाला लावल्याने स्वारी थोडी हादरल्यासारखी दिसली. दोन दिवस मी मात्र तिला फोनही केला नाहि. एकदम शुक्रवारी SMS केला १२ वाजता ," आपण भेटतोय मालगुडीत जेवायला एक वाजता " मी पोहोचली तेव्हा माया वाटच बघत होती. "काय ठरवलं आहेस?" मी "मी बोलले कुमारशी, तो होच म्हणणार होता. " माया "मग मंगळवारी सामान शिफ्ट करू . किती समान आहे ??' मी "दोन ऑटोत मावेल" माया "ठीक आहे माझ्या कारमधून करू शिफ्ट !!" मी "पण घरी कसं नेवू ? घरच्यांना काहीच माहित नाहि. मी थोडं थोडं सामान

हलवलय." माया "काही हरकत नाहि. माझ्या घरी ठेवू. सासूबाई ९ -९:३० ला झोपतात आणि समीर ११ ला येतो त्यावेळेत मी करीन manage ! डीक्कीतील सामान डीक्कीतच राहू देवू." सर्व ठरविल्याप्रमाणे झालं. मंगळवारी आम्ही मायाच्या Flat वर गेलो. तिचा तो flat पाहून मी तर flat च झाली. 2BHK with terrace Garden च्या प्रशस्त जागेत हि बाई एकटी राहणार होती !! म्हणून हिला ७५,००० रुपये महिना हवा होता.

तिचं सर्व सामान गोळा केलं आणि माझ्या कारमध्ये भरलं.

मायाच्या वेगळ होण्याला वेगळ वळण देवून !!

विशाखा समीर मशानकर

## रायगड दर्शन व त्यानंतरचा थरारक अनुभव

मी माझा एक मित्र दोघांच्या कुटूंबासह रायगड दर्शनासाठी गेलो.गडाच्या पायथ्याशी पोहोचल्यानंतर सह्याद्रीच्या उंचच उंच कड्यावर रायगडाचे एक टोक नजरेस पडले.रायगडावर मुख्य परंतु आम्ही रोप वे मध्ये बसुन रायगडावर पाऊल ठेवले.महाराष्ट्रातील एकुण ६५० गड्कोट किल्ल्यांपेकी सर्वात दुर्गम आणि गौरवपुर्ण किल्ला म्हणजे रायगड.हा किल्ला शके ७०५ इ.स.७८३ मध्ये राष्ट्रकुटच्या काळात बांधला गेला. महाड पासुन २४ कि.मी. अंतरावर काळ आणि गांधारी या नद्यांच्या विळख्यात हा अजस्त्र किल्ला दिमाखात उभा आहे.

सह्याद्रीच्या कुशीतील हा अभेद्य व बळकट किल्ला छ.शिवाजी महाराजांची वेभवशाली राजधानी म्हणून मानाने मिरवला. रायगडाला एकुण १४ नावे असल्याची माहीती मिळते.

१) रायरी,२) रायगीरी, ३) जंबूद्वीप ,४) राजगीरी, ५) तणस,६) राशिवटा, ७) इस्लामगड ,

८) रायगड , ९) नंदादीप ,१०) बंदेनुर ,११) भिवेगड, १२) रेड्डी १३) राहीर १४) पुर्वेकडील जिब्राल्टर.

(इंग्रजांनी ठेवलेले नांव) रायगड ही स्वराज्याची राजधानी असल्यामुळे तेथे १२ महाल आणि १८ कारखाने असे ३० विभाग होते. त्यमुळे प्रशासन व्यवस्थीत चाले. छ.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक इथेच झाला, त्यांचे सिहांसन बालेकिल्ल्याच्या मध्यभागी होते, हे सिहांसन ३२ मन सोने, हिरे, नवरत्ने जड्वलेले होते अशी माहीती मिळाली. रायगडाला एकुन ५ दरवाजे होते मुख्य दरवाजा म्हणजे चित दरवाजा, नाना दरवाजा, मशिदमोर्चा, महादरवाजा, चोरदरवाजा. रायगडाच्या चढ्णीची सुरवात चित दरवाजातुन होते.

छ.शिवाजी महाराजांची वेभवशाली राजधानी पाहताना अंगावर रोमांच उभे राहतात आपलं मन नकळत शिवरायांच्या काळात रायगड कसा असेल या विचारात रमुन जातं आणि मग शिवरायांचा गौरवशाली इतिहास आपल्या डोळयासमोर उभा राहतो.रायगडावर दरबाराचे प्रवेशद्वार होळीचा माळ, टकमक टोक, बाजारपेठ, ब्राम्हणवाडा, राणीमहाल,सरदारवाडा, जगदिश्वराचे मंदीर व जगदिश्वराच्या मंदीरसमोर रायगडावरील पृथ्वीमोलाचे लेणे राजे श्री शिवछत्रपतींची समाधी आहे. मुळच्या अष्टकोनी चौथ-यावर श्री शिवाजी रायगड स्मारक समितीने ही घुमटी बांधलेली आहे. आत महाराजांचा अर्धाकृती पुतळा आहे.

रायगडावरील सर्व बांधकाम श्री हिरोजी इंदुळकर यांनी पुर्ण केले, बांधकामाची बिदागी जेव्हा राजेंनी देवु केली त्यावेळी मला काहीही नको फक्त माझे नाव प्रवेशद्वाराच्या पायथ्याशी कोरण्यात यावे अशी मागणी इंदुळकरांनी केली , ’सेवेशी तत्पर हिरोजी इंदुळकर "असा शिलालेख आजही तेथे पहायला मिळतो.

निर्मनूष्य वरंध घाटात अवघड वळणे, रस्त्याच्या दुतर्फा दाट जंगल, रातकिड्यांचा किर्र.. आवाज आणि ह्रदयाचा थरकाप उडवणारा काळोख यातुन आमचा प्रवास सुरु झाला. घाटामध्ये एकही वाहन, माणूस, घर, होटेल, आमच्या नजरेस पडत नव्हते त्यामुळे कुटूंबीयांसह आम्हीही मनातुन घाबरलेलो होतो.यापुर्वीही आम्ही रात्रीच्या वेळी बराच प्रवास केलेला होता परंतु वरंध घाटातील अनूभव खुपच घाबरवून टाकणारा होता.प्रत्येक वळण संपल्यानंतर वाटायचे आता तरी सरळ रस्ता सुरू होइल व घाट संपेल,पण घाट संपायचे नांव नव्हते, प्रत्येक येणारे वळण सारखेच वाटायचे, हळूहळू वाटायला लागले की आपण रस्ता चुकलो आहोत, ते पाहण्यासाठी थांबण्याची हिंमत होत नव्हती आणि त्यात रस्ता निर्मनूष्य त्यामुळे कोणाला विचारणेही शक्य नव्हते,हळूहळु आम्ही देवाचा धावा सुरु केला, मध्येच आम्हाला मशालीसारखा एक प्रकाश दिसला , आम्हाला आमच्या पाठलागावर कोणीतरी असल्याचा भास होवु लागला, आम्हा सर्वांची भितीने गाळण उडाली, वाटायला लागले आता या घाटात आपली गाडी कोणी आडवली तर काय करायचे ? तब्बल एक ते दिड तास आम्ही त्या भितीच्या छायेखाली प्रवास करीत होतो, त्यानंतर तो प्रकाश दिसेनासा झाला, पुढे तब्ब्ल साडेचार तासाच्या मनाला गोठवून टाकणा-या वरंध घाटातील त्या जीवघेण्या प्रवासानंतर आम्हाला सरळ रस्ता दिसायला लागला, मग काही वेळातच भोर गांव लागले, आम्ही सुटकेचा श्वास घेतला.

भोरला रात्री साडेबारा वाजता बसस्थानकाजवळ एक आजोबा भेटले, त्यांना आम्ही पुण्याकडे जाण्याचा मार्ग विचारला त्यांनी कोठून आलात असा प्रश्न विचारला आम्ही रायगडावरुन निघुन वरंध घाटातुन आल्याचे सांगीतलेत्यावर ते म्हणाले रात्रीच्या वेळी वरंध घाटातुन कोणीच प्रवास करत नाही खुप धोकादायक आहे,तुमचे नशीब चांगले म्हणुन तुम्ही सुखरुप आलात, त्या घाटात यापुर्वी गाडी अडवुन मारहाणीच्या व गाडी घाटाखाली ढ्कलुन दिल्याच्या घटना घडलेल्या आहेत. हे ऐकल्यावर आम्ही गार झालो. शेवटी देवाचे आभार मानत आम्ही पुढील प्रवासाला सुरुवात केली..

अमोल देशमुख

## विरंगुळा कट्टा : निवृत्ती नंतरची शाळा

त्यादिवशी मला संध्यकाळी ५.४० च्या सुमारास मित्राचा कॉल आला की म्हणे त्याला काही कामास्तव मला भेटायचे आहे. त्याने मला त्याच दिवशी डोंबिवलील ६.४० ला भेटतो असे सांगितले ठिकाण होते फडके रोड वरील गणपती मंदीर. हा लेकाचा मला ६.४५ येतो म्हणाला. मी माझी नेहमीची गाडी पकडतो ५.५३ आसनगाव दादरवरून जी बरोबर ६.३५ ते ६.४० पर्यंत डोंबिवली नगरीत दाखल होते. आणि त्या दिवशीही ती ६.३५ ला दाखल झाली डोंबिवलीत. फडके मंदीर साधारण ५ ते ७ मिनिटांवर आहे डोंबिवली पूर्वेपासून. मी बरोब्बर अगदी sharp ६.४५ ला गणपती मंदीरासमोर पोहोचलो आणि या प्राण्याला फोन केला तर मला म्हणाला," सोरि, यार मित्रा मला जरा उशीर होईल यायला". मी विचारले," आधी नाही का सांगता आले का ?" आधी तर मला खुप राग आला होता वेळेच्या बाबतीत मी अगदी परफ़ेक्ट माणूस आहे मी कुठेही उशीरा जात नाही किंवा मला कोणी सांगितलेल्या वेळेत न आलेलं चालंत नाही. कारण वेळ ही महत्त्वाची असते सगळयांसाठीच मग ती कोणाचीही का असो ना, गेलेली वेळ पुन्हा येत नसते.पण मग त्याने गळ घातली म्हटल्यावर थांबणे भाग होते कारण कितीही काही झाले तरी दुस-याने केलेल्या विनंतीचा मानही मला दुखावता येत नाही. बरं ! आता इतकावेळ थांबून करायचे काय आणि नेमके त्यादिवशी मोबाईलचे इंटरनेट देखील बंद होते म्हणजे माझी चांगलीच गोची झाली होती. मंदिराला लागून दिसत असलेल्या एका एका गार्डन मध्ये जायचे ठरवले आधी मला वाटले की, ते गार्डन राजा राणी प्राईव्हेट लिमिटेड वाल्यांचे आहे की काय.. कारण जिकडे गार्डन तिकडे राजा राणी हे समीकरण होउन बसले आहे. पण मी जसा त्या गार्डन मध्ये गेलो तसा माझा अंदाज चुकीचा असल्याचे माझ्या दृष्टिस आले आणि गार्डन मध्ये शिरताना पाटी दिसली गार्डन वर त्यावर लिहिले होते विरंगुळा कट्टा. आत गेलो तेव्हा माझ्यापेक्षा जवळ जवळ तिप्प्ट वयाचे म्हणजेच साठीच्या पुढचे सगळे पुरुष् आणि महिला मंडळी दिसली आता तुम्हाला यात काय हे तर सगळीकडेच दिसते संध्याकाळी...पण मला त्याक्षणी जे काही दिसले , जाणवले तेच आता लिहित आहे.

मी गार्डन मध्ये गेलो तेव्हा नशीबाने मला बसायला बाकडे मिळाले. बाजूला दोन ज्येष्ठ गृहस्थ काहीतरी गप्पा मारत होते समवयस्कर दिसत होते..आपल्या मुलांबद्दल बोलत होते काही तरी याला अमूक ढमूक ठिकाणाहून ओफर आली आहे पण हा गधडा जात नाही वगैरे काही तरी विचारविनिमय रंगला होता त्यांचा. मी इतरत्र नजर फिरवली तेव्हा काही ज्येष्ठ महिला खाली गवतात गोल रिंगण करुन बसलेल्या मला दिसल्या. मी थोडे त्या बाजूचा कानोसा घेतला आणि त्यांच्या खास Ladies talk गप्पा सुरु होत्या माझी सुनबाई अशी माझी सुनबाई तशी,काही जणं आपल्या सूनबाईंचे गोडवे गात होत्या तर काही त्यांच्या नावाने नाक मुरडत होत्या.एकूणच ते वातावरण मात्र खेळीमेळीचे दिसत होते....जो तो आपले सुख:दुख मांडत असल्याचे मला दिसले ...काही जणं आपण आणलेल्या डब्यांतले खाद्यपदार्थ, चिवडा, खिचडी वगैरे एकमेकांना वाटून खात होते तर काही हळूच खिशातून चणे-शेंगदाणे काढून गुपचुप इकडे तिकडे बघून लपुनछपून खात होते... काही आपण कुठे कुठे तीर्थयात्रेला जाऊन आलो तिकडे आमच्या हिने / ह्यांनी काय घोळ घातला हे अगदी गळयात गळे घालून सांगत होते. काही वयस्कर मंडळी त्यांच्या वेळेची गाणी गुणगुणत बसली होते, आताच्या गाण्यांवरचा राग त्यांच्या गाण्यातील रागांतून जाणवत होता . काही वयस्कर मंडळी त्यांच्या मोबाईलबद्दलच्य शंका एकमेकांना विचारत ह्होत, अमुक एक फ़ंक्शन कसे वापरायचे, हे ब्लुटूथ काय आहे ? , आमचा कार्टा नेहमी त्या मोबाईल शी खेळत असतो, हे मोबाईल म्हणजे खेळणे अहे, पण यांतून इंटरनेट वगैरे ही वापरता येते, मोबाईलचे फ़ायदे आणि तोटे ,हा नंबर कसा सेव्ह करू, व्हिडिओ इकडून तिकडे कसा नेऊ वगैरे शंकाकुशंका चालू होत्या, काही नुसतेच इकडे तिकडे फ़िरत होते अगदी स्वच्छंदपणे ! तर काही आपल्या नातवंड पतवंड यांचे कौतुक करत होते तो/ ती काय करतो , किती हुशार आहे, अभ्यास कसा करतो , मस्ती कसा करतो, हट्ट कसा करतो असे सांगत होते.

एकंदरीत काय तर ते वातावरणच मुळी मला भावले, आपल्यापेक्षा वयाने, अनुभवाने, कार्याने, विचारांने कितीतरी मोठ्या व्यक्तिंच्या सान्निध्यात जाण्याचा हा दुर्मिळ योग त्या दिवशी माझ्या आयुष्यात आला आणि आता तो नेहमी यावा असे वाटते. कारण आयुष्यात अशा खुप काही बारिक सारिक गोष्टी असतात ज्यांतुन शिकण्यसारखे तर बरेच काही असते. पण दैनंदिन धावपळीत आपण त्यांकडे किती लक्ष देतो ह जरा विचार करण्यासारखाच मुद्दा आहे.

असो, तर ते चित्र बघून मला काहीतरी आठवले आणि अचानक मी १७ वर्षे मागे गेलो आणि बालवाडीतले दिवस आठवले. तेव्हा ही आपण असेच बोलायचो एकमेकांत मिळून मिसळून वागायचो. एकत्र बसुन डब्ब्यातील खाद्यपदार्थ खायचो. एकत्र गाणी म्हणायचो , एकत्र नाचायचो. माझे बालवाडीतले शिक्षण मुंबईतील ग्रँट रोड यथील सेवासदन शाळेत झाले. तिकडे केलेली मस्ती अजुन ही आठवते आणि मग नकळत अश्रु तरळतात, आणि त्या गार्डन मध्ये असतानाही तरळले. तेव्हा शाळेत असताना मला माझे बाबा कडेवर घेऊन शाळेत घेऊन जायचे आणि कधी कधी आई.. मी रडायचो शाळेत नाही जायचे म्हणून....पण तरीही आई मला शाळेत सोडायची. शाळेत गेलो की मग दंगा मस्ती करण्यात माझा पहिला नंबर होता. लहान शिशु वर्गातून मोठ्या शिशु वर्गात मी गेलो तेव्हा मला जे सर्टीफ़िकेट दिले ते अजून ही आहे. त्यात चक्क लिहिले आहे ,मुलगा हुश्शार आहे पण मस्ती करतो, बडबड्या आहे, मस्ती करतो, अक्षर सुधारावे, एका जागे वर नीट बसत नाही, वगैरे वगैरे. असो तर या गार्डन मध्ये आल्यावर मला असेच वाटले की मी एका बालवाडीत आलो आहे का माहित नाही. कारण एकंदरीतच ते वातावरण तसेच होते काहीसे...

एकीकडे गाण्याच्या भेंड्या चालू होत्या , तर दुसरीकडे पाककृतीवर महाचर्चा रंगली होती.. मोहोरीच्या जागी जि-याची फ़ोडणी दिली तर ही आमटी उत्तम होते .. किंवा मग आले लसणाची पेस्ट किती दिवस फ्रिजशिवाय राहू शकते किंवा तसे राहण्यासाठी काय काय करावे हे असे काही बाई कानावर पडत होते, म्हणजे पाककृत्या, टिप्स, गप्पा गोष्टी, गाणि, सामाजिक विषय, ताज्या घडामोडी, व्यायामाचे प्रकार, कपड्यांवर चर्चा, घरातली कामवाली माणसे ते थेट टपरीवरचे चायनीस कसे बनवतात यावर चर्चा. काही क्षण वाटले की Google सारखे प्रगत इंजिन यांच्या माहितीसमोर गळून पडेल इतकी प्रचंड माहिती आणि अनुभव यांतील प्रत्येकाकडे आहे. लहानपणी शाळेत आपल्याला शिकवलेले कसे आपण ज्याला काही अडत असेल त्याला समजावून सांगायचो अगदी तसेच काहीसे ही मंडळी आपल्या सहकारी मैत्रपरिवाला सांगत होती.

दुस-या एका ठिकाणी काही वयस्कर मंडळी आजची तरूण पिढी किती प्रगत आहे आमच्यावेळी असे नवह्ते वगैरे बोलत होते, तिकडे ही मला मवाळ आणि जहाल असे दोन प्रांत दिसले काहींना आजची तरूण पिढी प्रगत वाटत होती तर काहींच्या मतेती वाया गेलेली होती. म्हणजेच काही चांगल्या गोष्टी सांगत होते तर काही त्यांच्यावर टिकास्त्र सोडतानाही दिसत होते,काहिंची चर्चा कपड्यांवर सुरु होती तर काहींच्या ताज्या घडामोडींवर चर्चा रंगल्या होत्या. लहान असताना आपण कसे बालवाडीत एकमेकांना सांगायचो ना अगदी तसे. मग काय लहान पणी केलेल्ल्या धिंगाण्यात मन कधी हरवले कळलेच नाही एव्हाना अर्धातास झाला होता. काही मंडळींचे मुले सुना, नात सुना, नातवंडे पतवंडे त्यांना घरी घेऊन जायला आली होती तर काहींनी स्वत:च आपापले बस्तान हलवले होते ते पाहून मला माझ्या बालवाडीची आठवण झाली , शाळा सुटली पाटी फ़ुटली असे बाई म्हणाल्या की दप्तर भरायचे आणि खाली उन्हातान्हात ताटकळत उभ्या असलेल्या आई- बाबांकडे जाऊन बोबड्या शब्दांत आज काय हैदोस घातला ते सांगायचे असे चित्र बालपणिचे मला आठवले, मग तिकडून काढता पाय घ्यावा असे वाटत नव्हते अजुन थोडे बसुन निरिक्षण करावे असे वाटत होते पण नेमका माझ्या मित्राचा मला फ़ोन आला आणि मला तिकडून काढता पाय घ्यावा लागला. जे काही दिसले,जाणवले, अनुभवले ते खरोखरंच अविस्मरणीय होता, आयुष्य किती सुंदर आहे प्रत्येक गोष्टींतून काहीना काही शिकवत राहतं, कुणी त्यातून शिकतो तर कुणी बघुन सोडून देतो.

हा लेख वाचणा-याला बालिश किंवा उगाचच काहीतरी असा लिहिलेला वाटू शकतो, पण आपले उत्तरायण म्हणजे मावळतीचे आयुष्य काय आणि असे काढायचे याचा उत्तम देखावा डोळयांसमोर उभा राहिला, बरेचशे लोकं म्हणतात निवृत्तीनंतर सगळे संपते किंवा जगण्यात काही रस राहत नाही पण मला वाटते असाच विरंगुळा कट्टा जागोजागी भरला तर अक्खी तरुणाई ही लाजेल असे चित्र दिसेल ..आणि पुन्हा नवीन आयुष्याची शाळा भरेल.

प्रथमेश सुरेश शिरसाट

## गणि गणं गणांत बोते

समर्थ सद्गुरु श्री गजानन महराज नेहमी "गणि गणं गणांत बोते" मंत्राचा जप करीत असत. या मंत्राचे भजन करताना ते चुटक्या वाजवित असत. पण या चुटक्या आपण वाजवतो तशा नाहीत तर मध्यमेच्या (मधल्या बोटाच्या) टोकाने अंगठ्यावर विणा वाजविल्याप्रमाणे घर्षण करणे. अशा चुटक्या वाजवत त्यांच्या बोटांना जखमा होऊन त्यातून कधी कधी रक्त ही येत असे. पण महाराज इतके तल्लीन होत की त्यांना कशाचे ही भान रहात नसे. महाराज प्रखर मतवादी होते. त्यांना उच्चारात चूक करणे मान्य नव्हते.

"माननात त्रायते इति मंत्रा:" मनन करणा-यास तारतो तो मंत्र, मंत्ररुप शब्दातून हळूहळू नादरुप प्रगट होते आणि पुढे नादरुपात ईश्वराचे ज्योतीसमान रुप प्रगट होते. मन ही गोष्ट शिल्लक रहात नाही. ते स्वत:हून हरवते. एका आत्मरुपाविषयी दुसरे काहीही शिल्लक रहात नाही. हीच ख-या अर्थाने मंत्रसिद्धी आहे.

"गणि गणं गणांत बोते" हा महाराजांचा सिद्धमंत्र आहे. त्याचा अर्थ असा आहे.

गणि - "गण" या शब्दाऐवजी "गणि" हा शब्द सद्गुरुंनी उच्चारला आहे. "गणि" हा शब्द स्त्रीवाचक आहे. "गणि" म्हणजे महाशक्ति, आदिमाया, आदिसुष्टी, जगद्जननी आणि शक्तिस्वरुपिणी जिच्यामुळे हे जगत प्रगट झाले. ती आदिशक्ति म्हणजे गणि. जसे विष्णूची वेष्णवी त्याप्रमाणे गणाची गणि हा शब्दप्रयोग महाराजांनी सर्वप्रथम केला.

"गण" ब्रह्म जो सुष्टीचा आधार असा परब्रह्म सृष्टीचे आदिकरण किंवा जो सृष्टीरुपाने नटलेला आहे. " पूर्णमद: पूर्णमिदं" याप्रमाणे पूर्णरुपाचे प्रगटला व पूर्णपणे शिल्लक राहिला तो ईश्वर.

"गणांत" गण आत गणांत येथे "गण" हा शब्द शरीराच्या "आत" म्हणजे आत्म्यासाठी वापरला आहे. गण म्हणजे "आत्म्यात" असा आहे.

"बोते" बोते म्हणजे मनन करा, हे मना तू मनन कर, भजन कर, मनन करुन जाणून घे की ते एकमेकांपासून विलग नाहीत ते अभिन्न आहेत. जगत (जड व चेतनसुष्टी) व ब्रह्म व आत्मा हे एकच आहेत. त्यास जाणून घे.

जगत हे ब्रह्माचे रुप सगुणरुप आहे. गण म्हणजे अव्यक्त ब्रह्म निर्गुणातून करणे. हेच गजानन महराज त्यांच्या "गणि गणं गणांत बोते" या भजनरुपि नामजपातून सर्वांना उपदेश करतात, हा नामजप (मंत्र) सृष्टीच्या कणाकणांत पोहोचलेला पहावयास मिळतो.

कादंबरी अमोल करकरे

टंकलेखन : शारदा परेलकर

## धक्का

२६ जानेवारीची ती सकाळची वेळ होती. अशोकची ध्वजवंदनासाठी शाळेला लवकर जाण्यासाठी गडबड चालू होती. "आई आज सरांनी पांढरा शुभ्र युनीफोर्म करुन यायला सांगीतले आहे. अगं मी किनई आज वर्गाचं संचलन करणार आहे. लेफ्ट-राईट, लेफ्ट-राईट म्हणत ब्यांडच्या तालावर रुबाबदारपणे पावलं टाकीत पुढे जाणार. ध्वजाला सलाम करणार" हे सांगताना अशोकच उत्साह नुसता ओसंडत होता. "आई मी जातो ग." करत केव्हाच अशोक माझ्यापुढून शाळेत गेला. त्या दिवशी माझं मन मात्र काही था-यावर नव्हतं. मन चिंती ते वैरी न चिंती म्हणतात तसे अगदी मन नाराज करणारे विचार मनात येत होते. जातो गं करत पळत सुटलेला आशु नीट शाळेत पोहोचेल ना ? सुसाट धावत सुटला ट्रॅफिक कडे लक्षच दिले नाही तर ? असे उगीचच वाटू लागले आणि तेवढ्यात फोनची बेल खणखणली. फोन उचलेपर्यंत आशु साठी - कुठल्या दवाखान्यातून वगैरे नसेल असा विचार आला मात्र आणि अंगावर काटाच आला. 'रात्री ताप आला होता म्हणून आज शाळेत येणार नाही

असे सांगणारा अनिलचा- त्याच्या मित्राचा फोन होता. विचार करुन करुन मन नुसतं हलकं झालं होतं. अगदी जोरात चक्कर आल्यासारखे झाले नि पडले खाली.

स्वयंपाकघरातील भांडी देखील थरथरली. एकावर एक ठेवलेली काही पडली व जोरानं आवाज देखील झाला. क्षणभर मला काही कळेच ना. शेजार-पाजारच्या लोकांचा आरडा-ओरडा सुरु झाला. मोठ्या इमारतीत रहाणारे लोक पळत पळत रस्त्यावर आले. मला काही समजेना. तेवढ्यात ह्यांनी हाताला धरून खसकन ओढले. आणि घराच्या बाहेर रस्त्यावर आणले आणि मग भूकंपाचा धक्का लागल्याची जाणीव झाली. तशीच विचार करून रस्त्यावर उभी राहीले तो सकाळी साडे आठच्या सुमारास पुन्हा धक्का बसला. समोरच्या रस्त्याला मोठ्या भेगा पडल्या. अक्षरश: रस्ता फाटला. माझे मन चरकले. माझा आशु - शाळेत गेलाय - तिथे काय झाले असेल. असा नुसता विचार आला आणि मन शहारले. धक्के बंद झाल्यावर आशुच्या शाळेकडे निघाले तो काय ! समोरचे दृष्य बघून बोलतीच बंद झाली. एक-दोन इमारती खचलेल्या, काहींचा अर्धा भाग तुटलेला, गॅलरी लोंबकळत असे अगदी भयंकर दृष्य दिसत होते. व धडपडत शाळेत गेले, तो काय - शाळेची पूर्ण इमारत कोसळली- शाळेचे पटांगण होते तिथे हा भला मोठा खड्डा पडला - व त्यांत माझ्या आशुसह इतर अनेक विद्यर्थ्यांचा घास घेऊन धरणी अस्ताव्यस्त पडली होती. जमीन दुभंगून गेली होती. जणु काही घडलेच नाही इतकी निर्विकार ती पडलेली होती.

दोन-तीन दिवसांनी ढीगारा उपसाण्याचे कार्य युद्धपातळीवर सुरु झाले तेव्हा माझ्यासारख्या कितीतरी माता-भगिनी तेथे उपस्थीत होत्या. आपलं मुल मिळतंय - जिवंत असेल का ? ह्या वेड्या आशेनं - पण आम्हा सर्वांची दारुण निराशा झाली. हाती काही लागलं नाही. कायमचा धक्का देऊन माझा आशु पार दूर निघून गेला होता. पांढरा कागद, पेपर, फडकं नुसतं फडफडतांना दिसलं की आशुच्या शर्टाची बाहीच हलते आहे असे वाटायचं. पवित्र मनाचा पवित्र पोशाखातला माझा आशु भूमातेच्या उदरी विलीन झाला.

सौ. मीना फाटक.

टंकलेखन : शारदा परेलकर

## लेखकांची वेदना

वेगवेगळ्या प्रकारच्या पुस्तकातून विविध संदर्भ सापडतात. विविध पुस्तकात कथा, लघुकथा व कादंब-या, नाटके यातून मनोरंजन तर होतेच पण रुसवा, राग यासारख्यातून उभारत समोर गोष्टी लेखक लिहितात.

सर्व प्रकारचे लेखक वाचत वाचत काही कलाटणी देणा-या गोष्टी आपल्या लेखात उतरवतात. आणि त्या लिहिलेल्या गोष्टींमध्ये लेखकाला ज्याप्रकारचे स्वत:च्या आयुष्यात अनुभव आलेले असतील त्यातले थोडे से अनुभव व्यक्त करतात. प्रत्येक जण उराशी बाळगून लेखन करतो. उद्या मी मोठा लेखक होईन हे सहज शक्य नसते. हे माहीत असूनही तो पुढे वाटचाल करीत रहातो.

त्यात विविध लेख, कविता, कथा यासोबत आत्मा आणि परमेश्वर, त्याचे वेगळे पैलू देण्याचा प्रयत्न लेखक करतो. अपयशाला सामोरे जावे लागते. गाजलेल्या लेखकांचे कुठलेही क्षुल्लक लेख जे गाजावयास नको होते, असे संग्रह प्रेक्षक मनापासुन वाचतात. परंतु जे नवे होतकरु लेखक जगातल्या प्रत्येक कानाकोप-यात असणा-या प्रेक्षकांना काही देऊ पाहतात त्यांना अपयश येते. तरी त्यातून खचून न जाता नव्या जोमाने उभे राहीले तर ते तग धरु शकतात.

लेखक जसे पाहतो, अनुभवतो, जे वाचतो तेच त्याच्या सर्वांगात भिनने डोक्यात आले की लगेच कागदावर उतरवतो. आणि विषय वेगळे असले तरी त्यातले भाव आणि अर्थ समजून घेणे वाचकांसाठी महत्वाचे ठरते. लिहीणारा आपले प्राण ओतुन मनापासून लिहीतो. वाचकांनी ते झिडकारू नये. कुणी तर नवे काही करण्याचा प्रयत्न करतो त्याच्या आत्मविश्वासाला तडा जाणार नाही याचे भान वाचकाने ठेवावे.

मनापासून केलेली गोष्ट वाया जात नाही त्याचे चांगले फळ त्याला मिळते.लेखकाला त्या गोष्टी लिहीण्यात दु:ख, वेदना, काही कष्ट होतात, त्या जागी आपण स्वत:ला ठेवून मग विचार करायला हवा. प्रत्येक कथेत थोडे वास्तविक अनुभव, स्वानुभव दडलेले असतात. ते शोधता आले पाहीजेत. ही मी मला जाणवलेल्या कही अनुभवावरुन लेखकांन काय वाटते ते थोड्या शब्दात मांडले आहे.

सौ. भक्ती श्रीकुष्ण पोटे.

(कादंबरी अमोल करकरे)
टंकलेखन : शारदा परेलकर

## अविस्मरणिय अष्टविनायक दर्शन

आषाढी एकादशीचा दिवस होता.त्यावेळी मी जेमतेम ८वीत शिकत होतो. काल अनिलदादाचा म्हणजेच माझ्या मावासभावाचा फोन आला तो म्हणाला उद्या आपल्याला अष्टविनायकाच्या दर्शनाला जायचे आहे तयारी कर! तसे २ महिन्यापूर्वी आमचे जायचे ठरले होते पण वेळ आणि तारीख निश्चित नवती पण इतके अचानक निघू असे वाटले नव्हते.मी ,बाबा आणि माझी ताई जायला निघालो रात्रभरात मी सामान भरले.आणि सकाळी निघालो.

अष्टविनायकाच्या दर्शनाला मावशी ,काकासंह आणखी काही जण येणार होते त्यामुळे त्यांना घेण्यासाठी आम्हाला गावाला जावे लागणार होते .माझे गाव मुंबई पासून १२५ किमी अंतरावर आहे .सकाळच्या पहिल्या एसटी ने आम्ही १० वाजेपर्यंत गावाला पोहचलो.मला अजूनही आठवतंय आषाढीचा एकादशीचा उपवास असल्यामुळे मावशीनं गरम गरम खरपूस साबुदाण्याचे वडे फराळाला बनविले होते. अष्टविनायाकातील ओझर आणि लेण्याद्री हे दोन्ही गणपती साधारण १० ते १५ किमी अंतरावर आहेत माझ्या गावापासून! त्यामुळे दोन्ही ठिकाणी मी भरपूर वेळा जाऊन आलो होतो. गावाकडीलच १ जीप भाड्याने ठरवून आम्ही ९-१० जण निघालो गाडीत मावशीचे सासरे सत्तरीतल्या आजोबांपासून ते १२ वर्षापर्यंत अशा ३ पिढ्या होत्या. त्यामुळे निरनिराळया विषयावर गप्पा होणार हे निश्चित होते .प्रथम आम्ही विघ्नेश्वराचे दर्शनासाठी ओझरला पोहचलो. अष्ट विनायकात सर्वात श्रीमंत गणपती म्हणून ओळख असणारया विघ्नेश्वराच्या रूप खरोखरीच त्याच्या प्रतिमेला साजेसं अस वाटलं. पूर्वाभिमुख असणारया पूर्णाकृती मूर्तीचे दर्शन घेऊन आम्ही निघालो गिरिजात्मक तेथून जवळपास १० किमी अंतरावर होता पण बाहेर पडणारा पाऊस आणि डोंगरावरची चढाई यामुळे लेण्याद्रीला परतताना जायचे असे सर्वानुमते ठरविले .आणि आम्ही शिक्रापूर मार्गे थेउरला निघालो.मुळा-मुठा नद्यांनी वेढलेल्या थेऊरच्या भागात रस्त्याच्या दोन्ही बाजूने उसाची हिरवी गार शेते दिसत होती.थेउरला पोहोचेपर्यंत संध्याकाळ होत आली होती.

गाडी पार्किंगला उभी करून आम्ही मंदिराकडे गेलो .मंदिरात प्रवेश केल्यावर सभागृहात १ मोठी घंटा दिसते.बाजीराव पेशव्यांनी जिंकून आणलेली हि घंटा सभागृहाच्या आवारात जमिनीपासून ३ फुट अंतरावर बांधून ठेवली आहे.डाव्या सोंडेच्या चिंतामणीच्या डोळयात माणिक रत्न आहेत. त्याने मूर्तीची सुंदरता आणखी अजून निखरते.चिंतामणीचे दर्शन आटोपून आम्ही तेथील हौटेल मध्ये चहा पान करून रांजणगावाकडे निघालो.तुषार आणि दीपक असे दोन समवयीन मुले गाडीत होती.आमच्या तिघांची अगदी गट्टी जमली होती बाहेर वाळूसारखा पाऊस पडत होता. दिवस मावळला होता.

ट्रकवाले रस्त्याकडेला ट्रक उभे करून निवांत बसलेले दिसत होते .रस्त्यावर गाड्यांचा ओघ ओसरलेला दिसत होता.पुणे -नगर महामार्गावर आम्ही होतो.बर्याच वेळापासून आमच्यापुढे १ ट्रक चालला होता.आमचा ड्रायवर दत्ता याने त्या ट्रकला दोनवेळा overtake करण्याचा प्रयत्न केला होता.पान त्या डाम्बरट ट्रक ड्रायवरने आम्हाला पुढे जाऊ दिले नाही.दत्ता ने गाडीचा वेग वाढविला आणि पुन्हा १ कदा overtake करण्याचा प्रयत्न केला जवळपास १००किमि वेग असेन आमच्या गाडीचा. ओव्हरटेक करण्यार ईतक्यातच आमच्या ईतक्याच वेगात १ एसटी समोरून आमच्या दिशेने येताना दिसलीसर्वजण स्तब्ध झाले होते.त्या ट्रक ड्रायवर च्या आचरट पणामुळे आमचा सर्वांचा जीव धोक्यात आला होता.आता आमची अवस्था अशी झाली होती कि आम्ही गाडीचा वेग कमी केला तर एसटी शी धडक आणि क्षणार्धात गाडी थांबवणे सुद्धा शक्य नव्हते. किंबहुना ट्रकला overtake करण्याशिवाय आमच्या कडे दुसरा पर्याय उरला नव्हता.हे त्या ट्रक ड्रायवर लाही एव्हाना समजले होते .पण ईतक्या कमी वेळात तोही वेगावर नियंत्रण मिळवू शकणार नव्हता. आमचे सर्वांचे डोळे आपोआप मिटले.दत्ताने आपल्या कलेचे सर्व कसब पणाला लावत ट्रकला overtake करण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वी झालासुद्धा !!! ट्रक आणि एसटी यांच्या मधून प्रत्येकी १ इंच फरकाने आमची गाडी pass झाली .डोळे उघडले तेव्हा दत्ताने गाडी रस्त्याकडेला घेतली होती .१५ मिनिटे थांबलो. आम्ही मरणाला २ सेकंदाने हरविले होते.आयुष्यात वेळेला का आणि किती महत्व असते.हे त्यावेळी आम्हाला प्रकर्षाने जाणवले होते .या प्रसंगाला शिताफीने तोंड देणार-या दत्ताचे सर्वांनी कोतुक केले.आणि पुन्हा एकदा रांजण गावकडे निघालो.थेट मंदिराच्या

बाहेर गाडी उभी केली.रात्रीचे ८ वाजले असतील.रांजण गावाच्या महागणपतीचे आभार व्यक्त केले .महागपतीचे पूर्णाकृती रेखीव रूप खूपच सुंदर वाटत होते सभामंडपात थोडावेळ बसलो आणि निघालो रांजण गावात राहण्याची व्यवस्था झाली नाही त्यामुळे आम्ही मुक्काम मोरगावला करण्याचे ठरविले आणि लगोलग निघालो.

आषाढी एकादशीचा उपवास असल्याकारणाने रात्रीसुद्धा जेवता येणार नव्हते.मोरगावला जाताना चोफ्फुला येथे थांबलो.चहा पाणी घेतले.आणि मावशीने भूई मुगाच्या शेंगा भाजून घेतल्या होत्या त्यावरच ताव मारला सर्वांनी चोफ्फुल्याला चारही दिशेने रस्ता जातो म्हणून हे नाव पडले असावे.असो आम्ही मोरगावाकडे वळलो वाटेत एक छोटा सुपा घाट चढून जावे लागणार होते.रात्री ११ च्या सुमारास आम्ही ह्या घाटात पोहचलो घाटमाथ्यावर पोहचल्यावर गाडी अचानक बंद पडली.दत्ता गाडीचे बोनेट उघडून चालू करण्याचा प्रयत्न करत होता . बाकीच्या सर्वाना झोप लागली होती. मला झोप येत नव्हती म्हणून मी गाडीतून बाहेर आलो. पावसामुळे सर्व वातावरण थंड झाले होते.त्यातच गर्द झाडीत दाट धुके पडल्यामुळे रात्रीच्या अंधारात चंद्राच्या उजेडही अगदी दुधासारखा झाला होता मी आजूबाजूला फिरलो थोडाफार आणि गाडीत येऊन बसतो न बसतो तोच दत्ताने काहीतरी किडे करून गाडी start केली.समोर बघतो तर काय एक तरणाबांड वाघ तावातावात आमच्या गाडीजवळून रस्ता पार करून समोरील झाडीत पसार झाला. काही वेळा पूर्वी मी येथेच आजूबाजूला फिरत होतो आणि तेथूनच दाट झाडीतून हे वाघोबा माझ्यासमोरून जात होते.मी थक्क झालो होतो कदाचित माझे नशीब चांगले होते.त्यांच्या तावडीत सापडलो असतो तर माझे काय झाले असते या कल्पनेनेच मी थंड झालो .असो अंधार आणि दाट धुके कापत आम्ही १२ च्या सुमारास मोरगावला पोहचलो तेव्हा मंदिर बंद झाले होते.पण इतक्या रात्री कुठे राहायचे शेवटी तेथीलच एका काकांनी आम्हाला त्यांच्या वाड्यात रात्रभर राहण्याची परवानगी दिली.आम्ही रीतसर भाडे देण्याचे मान्य केले.त्या काकांच्या जुन्या वाड्यात कधी झोप लागली कळलेच नाही.डोळा उघडला तेव्हा घड्याळात पहाटेचे ५ वाजले होते.काका आणि काकू बंब आणि अंगणाची साफसफाई करत होते.सर्वांच्या आंघोळी उरकेपर्यंत ६ वाजले.आम्ही लगोलग मयूरेश्वराच्या दर्शनाला गेलो.

दगडी अकरा पायऱ्या चढल्यानंतर काळ्या पाषाणातील एक मोठा नंदी आणि उंदीर दिसला यापूर्वी इतका मोठ्या उंदराची मूर्ती मी कोणत्याच गणपती समोर पहिली नव्हती.मंदिरात प्रवेश केल्यावर लगेच मयूरेश्वराच्या मूर्तीकडे लक्ष गेले नाही तर नवलच तीन डोळे असलेल्या मयूरेश्वराच्या डोळयात आणि बेंबीत हिरे आहेत खरच सकाळीच श्रींच्या दर्शनाने मन प्रसन्न झाले.दर्शन आटोपल्यानंतर आम्ही पुन्हा एकदा वाड्याकडे वळलो.तेथे पोहोचल्यानंतर काकुनी गरम गरम बटाटे पोहे आमच्या साठी तयार केले होते.आत्ता हे बटाटे पोहे काय आहे त असा प्रश्न तुम्हाला पडला असेल ना ? साहजिकच आहे सांगतो कांदे नसल्यामुळे काकुनी कांद्याएवजी उकडलेले बटाटे टाकले होते.पण काय सांगू तुम्हाला असे पोहे मी याआधी कधी च खाल्ले नव्हते.सुंदर .......! काकांना रीतसर भाडे देऊन आम्हला आदरातिथ्य बद्दल त्यांचे आभार मानले .आणि सिद्धिविनायकाला जाण्यासाठी निघालो.चोफ्फुल्यावर रात्री चहा पिण्यासाठी आम्ही थांबलो होतो हे आधीच मी तुम्हाला सांगितले पण चहाची चव इतकी सुंदर होती न कि आता आम्हाला दत्ताला गाडी थांबव असे सांगावेच लागले नव्हते.३-४ दिवसानंतर उन पडलेले दिसले.सोनेरी कोवळ्या उन्हात चहा पिण्याची मजा काही औरच होती.चहा पिऊन आमची स्वारी निघाली ती थेट दौड च्या दिशेने.

खर म्हणजे सिद्धिविनायकाचे स्थान हे पुणे आणि नगर ह्या दोन्ही जिल्ह्यांच्या हद्दीवर आहे.मद्धे सीमा ठरते ती म्हणजे भीमा नदी च्या भीमा नदीच्या तीरावर सिद्धीटेक गाव वसलेले आहे.पूर्वी सिद्धी टेकला जाण्यासाठी नदीचे पात्र ओलांडूनच जाणे सोईस्कर पडत असे.किंबहुना दुसरा पर्यायी रस्ता हा वेळ आणि अंतर वाढवतो.आम्ही नदीच्या तीरावर पोहचलो.नावाडी होडी तयार करून उभा होता गम्मत म्हणजे हि नदी पुणे आणि नगरच्या हद्दीवर असल्याकारणाने अलीकडून पुण्यातील नावाडी आणि पलीकडून नगरचे नावाडी प्रवाशांची ने आन करत असतात.सतत चालू असणाऱ्या पावसाने थोडीफार विश्रांती घेतली होती.पावसाला असल्याकारणाने उज्जनी धरणातून पाणी सोडले होते.त्यामुळे आधीच मोठे असणारे नदीचे पात्र विशाल भासत होते.नदीच्या पाण्याची पातळी हि धोक्याच्या इशार्यापर्यंत पोहोचली होती.आजूबाजूला हिरवीगार झाडे आणि

मध्ये नदीचे विशाल पात्र आणि त्यात असणार्या होड्या अगदी निसर्गचित्र असल्यासारखे भासत होते आणि पक्षांच्या किलीबिला टाने त्यात आणखी सूर भरले होते .खरच या स्वच्छंदी निसर्गाचा अतुलनीय अनुभव मी अनुभवत होतो. आम्ही होडीत बसलो जवळपास ५५ प्रवासी बसले.जवळपास नदीचे अर्धे पात्र ओलांडल्यानंतर जोरदार वर सुटला होता क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसविल्यामुळे नावाड्याला होडीवर नियंत्रण करणे कठीण जात होते.आणि जे घडू नये असेच घडले नावाड्याचे होडीवरील नियंत्रण सुटले आणि होडी इतक्या प्रवाश्यांसह वा-याच्या ओघाने भरकटली.होडीत ६ महिन्याच्या बाळापासून ७० वर्षांच्या आजोबांपर्यंत ची माणसे होती.स्त्रिया आणि लहानमुलांचा गदारोळ सुरु झाला .या गदारोळात माझ्याही डोळ्यात पाणी आले होते .दुर्दैवाने जर काही घडले तर लहान मुले .स्त्रिया आणि पोहता न येणारे असे सर्वांचे मरण अटळ होते मलादेखील पोहता येत नव्हते.नदीचे पात्र २०० मीटरपर्यंत असावे बहुतेक.सर्वाना काहीच समजत नव्हते सर्वांनी सिद्धिविनायकाचा धावा सुरु केला.या १० मिनिटांच्या खेळत एकाच गोष्ट आमच्या पथ्यावर पडली ती म्हणजे वर नदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वाहू लागला त्यामुळे नावाड्याला होडी नियंत्रणात आणणे शक्य झाले आणि आम्ही कसेबसे दूरवर किनार्याला जाऊन मिळालो.त्यानंतर तेथीलच एका स्थानिकाने सर्व भाविकांना गावातून मंदिराकडे नेले.सर्वाना आपण मरणातून वाचलो आहोत यावर विश्वास बसत नव्हता. सिद्धिविनायकाच्या मंदिरात गेलो थरथरत्या हाताने त्याला नमस्कार केला.नंतर सर्व भाविकांसह आरती करून परतीच्या वाटेकडे निघालो.येताना होडीतून च आलो.पण आत्ता मात्र मनात कोणतीच भीती नव्हती.नंतर आम्ही नदीकाठीच असणार्या होटेल मध्ये झुणका भाकरी खाल्ली एखाद्या पंचतारांकित होटेललाही लाजवेल अशी चव चाखल्यावर लगोलग गाडीत बसलो.

गर्द सुबाभळीच्या रस्तातून थेट व्हाया पुणे आम्ही पाली आणि महडकडे निघालो.पोटात भर पडल्यामुळे सर्वांनाच गाडीत चं झोप लागली होती.अखेर कोकणात आल्यावर मुसळधार पावसाचा प्रत्यय पुन्हा आला पालीच्या बल्लाळेश्वराचे आणि महाडच्या वरद विनायकाचे दर्शन आम्ही घाईघाईत आटोपले आणि जुन्नर मधील गीरीजात्मकाला निघालो कारण रात्रीपर्यत लेण्याद्रीच्या गणपतीचे दर्शन घेऊन परतीच्या वाटेला जायचे होते.आम्ही रात्री ९.३० च्या आसपास लेण्याद्रीच्या पायथ्याशी पोहचलो.ईथे सुद्धा संकटांनी आमची पाठ सोडली नव्हती.आम्ही यायच्या आधीच मंदिर तथा तेथे पोहोचणार्या डोंगरावरच्या पायर्यांवरील विजेच्या खांबावरची वीज गुल झाली होती.लेण्याद्रीच्या पर्वतावर उंचावर अकरा गुहा आहेत त्यापीकी एका गुहेत गिरिजात्मक विराजमान आहेत.तिथे पोहोचण्यासाठी उंच-सखल आणि वेड्यावाकड्या पायर्यांचा वापर करावा लागतो ठराविक उंचीवर गेल्यानंतर एकाबाजूला खोल दरी दिसते.असो डोंगरावर वीज नाही ,रात्र झाली होती,त्यातच डोंगरावर जोरदार वार्याचा प्रवाह चालू होता या सर्व कारणांमुळे वर जावे कि नाही यावर आमचे एकमत होत नव्हते.सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे माझ्या गावापासून १५ किमी अंतरावर असणाऱ्या लेण्याद्रीवर आम्ही यापूर्वी ब-याच वेळा आलो होतो त्यामुळे पर्वत ,मंदिर पायऱ्या आणि तेथिल परिसराचा एकूणच आराखडा आम्हाला परिचित होता.इतर भाविकांनी वर जाण्याचे टाळले होते.आणि तेथीलच असणा-या भक्त निवासात राहणे पसंत केले होते. पण आमचा पर्वतावर श्री च्या दर्शनाला जाण्याचा निर्धार पक्का होता जाण्याचा.शेवटी आजोबा म्हणले मी जाण्यास तयार आहे त्यांचा आत्मविश्वास बघून आम्हीही तयार झालो.तेथील स्थानिकांनी आम्हाल या परिस्थितीत न जाण्याचा सल्ला दिला.पण तरीही आम्ही निघालो सुरवातीच्या काही वाय्वास्थित बांधकाम केलेल्या दगडी पायऱ्या सोडल्या तर बाकी सगळया वेड्या वाकड्या वळणाच्या पायऱ्या आहेत.

आषाढ शुक्ल द्वादशी चा रात्र होती त्यामुळे चंद्राचा उजेड लख्ख पडला होता.चांदणे इतके लख्ख पडते हे मला त्यावेळी समजले होते मुंबईत कधी कोणी बघितली असे चांदणे? असो आम्ही हळूहळू पायऱ्या चढून वर जाऊ लागलो जस जसे उंचावर जात होतो तास तसा वाऱ्याचा वेग वाढला होता.सोसाट्याचा वाऱ्यामुळे विजेच्या विद्युत वाहक तारांचा भयानक आवाज येत होता.आम्ही अर्ध्या डोंगरावर चढल्यानंतर खरे आमच्या तोंडचे पाणी पाळले ते म्हणजे सुस्पष्ट अशा वाघोबाच्या डर् काळीने डोंगरावरच्या गर्द झाडीत आम्ही भेदरलो होतो.तरीही आम्ही निघालो.मनात निश्चय एकाच होता गिरीजात्मकाचे दर्शन !!! माझ्या एका बाजूला दीपक आणि दुसरया बाजूला तुषार आम्ही तिघेही एकमेकांचे हात घट्ट धरून चाललो होतो तोच पायरीच्या कडेवरील एक दगड निखळला आणि दिपक चा पाय दरीच्या बाजूने घसरला मी त्याचा हात घट्ट धरून ठेवला होता.दिपक दरीच्या

बाजूने पडणार इतक्यात प्रसंगवधान राखून मी आणि तुषारने त्याला वर खेचले.दिपक चे प्राण वाचला.तासभरात आम्ही वर पोहोचतो न पोहचतो तोच दुसरी समस्या आमच्या समोर आ वासून उभी होती .वर गेल्यानंतर एका विशिष्ट ठिकाणी चोकोनी आकाराची मोठी दगडी पायरी दिसते.नेमका त्या पायरीवरच एक पाण्याचा धबधबा कोसळत होता.ती च्या एका बाजूने खोल दरी आणि शेवाळ यामुळे आम्हाला जाता येत नव्हत कदाचित पाय घसरला तर आपली रवानगी सरळ दरीतच हे सर्वांना माहित होत पण पार केल्याशिवाय पुढे जाता येणार नव्हत मग एक युक्ती लढविली.एकमेकांनी हात पकडून साखळी ने पुढे गेलो धबधब्याखाली आमच स्नान झालच !वर सर्वत्र अंधार असल्याकारणाने मंदिर शोधता शोधता आम्ही दुसरयाच एका गुहेत शिरलो आहोत हे जेव्हा आमच्या लक्षात आल तेव्हा मात्र आमची खरचं खूप म्हणजे खूपच तंतरली होती पूर्वी बोध्द भिक्षुक ह्या गुहांचा वापर ध्यानधारणेसाठी करत पण आत्ता ह्या गुहांचा वापर वाघांसारखी हिंस्र श्वापदे करतात हे आम्हाला माहित होत' आपला दर्शनाला येण्याचा निर्णय चुकीचा होता कि काय असे वाटू लागले होते.

सगळे चिंतेत पडले होते एकतर संपूर्ण रात्र तिथेच काढावी लागणार होती किंबहुना शोधता शोधता त्या अरुंद वेड्या वाकड्या रस्त्यातून कोणीहि दरीत पडेल याची भीती वेगळी जंगली प्राणी त्यात ती भयाण शांतता असा अनुभव अनुभवाने म्हणजे मी शब्दात नाही सांगू शकत.गुहेच्या आतल्या बाजूने मला एक मंद प्रकाश दिसला आणि आनंदाने ओरडलो ते बघा काय ? मग आम्ही त्या प्रकाशाचा माग घेत घेत एका गल्लीतू न दुस-या गुहेत शिरलो जिथे श्रीचे मंदिर आहे ती गुहा सापडली आणि आमच्या जीवात जीव आला ' ईतक्या मोठ्या सभागृहात आमच्या शिवाय देव सोडला तर कोणीच नव्हते.समईतील तुपाच्या दिव्याच्या उजेडात गिरीजात्माकांची अर्धकृती मूर्ती चमकत होती.त्याच्याकडे बघितल्यावर सर्व भय पळून गेले होते थरकाप शांत झाला होता.

पुजारीसुद्धा नसल्यामुळे बाबांनीच पूजा केली आणि जोशपूर्ण वातावरणात गणपतीची आरती केली.एव्हाना आमचा आत्मविश्वास इतका द्विगुणीत झाला होता कि आम्ही २५ मिनिटात खाली उतरलो डोंगरावरून ज्या स्थानिकांनी आम्हाला वर न जाण्याचा सल्ला दिला होता.ते आमच्या खाली येण्याची वाट बघत होते.हे आम्हाला खाली आल्यावर समजले आम्हला सुखरूप परतल्याचे बघून त्यांना हि आनंद झाला कारण त्यांना वरच्या परिस्थितीची चांगलीच जाणीव होती.आमच्या धड्सालाही त्यांनी दाद दिली.असे आम्ही पुन्हा परतीच्या वाटेला लागलो.येताना मागच्या २८ तासाचे चित्र डोळयासमोर आले सर्वांच्या खरचं कधी न विसरता येण्यासारखे अविस्मरणीय आणि चमत्कारिक अनुभव आम्ही अनुभवले होते.

अवधुत ठिकेकर

## हसा आणि हसवा... भन्नाट मराठी विनोद १

मंडळी,विनोद वाचून हसायला येत नाही असा माणूस विरळाच. त्यामुळे विनोद सगळ्यांना आवडतातच. लहानपणी बऱ्याचदा लांबच्या प्रवासात कंटाळा घालवण्याकरता मी आईकडे हट्ट करून तिथल्या पुस्तक विक्रेत्यांकडून १००१ विनोद, शेखचिल्लीचे किंवा बिरबलाचे विनोद अश्यांसारखी अनेक पुस्तके विकत घेऊन वाचली होती. त्यावरून कल्पना घेऊन; माझ्या एका मैत्रिणीला तर वाचलेला प्रत्येक विनोद वहीत लिहून ठेवायची खोड होती. ते विनोद फावल्या वेळात वाचून आम्ही खूप हसायचो. आता वय वाढलं तरी विनोद वाचण्याची हौस काही जात नाही. उलट हातात नसलेल्या परिस्थितीला सामोरे जाऊन येणारे अनावश्यक ताण घालवण्याकरता विनोद ऐकून किंवा वाचून सामोरे गेल्याने येणारं नैराश्य काही प्रमाणात कमी होते हे नक्की. तंत्रज्ञान आता प्रगत झाले. पूर्वी फक्त पुस्तकात वाचायला मिळणारे विनोद आता सर्रास आपल्या भ्रमणध्वनीवर येत असतात, आपल्याला हव्या त्या विषयावरचे विनोद फुकट किंवा विकत मिळवण्याची व्यवस्था करता येते आणि पैसे भरून ते विनोद इतरत्र पाठवण्याचीही व्यवस्था होते. असेच मिळालेले आणि मनापासून आवडलेले काही विनोद पुन्हा तुमच्याबरोबर वाचून हसायला मला नक्कीच आवडेल म्हणून इथे देत आहे.

------------------------------------------------------------

- आबुराव :- "अहो छबूराव, त्या बाबूरावावर आलेल्या संकटाविषयी तुम्ही ऐकला का न्हाई ?"

छबूराव :- "नाय हो, का काय झालं त्यान्ली ?"

आबूराव :- "अवो , माजी बायकू गेली ना पळून त्याच्याबरूबर."

------------------------------------------------------------

- छबूराव :- "आरं बाबू, डोळं बंद करूनशान काय बघतूयास रं त्या आईन्यात ?"

बाबू :- "काय हाय, झोपल्यावर कसा दिसत असीन, त्ये बघतूया."

------------------------------------------------------------

- बाबूराव :- "किती वाजले हो भाऊराव ?"

भाऊराव :- "सहा वाजले की राव संध्याकाळचे."

बाबूराव :- :"छ्या !"

भाऊराव :- "का हो ? काय झालं ?"

बाबूराव :- "अहो सकाळधरून इचारून राहिलो नव्हं का समद्यांन्ली, येक जण धड सांगेल तर शप्पथ, समद्ये येगळी येगळी येळ सांगताहेत."

------------------------------------------------------------

- छबूराव :- "माझी बायकू रोज तक्रार करायची, घरात घालायला कापडं न्हाईत, कॉपडं न्हाईत

आबूराव :- " मंग दिली का तिला कापडं घेऊन ?"

छबूराव :- " च्यक्क, म्या घराच्या खिडक्यांनाच पडदे शिवून घेतले."

------------------------------------------------------------

· बाबूराव :- "डागदरसायेब, मी जवा समूरच्या मान्साबरूबर बोलतो न्हवं का, तवा मला समोर कोन हायं त्येच दिसत न्हाई."

डॉक्टर :- "अच्छा ! नेमकं कधी होतं तुम्हाला असं ?"

बाबूराव :- "म्या कुनाला फोन केला नायतर मला कुनाचा फोन आला की."

------------------------------------------------------------

· छबूराव :- "आबूराव, मला सांगा आपल्या देशाचा मृत्युदर किती आहे ?

आबूराव :- "१०० %"

छबूराव :- "कसा काय बुवा ?"

आबूराव :- "सोप्पं आहे, जो जन्माला येतो, तो प्रत्येकजण मरतोच."

------------------------------------------------------------

· एक वेडा :- "हत्तीला सुईच्या भोकातून जाण्याकरता कसं काय अडवता येईल ?"

दुसरा वेडा :- "एकदम सोप्पं आहे, अरे त्याच्या शेपटीला गाठ मारायची."

------------------------------------------------------------

· साहेब :- "तुम्हाला जर काहीही काम करता येत नाही; तर कशाला आलात इथे ?"

कारकून :- "तेच सांगायला आलोय, की माझ्या भरवश्यावर राहू नका."

------------------------------------------------------------

· बाबूराव भाजी आणायला गेले होते. भाजीवाला भाजीवर पाणी शिंपडण्याचे काम करत होता.बराच वेळ वाट बघितल्यावर शेवटी कंटाळून बाबूराव म्हणाले, " अरे बाबा, त्या भाज्या शुद्धीवर आल्या असतील तर दे बाबा मोजून किलोभर."

------------------------------------------------------------

· छबूराव :- "आबूराव, तुम्ही वकील आहात यावर आम्ही कसा काय विश्वास ठेवायचा ?"

आबूराव :- "अहो छबूराव, नाहितर इतक्या उकाड्यात कोट घालून कशाला घालून बसेन."

------------------------------------------------------------

· गणिताचे शिक्षक :- "बंड्या, गाढवा, मी जेव्हा तुझ्याएवढा होतो ना, तेव्हा मला गणितात पैकीच्या पैकी गुण मिळायचे."

बंड्या :- " मास्तर, नशिबवान होता तुम्ही. तुम्हाला नक्कीच कोणीतरी चांगले शिक्षक शिकवत असणार."

------------------------------------------------------------

· बाबूराव :- "का हो आबूराव, ह्या कागदाच्या तुकड्याकडे काय एवढे निरखून बघता राव ?"

आबूराव :- "लग्नाचे नोंदणी प्रमाणपत्र आहे हो. काही मुदत आहे का त्यावर संपण्याची ते शोधत होतो."

------------------------------------------------------------

· शिक्षक :- "मुलांनो, सांगा बरं हिंदीतला पहिला मूक पट कोणता ?"

आगाऊ कार्टा :- "मास्तर, तो जर मूकपट होता तर तो हिंदी आहे हे कसं काय कळणार आपल्याला ?"

---

· छबूराव :- "झेंडा दाखवा पाहू, अमेरीकेचा."

दुकानदार :- "हा" पहा

छबूराव :- "हा ठिक आहे, पण यात जरा दुसरे रंग दाखवा पाहू."

---

· न्यायाधीश :- "गीतेवर हात ठेऊन शपथ घ्या."

बाबूराव :- "काय बोलाताय सायेब, सीतेवर हाट टाकला म्हणून मला इथे आणलं, आणि इथे आता गीतेवर हात टाकायला सांगताय ?"

---

· बायको :- "अहो, चला ना आज सुट्टी आहे. बाहेर जाऊया, सिनेमा पाहूया, बाहेरच जेऊया आणि हो आज गाडी मीच चालवणार बरं का !"

नवरा :- "थोडक्यात जाणार कारमधून आणि येणार उद्या पेपरमधून."

---

श्रेया रत्नपारखी

## हसा आणि हसवा... भन्नाट मराठी विनोद २

गोंगाट करणारया बायकांना कसे शांत कराल?
उत्तर:त्यांना सांगायच कि तुमच्यातलि सर्वात वयस्कर बाई सर्वात पहिले बोलेल.

---

नवरा:देवाने तुला चांगले २ डोळे दिलेत तरी तांदळातले खडे काढता येत नाहीत.
बायको: त्याच देवाने तुम्हाला चांगले ३२ दात दिलेत तरी एखाद दुसरा खडाचावता येत नाही.

---

१ ली व्यक्ती: तुमच्या मिसेस च्या ड्रायव्हिंग ची काय प्रगती ?
२ री व्यक्ती:मस्त , मी एल.आय.सी. एजंट असल्यामुळे मला खुप फायदा झाला.
१ ली व्यक्ती:तो कसा काय?
२ री व्यक्ती:अहो आमच्या बिल्डींग मधल्या सर्वांनी विमा उतरवलाय.

---

✍ भालचंद्र पवार

ई- दिवाळी अंक
नोव्हेंबर २०१०

# कलादर्शनी














सौजन्य : मेघा पाटकर आणि प्रीती रोकडे









सौजन्य : ललित सावंत



सळसळतं सोनं



एकटा जीव...



Yellow-footed Green Pigeon






Pheasant-tailed Jacana



Oriental Magpie Robin दयाळ


सौजन्य : मकरंद केतकर


जागृती महिला मंडळ, पातळे बु.
सडपातळ कसे व्हावे ?
कु. विनोद सडपातळे यांचे व्याख्यान
श्री. वि. आगाशे


विषय : बारीक कसे रहावे ?
मार्गदर्शक : लता बारके
उन्नती मंडळ
---तेव्हा आता मार्गदर्शनासाठी येत आहेत---
श्री. वि. आगाशे


ff Fit & Fine Publications
प्रकाशन समारंभ
'लठ्ठपणावर मात'
ले. प्रा. नानू लठ्ठे
माझ्या पुस्तकात मी १७६० उपाय सांगितले असून---
श्री. वि. आगाशे

सौजन्य : श्री. वि. आगाशे







सौजन्य : यतिन पाटील














सौजन्य : प्रथमेश सुरेश शिरसाट









सौजन्य : प्रथमेश लोखंडे













सौजन्य : श्रेया रत्नपारखी

# पद्यावली

## माझी मायमराठी

कळेना कसे राजभाषा परि
हि माय सोसे हाल आपल्याच घरी
असे आमुचि हि माय जरि
भिकारिण वाटे आपल्याच दारि

आम्ही लाडके, माजोरडी बालके
करी दुजाभाव हिच्यापरि
वाटतसे लाज आम्हास भारि
जाहलो कृतघ्न तिच्यावरि

असे सोशिक हि मायमराठी
हाल बेहाल जाहली तरि
आम्हास खेळवि अमृतामाजी
लागले प्यावया हलाहल जरि

कसे पांग फेडू कळेना हिचे
आणिले जरि सहस्त्रतारे भुमंडळी
घेऊ शपथ उद्धरावया हिला
नेऊ तिला स्वर्गादपि देवतांमाजी

सौरभ सुधीर परांजपे

## आई

हृदयाच्या राम्यामंदिरात
प्रेमाच्या पिंडीवर,
विश्वाचे पहिले फुल वाहिले
ते आईच्या चरणावर,

आईशिवाय करमेना
आईशिवाय राहवेना,
आई एक असा सुखाचा धागा
ज्याच्याशिवाय जगवेना,

जन्म मिळाला मला
आईच्या कुशीत,
मृत्यूही मिळावा
तो आईच्या कुशीत,

जळत्या दिव्याप्रमाणे
जळत राहते,
मायेच्या शीतल छायेत
प्रेमाचा वर्षाव करत राहते,

मायेचा पदर दिला
विश्वासाची साथ दिली,
स्वाभिमानाची भेट दिली
आत्मविश्वासाची प्रेरणा दिली,

वळण वाकड्या मार्गावर
वटवृक्ष बनून राहते,
दुःखाच्या मार्गावर
मायेची सावली देते,

आईच्या प्रेमळ सावलीत
कायम राहायचे आहे,
तिचे ते व्याकूळ डोळे म्हणतात
तुला माझ्यात सामावून घ्यायचे आहे

रुपाली ताम्हणकर

## कधी कधी आपल नशीबच ख़राब असतं आटलेल्या विहिरिप्रमाणे सगळेच नष्ट वाटतं

जेव्हा काहीतरी कष्टाने मिळू लागत
जवळ जाताच ते आपलं नसल्याचे पटू लागतं
जेव्हा कोणी आपल्याला आपलंस वाटू लागतं
कोणी आपल्या हृदयात अलगद जाऊन बसतं

आपलंसं वाटणाऱ्याला कोणी औरच आपलंसं असतं
आपल्याशाच्या हृदयात कोणी दुसरेच दडलेले असतं

जेव्हा कधी आपण जिंकू असं वाटू लागतं
नंबर १ असल्यासारखा भासु ही लागतं

पाउस पडून मग नशिबावरंच पाणी फिरतं
डकवर्थ-लुईस मुळे कोणी तिसराच बजी मारून जातं

कधी कधी आपलं मन ठरवून काहीतरी करतं
इंटरव्यूला जाऊन समोरच्याला इम्प्रेस देखील करतं
पैसेवालं कोणीतरी मग मागुनच टपकतं
पैश्याने इम्प्रेस करून ऐटित सिलेक्ट होतं

कधीतरी मुश्कीलीने कोणी बिजनेस सुरु करतं
मोठ्या हुशारानी कोणी टेंडरही भरतं
मग पांढरे कपड्यावाल्याचे फोन अचानक वाजतात
अन कॉन्फिडन्सवाल्या आपल्यांचं प्रपोसल क्षणात
रिजेक्ट होतं

कधी कधी आपल नशीबच ख़राब असतं
आटलेल्या विहिरिप्रमाणे सगळेच नष्ट वाटतं .....

प्रणव पटवर्धन

## ही पाल तुरुतुरु, चढी भिंतीवरती हळु

मराठीतील एक प्रसिध्द गाणे
ही चाल तुरुतुरु उडती केस भुरुभुरु डाव्या
डोळ्यावर बट सरली
या चालीवर खालील रचना
---------------------------------
ही पाल तुरुतुरु, चढी भिंतीवरती हळु
वरच्या खिडकीतुन आत सरली !
की उंचावरच्या कप्प्यात, अडगळीच्या जागेत
पालीण सळसळली !!

कोळ्यांशी मैत्री जमव ना !
जाळिशी फिलिंडग लाव ना !
शेपुट वळ वळ कर ना!
डासांवरती झडप घाल ना !
मनी खालुन जाता वरं वळुन पाहाता,
पाल संकटात सापडली !!

उगाच झाडू हाणून !
फवारा हिटचा मारुन !
शेपुट चाचपुन काठीन !
तोंड जरा दाबुन चपलेन !
हा त्रास जिवघेणा , सारा माणसांचा बहाणा,
आता माझी इथली हद्द संपली !!

अमोल केळकर

## सुख

खूप खूप वाटतं केव्हातरी
धावत तुझ्याजवळ जावं
बाहुपाशात घेऊन तुला
सारे जग विसरावं

गतकाळाच्या आठवणींना
पुन्हा एकदा जागवावं
दु:ख सारं सारुन
तुला डोळ्यात साठवावं

आयुष्याच्या संध्याकाळी
बेधुंद होऊन जगावं
उरलेल्या दिवसांसाठी
सुख जरा मागवावं

छेडून अंतरंगाची तार
सुखद स्वप्नांना जागवावं
अलगद शिरुन कुशीत तुझ्या
डोळे मिटून पडावं.

वृषाली वाघे

## इच्छामरण

इच्छामरण असतं तर
बरं झालं असतं देवा
आत्मघाताचं पातक
लागलं नसतं तेव्हा.

त्याला सुद्धा काही
नियम मात्र कर
नाहीतर दु:खी माणसंच
मरतील भराभर

जगण्याच्या दाही दिशा
जेव्हा बंद होतील
इच्छामरणाचा मार्ग
तेव्हा तू उघडशिल.

अपयशातून पळवाटा काढण्यासाठी
हा मार्ग नसावा
एकटं खितपत जगण्यापेक्षा
हा मार्ग असावा.

बघ एकदा विचार करुन
कर्म लिहिणा~या देवा
काहीच नसेल हाती जेव्हा
मरण सुख तर लाभेल तेव्हा.

वृषाली वाघे

## व्यवहार

व्यवहारी जगण्याचे
काटेकोर कायदे असतात
स्वत: भोवतालच्या कुंपणात
माणसे वावरत असतात.

व्यवहारी जगण्यात मात्र
भावना जपायच्या नसतात
आपल्या पुरतीच जगण्याच्या
दिशा ठरवायच्या असतात.

महत्त्व दिले जर भावनांना
तर व्यवहारात फसतात
व्यवहारात फसलेल्यांच्या बाबतीत
भावना कुणालाच नसतात.

भावना जपणारे जगात
खरच वेडे ठरतात
व्यवहारात जो यशस्वी
त्याचं उदो उदो करतात.

पण मृत्युच्या दारात
व्यवहार आठवत नसतात
भावनेच्या नात्यामुळेच
खांदे जाताना मिळतात.

भावनेने व्यवहार करणारे
प्रेमाने जग जिंकतात
कंगाल असूनही ते
सगळ्यात श्रीमंत ठरतात.

वृषाली वाघे

## एका कावळ्याची कविता

एका तळयाच्या काठी । पक्षी होते अनेक ।

स्नान करीत होता । त्यातील फक्त काक ॥धृ॥

पाहूनी जन त्याला । म्हणती जलात बसला ।

कैसा बदल होईल । त्याच्या काळया रंगाला ॥

पाहूनि त्याचे कष्ट । म्हणतील जातिल व्यर्थ ॥१॥

जनातील एक वदला । देऊनी साबू त्याला ।

यत्न करोनी पहा रे । फल येई तयाला ॥

ऐकोनी त्याचे भाष्य । मनी कराल कणव ॥२॥

ऐकूनी त्यांचे सारे । ज्ञानी म्हणवतारे ।

जगी करोनी पापे । कैसा मिळेल मोक्षे ॥

तुम्हा उद्धारयाला । पिंडा करोनी स्पर्श ॥३॥

माथी घेवोनी दोष । शुद्ध कराया चित्त ।

ऐसे वदोनी जला । उडी घाली एकाक्ष ।

ऐकूनी त्याचे बोल । सारे झाले अवाक ॥४॥

अविनाश माईणकर

## पहिला पाऊस

पहाटेच्या वातावरणात
अचानक बदल झाला होता
अंगणातला प्राजक्तही
खुलून आला होता

मेघ दाटून आलेले
अन सूर्य त्या आड लपला होता
साखरझोपेतला मनपक्षीही
स्वच्छंदी आकाश झेपावत होता

कोकीळ गाऊ लागली
मोर नाचू लागले
आळवावरचे थेंबही जणू
मोती भासू लागले

क्षणार्धात पावसाच्या सारी आल्या
ओलसरसा सुगंध मातीचा चहूकडे दरवळला
"येरे येरे पावसा" म्हणता म्हणता
वर्षाचा पहिला पाउस आला...

संचित प्रमोद कुलकर्णी

## दुख वाटते कधी

दुख वाटते कधी कि कविता करायला येत नाही
आणि काही लिहावे म्हटले तर कुणालाच कळत नाही.
दुख वाटते कधी कि समजूतदार पणा आपला कमनशिबी ठरला
एकमेकांना समजून घेण्याचा जमानाच नाही उरला...
दुख वाटते कधी कि आपुलकीची ओढ आता आपल्या लोकांत राहिली नाही
......आणि कुणाबद्दल ओढ वाटावी अशी लोकच आता भेटत नाहीत....

दुखालाही दुख होते आहे कि
कुणालाच आपले दुख कळत नाही
आणि ते कुणाला कळेल अशी आशा सुद्धा वाटत नाही
दुख वाटते आता कि
नात्यांमधला ओलावा संपला,
पैशांच्या मोहाने तोही कोरडा झाला ,
दुख वाटते कि कधी काळाचे मित्र आता बोलणे सुधा होते नाही ,
पण त्यांना सुधा येत असेल का आठवण याचा पत्ताच लागत नाही
मन म्हणत हे सगळे एक विचित्र स्वप्न आहे
आणि
दुख वाटत एवढाच कि कितीही नको असले तरी ते कटू सत्य आहे.
दुख वाटत आता कि हे सत्य पचवणे सोपे नाही,
कितीही खोटे वागायचे म्हटले तरी "तेच नेमके " जमत नाही........

प्रणिता कुलकर्णी

## येशील येशील येशील गाडी

आपल्या लाडक्या लोकलला-
(चाल अरुण दाते यांनी गायलेले -
येशील येशील येशील राणी , पहाटे पहाटे येशील )
-----------------------------------------------------
येशील येशील येशील गाडी वेगात लवकर येशील?
तिकीट काढुन, वेगात पळुन खिडकीची जागा तू देशील !!
येशील येशील येशील--

सकाळची वेळ गर्दी अफाट, फस्ट क्लास मधे जाऊ!
तुला सायडिंगला जरा घालता नको नाराजाने पाहु !
सर्वांना भिडुन, डब्यांना खेचुन मुक्कामी मला तु नेशील !!
येशील येशील येशील--

मेल एक्स्पेस, लाल सिग्नल अडथळा ओव्हरहेडचा !
अडथळा ओव्हरहेडचा !
गर्दीच्या क्षणाचे टायमिंग साधुन रांगेत असंख्य गाड्या !
कल्याण, सायन, दादरकरीत, व्हि टी ला मला तु नेशील !!
येशील येशील येशील---

वाजता पाऊल घेई चाहुल स्टेशन वरचा टि। सी.
कुणा पकडेल, कुणाला सोडेल, मिळता सावज भारी !
मुक्याने व्यवहार झाकुन टाकता, नवीन सुरवात होईल!!

येशील येशील येशील गाडी वेगात लवकर येशील?
तिकीट काढुन, वेगात पळुन खिडकीची जागा तू देशील !!
येशील येशील येशील---

अमोल केळकर

## उमलते फूल

निसर्गातल्या फुला, कळ्यांना
कशाचेच का भान हे नसते
उन्हा, पावसा तोंड देऊनी
स्वत्वासाठी झगडत असते

मनुष्य, प्राणी, इवली पाखरे
सारे त्यांच्यासाठी सारखे
कोणी तोडो वा पायी तुडवो
मनखुलासपणे हसत असते

प्रभात प्रहरी माळी येऊनी
उमलल्या फुलांना नेई खुडूनी
इतर फुलांना म्हणतो हसुनी
जाईन उद्या तुम्हीही घेऊनी

भगवंताच्या चरणावरती
ठेवूनी माथा फुले बोलती
झाडा, वेलींवर जन्मा येऊनी
चरणी आलो या जीवना अंती...

संचित प्रमोद कुलकर्णी

## दुनिया

कुणास येथे वाली दुनिया
कधी कुणाची झाली दुनिया

खंत नसे मज जगण्याची पण..
मरु न देई ,साली दुनिया..

डाव कोणता चालू आता..
चाल वेगळी चाली दुनिया

क्षणभर ये ना रंग भराया..
तुजविण खाली खाली दुनिया

जरा कुठे मी खरे बोललो
अंगावरती आली दुनिया

काय राहीले माझ्या हाती
केली तुझ्या हवाली दुनिया

प्रफ़ुल्ल माणिक भुजाडे

## पैसा

कलियुगात पैसा देव झालाय
स्वार्थापुढे चांगुलपणा हात जोडून
वाकलाय.
पैशापेक्षा नाती असतात महान
असंच बालपणी शिकवलं.
तीच नाती जपायलाही पैसा लागतो.
हे मोठं झाल्यावर उमजलंय.

पैसा असेल जवळ तर
दुर्गुण ही गुण ठरतात
तोच नसेल तर
गुणच तुमचे अवगुण होतात.

प्रेम, भावना, आपुलकी
यांना आता किंमत नाही
भावाना आणि व्यवहार
यांचा मेळ कधी बसलाच नाही.

पैसा असेल वारेमाप
तर दुनिया सलाम करते
कंगाल असाल तुम्ही
तर दुनियाच हलाल करते.

देव सुद्धा आता
श्रीमंतांचं ऐकतो
गरीब भक्ताला त्याच्या
मंदिराबाहेर ठेवतो.

वृषाली वाघे

## जेव्हा अश्रु आटतील ...

मनातली घुसमट
बाहेर कशी येईल ?
जेव्हा अश्रु आटतील...

खळखळणारा आनंद
व्यक्त कसा होईल ?
जेव्हा अश्रु आटतील...

आभाळ एवढ्या
दु:खाचा हंबरडा कसा फुटेल ?
जेव्हा अश्रु आटतील...

ममता आईची
डोळ्यांत कशी तरळेल ?
जेव्हा अश्रु आटतील...

हरल्यावर नवीन जोमाने
पेटुन कोण कसा उठेल ?
जेव्हा अश्रु आटतील...

निरोप देताना जगाचा
काय लोकांची दशा होईल ?
जेव्हा अश्रु आटतील...

प्रथमेश शिरसाट

## पतंग

ठाऊक होते पतंगाला
जळणार मी जरी
तरीही ओढ वाटे तयाला
ज्योतीची भारी.

विचित्र असे दाखला हा
क्षणभंगूर प्रेमाचा
प्रचिति येते याची देखील
वास्तवात तरी.

नसे जरी प्रेम दिव्याचे
पतंगावरी
अमाप प्रिती असे परंतु
पतंग्याच्या उरी.

भेटण्यासाठी आतुर होई
मन पतंगाचे
करी प्रेम याचना तो
फिरुनी ज्योतीवरी.

क्षण असे मिलानाचा
रोमांचकारी
कवटाळूनी मरणाला तो
आपले जीवन हारी.

वृषाली वाघे

## सांग सजणा

अनमोल भेट ही तुझी नी माझी
सांग सजणा स्मरेल ना
ताटातूट ही तुझी नी माझी
फार काळची नसेल ना ?

परतीच्या वाटेवरती सजणा
मागे वळून पाहशील का
कवेत घेऊन अलगद मजला
अधर माझे चुंबशील ना ?

स्पर्शुनी जाता तनूस वारा
स्पर्श माझा भासेल का
जागवलेल्या सुंदर रात्री
पुन्हा स्मरुनी जागशील ना ?

संजोग हा मिलानाचा
सांग तु जपशील का
चांदण्याच्या शितल रात्री
स्वप्नात माझ्या येशील ना ?

अधिरता ही मिलनाची
तशीच तेव्हा असेल का
श्वासात तुझ्या कुठेतरी
गंध माझा असेल ना ?

वृषाली वाघे

## प्रेम

प्रेम हे नकळत होत
ते कराव लागत नाही,
प्रेम आपोआप होत
त्याला काही अट नाही,

प्रेम शब्दांनी व्यक्त होत नाही
त्याला भावनेची जोड असते,
आसुसलेल्या डोळ्यांना
नजरेची ओढ असते,

प्रेम.. एक भावनेचा झोका
जो भावनेवर झुलतो,
जो प्रीतीच्या आनंदात
हृदयात झोके घेत राहतो,

प्रेम हे रेशिमगाठींनी बनत
त्यात दोन हृदये बंधतात,
प्रेमळ मनांची स्पंदने
आपोआप जुळतात,

प्रेमाच्या वाटेत
एक वादळवाट असते,
जी काहींना सोडते
तर काहींना अडवते,

प्रेम एक असा महासागर आहे
जो सगळेच पार करत नाही,
काही यशस्वी होतात, ...तर
काहींना किनाराही लाभत नाही.

रुपाली ताम्हणकर

## एक न सुरु झालेली प्रेमकहाणी

त्याला ती खुप आवडायची
नेहमीच त्याला घाई तिला भेटायला जायची
ति असताना तिलाच बघण
ति नसताना तिच्या आठवणीत हरवण

तो तिला जीवापाड प्रेम करायचा
पण तिला सांगायला नेहमी घाबरायचा
ती हि रोज त्याला भेटायची
मनातल्या गुज गोष्टि त्याला सांगायची

तिला काय आवडत, तो आवर्जुन लक्षात ठेवायचा
तिला आवडत म्हणुन रोज एक गुलाब आणायचा
आज तिला विचारणार, तो नेहमी ठरवायचा
रोज मनाच्या पाटिवर हाच धडा गिरवायचा

एक दिवस ठरवले त्याने आज फैसला करायचा
आज मनातील भावनांना मार्ग मोकळा करायचा
तो गेला नेहमीच्या ठिकाणी भेटायला
हजारो गुलांबाचा गुच्छ त्याच्या साथीला

आज कशी नाहि आलि, एवढा वेळ झाला तरि
हुरहुर लागली त्याच्या जीवाला कितीतरी
मनात विचाऱांचा काहुर माझला
जणु त्याच्यासाठि काळच थांबला

ती बसायची नेहमी जिथे त्याच्याशी बोलताना
सहज लक्ष गेले तिथे, तिला आठवताना
होती एक चिट्ठी वजा कागद तिथे
नाव त्याचे होते चिठ्ठिवर, तो गेला तिथे

वाचताना चिठ्ठी, अश्रुंनी कागद हि भिजला
नव्हती आता ती ह्या जगात,जिच्यासाठि तो एवढा झिझला
" मला तु आवडतोस हे तुला कधी कळणार नाहि"
प्रीत माझ्या मनाचि तुज्या मनी कधीच रूळणार नाहि

वाचुन तो मजकूर, त्याच्या भावनांनाहि पुर आला
ती आता ह्या जगात नाहि,काळ हा कसा कृर आला
अजुन हि तो तिथेच तिच्या आठवणीत वावरतो
ती पुन्हा इथेच येणार आहे, मला सांगतो

निलेश चव्हाण

## तुझी प्रीत माझ्या ओठी

एका सुखाच्या धाग्यात
गुंफल्या रेशीम गाठी,
भेट बनुनी आली
तुझी प्रीत माझ्या ओठी,

मनाच्या गाभाऱ्यात झोका घेऊन आली
बेधुंद मनाची लहर,
प्रथम भेटीची आठवली
ती सांजवेडी प्रहर,

आठवतो तो नाजूक स्पर्श
हळुवार पणे मिठीत घेण्याचा,
माझ्या ओठांवरील थेंब
तुझ्या ओठांनी टिपण्याचा,

माझे नयन उत्सुक आहेत
तुझ्या डोळ्यांत बुडण्यासाठी,
भेट बनुनी आली
तुझी प्रीत माझ्या ओठी..

रुपाली ताम्हणकर

## प्रेमाचा क्लास

प्रेम कसे करावे याचाहि एक क्लास असावा.
उजळणी झाल्यावर प्रात्यक्षिक करण्यासाठी खास एक तास असावा.

क्लासमधील सर्व मुली नेहमी माझ्या आसपास असाव्या.
गोपिकाना कृष्णाचा तसा त्याना माझा ध्यास असावा.

शिकवणा-या बाई पण मुलींएवढ्या खास असाव्या.
वर्ग पूर्ण सजवलेला अत्तराचा मंद सुवास असावा.

तीस दिवसांऐवजी पूर्ण शंभर दिवसांचा मास असावा.
कायम मात्र तीथे देखण्या पोरींचाच सहवास असावा.

प्रेमाच्या या शाळेमधील प्रत्येक विद्ध्यार्थी पास असावा.
चुकून झालाच नापास तर ए. टि. के. टि. चा पण 'पास' असावा.

माझ्या या क्लासचा ईतर कुणाही वास नसावा.
लागलाच जर सुगावा तर त्याकडुन मज त्रास नसावा.

मनी वाटते खरच असा एखादा क्लास असावा.
तीथे फक्त प्रेम आणि प्रेमाचाच अट्टाहास असावा.
प्रत्येकाच्या मनी असाच एखादा आस असावा.

अभिषेक कांबळी

## तू नाजुक अशी झुळूक वारयाची !

तुझी आणि माझी मैत्री याला म्हणाव तरी काय ?
खरी मैत्री, खोटी मैत्री मी म्हणु तरी काय ?

तू नाजुक अशी झुळूक वारयाची!
क्षणात होउन जाई तू सारयाची,
हवेमध्ये जसा सुगंध दरवळावा
माझ्यासाठी तुझा स्वभाव हरवळावा.

माझ्या आयुष्यात तुझ येण-जाण
जस लाटेच किनारयावरुन जाण-येण,
किनारयाला लाटेची जाशी आस असते
तिच आस माझ्या मनाच्या पास असते.

चंद्राला जसा चांदण्याचा पहारा असतो
तसाच माझ्या मनाला तुझा सहारा असतो ,
चांदन्यानी चंद्राची साथ सोडावी असा कोणताच क्षण नाही
आपल्या मैत्रीत चढ़-उतार व्हावा असा कोणताच पण नाही

नितीन पांडुरंग धिवार

## वे द ने ची संवेदना ..

एवढे आले की मज दु:ख आवडाया लागले
अन् सुखाचे मग वावडे वाटाया लागले (१)

रोज मी वेदनेला कुरवाळाया लागलो
अन् तिच्यासाठी जखमाही उकराया लागलो (२)

वेदना शमताच पुन्हा जागवाया लागलो
वेदनेला रोमरोमात भिनवाया लागलो (३)

वेदनेची वासना जेव्हा वाढावया लागली
परमेश्वराकडे वेदनेची कामना कराया लागलो (४)

सुख अव्हेरुन वेदना कवटाळाया लागलो
शृंगारासम वेदना भोगावया लागलो (५)

वेदनेच्या नसण्याने व्याकुळ व्हाया लागलो
प्रार्थनेत ही वेदनेची याचना कराया लागलो (६)

वेदनेच्या संवेदनेने बेभान व्हाया लागलो
वेदनेचे हलाहल लिलया पचवाया लागलो (७)

वेदनेच्या धुंदित जेव्हा झिंगाया लागलो
मदिरेसम वेदना तेव्हा प्यावया लागलो (८)

फ़क्त वेदनाचं शाश्वत मानावया लागलो
वेदना सखी-सोबती सर्वां सांगावया लागलो (९)

वेदना अमुल्य/अलौकिक मानावया लागलो
वेदनेला इतरांपासुन लपवाया लागलो (१०)

दुसरयांच्या वेदनेची आस धराया लागलो
त्यांच्या वेदनेला (ही) आपली मानावया लागलो (११)

सौरभ सुधीर परांजपे

## देवा ...

मी अंधारात असतो तेंव्हा
तुझ्याकडे प्रकाशाची मागणी करतो
तू तो मला द्यावास म्हणून
मी हर तऱ्हेचे प्रयत्न करतो
पण तूझं माझ्या कडे लक्षच नसतं...
तू माझ्या हाकेला ओ देत नाहीस
म्हणून मी शेवटी रडत खुडत
माझ्या झोपडीच्या अंधारात निराश होऊन वापस जातो
अन अचानक,एक दिवशी
माझ्या झोपडीच्या दारात मला 'सूर्य' दिसतो.

तेंव्हा मला आठवण येते की, अरे!
मी तर फक्त एका पणतीचीच अपेक्षा ठेवलेली होती !

मला जेंव्हा हवं असतं तेंव्हा तू मला कधीच
देत नाहीस, कारण मला जीवघेणी निकड असताना
मी माझी ओंजळ लहान केलेली असते.
पण तुला मात्र भरपूर द्यायचं असतं,
म्हणून मी हात मागे घेण्याची तू वाट पाहतोस.

अन मग जेव्हा तू देण्यासाठी हात पुढे करतोस
मला माझी झोळी अपुरी पडते.

प्रियाल वेदपाठक

## अनेक होत्या

आठवणींचा तुझ्या नव्हता कुठेचं तोटा
ह्रदयास जाळणा-या ज्वाला अनेक होत्या (१)

सांभाळू कसा "मी" समाधीस माझ्या
पडद्यावर नाचणा-या मेनका अनेक होत्या (२)

आयुष्य संपवावे वाटले परंतु,जगण्यास
लावणा-या इच्छा अनेक होत्या (३)

बहकणा-या यौवनात साधाच राहिलो "मी"
नादास लावणा-या वासना अनेक होत्या (४)

का? कसा? कशाला? भेदभाव करू "मी"
सर्वश्रेष्ठ माझ्या रचना अनेक होत्या (५)

लपवू कसे लावंण्यास माझ्या, रस्तावर
वखवखणा-या नजरा अनेक होत्या (६)

कसे कळेना श्वापदांनी साधला डाव,वस्तित
गस्तिच्या चौक्या अनेक होत्या (७)

सौरभ सुधीर परांजपे

## नव वधु वरास ...

प्रथम वंदुया गणरायाला ।
आरंभ करुया शुभ कार्याला ।
निवेदिता नववधु ही सजली ।
गाली जणु गुलाबकळी खुलली ।

अचानक - नजरा नजर जाहली ।
"तन्मया" पाहूनी तन्मय झाली ।
मार्गशीर्ष नवमी खास ही आली ।
शुभाशीष देण्यास उत्सुक जाहली ।

मठ मांगिरिषि "ती" विवाहबद्ध झाली ।
आप्तमंडळी अति धन्य जाहली ।
सुशील सुंदर सुविद्य पत्नी ।
भुलला पतिपरमेश्वर तिज पाहूनी ।

मुलांनो,

लग्न सोहळा हा दोन दिसांचा ।
संसार बहुवर्षांचा करा सुखाचा ।
कधी पाऊस, वारा येतो
देऊ नका अंतर...
जीवनाचा हाच खरा मंतर ।

कष्ट करा, काम करा, हसत रहा ।
वडीलमंडळींसही जपत रहा ।
मंगलाष्टके म्हणती,
"शुभ मंगल सावधान"
सज्जन सांगती
सदा रहावे सावधान ।
मग मिळे सदा समाधान ।

निर्मला कलंबी

## पाहिले मी तिला मला पहाताना

पाहिले मी तिला
मला पहाताना
लेक्चर बुडवून कँटीनमधे
वाट माझी बघताना

पाहिले मी तिला
मला पहाताना
फोनवर मी बोलत असता
कासाविस होताना

पाहिले मी तिला
मला पहाताना
नेहमीची वाट चुकवून
घरासमोरून माझ्या जाताना

पाहिले मी तिला
मला पहाताना
मोनिटरच्या ब्लँक स्क्रीनवरुन
मला शोधताना

पाहिले मी तिला
मला पहाताना
सामोरी मी जाता
बोलता बोलता गप्प होताना

पाहिले मी तिला
मला पहाताना
निरोपाची वेळ येता
हळवी होताना

पाहिले मी तिला
मला पहाताना
जाता जाता परत परत
मागे वळून बघताना

प्रणव पटवर्धन

## जीवन

जीवनाच्या प्रवाहात
अनेक माणसं भेटतात,
काही आपल्याला साथ देतात
काही सांडून जातात

काही दोन पावलेच चालतात,
आणि कायमची लक्षात राहतात,
काही साथ देण्याची हमी देऊन,
गर्दीत हरवून जातात.

नाती जपता जपता तुटणार
नवीन नाती जुळत राहणार,
आयुष्य म्हटले तर,
हा प्रवाह असाच चालत राहणार

पण् कुणी दूर गेले तर
जगणेही थांबवता येत नाही,
कारण ह्या अथांग सागरात
एकटे पोहताही येत नाही..

अमित पारठे

## रुसलेल्या सखे आता परत ये, माफ़ मला करून..

खुप काळ लोटला अता आपल्याला भेटून
भेटशील क गं एकदा अता खरच मनापासून

रोज जेव्हा जाते 'ती' बस माझ्या समोरून
फक्त तुझ्याच आठवणिंनी मग, काळीज येते भरून

रडता तरी येते तुजला, जेव्हा जिव येतो भरून
आसवेच सुकली आहेत अता, तेव्हा घेतो मी मनातल्याच मनात रडून

थकलो आहे अता मी , फक्त स्वप्न तुझी बघून ...
वास्तवात समोरी ये अता,रहावत नाही तुजविना म्हणुन

चुकलो असेल मी तेव्हा नक्कीच नाही मुद्दामून
झाले ते पुरे झाले, खुप काळ झाला अता विरह 'तो' सहन करून

उन्हाला संपल्यावर पण शांत होते धरणी पाउस पडून
रुसलेल्या सखे आता परत ये, माफ़ मला करून..
रुसलेल्या सखे आता परत ये, माफ़ मला करून..

प्रणव पटवर्धन

## सांग ना परत येशील का ???

तुझ्या आठवणीत अडकलेले क्षण काही
पुन्हा नव्याने डोळ्यासमोर आले
पण तू मात्र अजून तिथेच का ???.........
सांग ना तू हि परत येशील का ???

माझ्या डोळ्यांत पाहताना तू थोडीशी घाबरली होतीस
सर्वांची नजर चुकवून तू हळूच मला पाहत होतीस,
पण भेटशील जेव्हा पुन्हा सखे..
परत तीच झलक दाखवशील का ???....
सांग ना परत येशील का ???

तुझ्याशी बोलताना मनात चाललेले विचारांचे काहूर
फक्त तुझ्या स्मित हसण्याने गेले सगळे विचारायचे राहून
आता तरी त्यांची उत्तरे मिळतील का???....
सांग ना परत येशील का ???

आजही तुझ्या आठवणींचा गंध मनात दरवळतो आहे
जणू काही तो मला तुझ्या येण्याची चाहूल देतो आहे
प्रेमात तुझ्या चिंब होवून नाचावे
अखेरचे हे स्वप्न माझे आता पूर्ण करशील का??? ...
सांग ना परत येशील का???

अमित पारठे

## आकाशातले प्रतिबिंब

आकाशातले प्रतिबिंब, अगदी जागते (चालते-फिरते)
सहज बदलतात हावभाव चेह-यावरचे,
थांब सांगितले की थांबते, पहावे परत-परत
फिरुन पुन्हा त्याच जागी येते.
सौंदर्याचा कस लागतो, आरशासमोर
पहात रहावे स्वत:ला स्वत:शीच बोलावे
मैत्री होते आपलीच आपल्याशी.

विदेशातून पक्षांचे थवे अवतरले
धरणीवरती हिरवे, तांबडे विविध रंगी
दिसतात दृश्ये हिरे-माणिकांसारखी
वेळ थांबून पहावी तर अलगद यान उतरले
पक्षांचे वेगळेपण पाण्याच्या जागी स्पष्ट दिसते.

रंगबिरंगी फुलांचा ताटवा
सडा शिंपला प्राजक्ताने
बकुळ उमलली दरवळ घेऊन
चहुबाजूंना अडवले, थांबले आज
पाय एका जागी नव्या ऋतुंच्या
आगमनासाठी फुलांचे रंग सर्वत्र पसरले.

नव्या वर्षात एखादे स्वप्न
जाणत्या दिशांना ऋतूंची
मिळाली सोबत, थांबून पाहीले
अर्थासह उलगडले
काल काय आले होते स्वप्नात.

उलगडले असे प्रश्न आणि उत्तरे
आरशातले प्रतिबिंब का होते हलणारे
थांबून त्या पाहीले
माझेच मला उलगडले नव्या दिशा, नव्या वाटा
पाहून अचानक प्रतिबिंबच नुसते राहीले.

आरशातून फक्त प्रतिबिंब दिसते
वास्तवाशी थोडे जाताना जवळ
अंधारातून प्रकाशाकडे वाट दिसते
समोर पाहिल्यावर.

कादंबरी अमोल करकरे
टंकलेखन : शारदा परेलकर

## छोट्या कविता / चारोळ्या

विष्णुपत्नी पृथ्वीसारख फिरावं
अखंड - अविरत - सातत्यान फिरावं
समुद्राची धवल वस्त्र नेसून फिरावं
निर्मल जल संसाधनांना घेवून फिरावं
अब्जावधी लेकरे खेळवत फिरावं
ज्वालामुखीचा लाव्हा गिळून फिरावं
चंद्राच्या शीतलतेसोबत फिरावं
चांदण्यांची बरसात अनुभवत फिरावं
स्वत:सोबत फिरता फिरता सूर्याभोवती फिरावं
दोघांच्या मैत्रीत सुरक्षित अंतर ठेवून फिरावं
सूर्यान पृथ्वीच्या लेकरांना प्रकाशित करावं
अन लेकरांनी सूर्याला भल्या पहाटे पुजावं !!

✍ विशाखा समीर मशानकर

---

एकटाच माणूस येतो
अन एकटाच जातो
केलेल्या कार्याने
अमर सदा राहतो

श्रीमंताच्या गरीबीत
रुपड्याला किंमत नाही
गरीबाच्या श्रीमंतीत
कमनशीबी रुपड्याच नाही

परिसाची थोरवी भावली
लोखंडास स्पर्शाने करी सोने
लोखंडाची वृत्ती भावली

परिसाचा मुद्दाम स्पर्श करवणे
डोळ्यांत डब्बकी घेऊन
सांगत होती ती काही
डराव डराव करणारी
बेडके पाण्यातच राही

✍ प्रथमेश शिरसाट

---

मायबोली,
मराठी असे आमची मायबोली,
जरी ती मराठी तरी ना कळली
असे "dad "आम्हा नसे "बाप" कोणी ,
अन "आईविना" एक आम्हास "mummy "
"न्याहारी" नसे रोज "नाश्ताच" घेतो,
..."life tention "ने मग दोन "पेग" चढवतो .
सतावी कधी ना "अभ्यास " आम्हा ,
"study pressure " ने परी आम्ही त्रस्त होतो.
असे "रूम" माझी नसे तीच "खोली "
असे "फ्रेंड्स" आम्हा नसे "मित्र " कोणी..
रुळू लागली हो मुखी मायबोली.

---

माणसाने उंचच उंच इमारती बांधल्या खऱ्या
पण "घर" बनवायचं विसरून गेला.....

मोठ्या जागेत राहताना मात्र
मनाचा मोठेपणा हरवून गेला

---

आयुष्य कधी कधी अस का असते ?
सुरळीत चाललेले असताना
मध्येच का
थांबते?
कळत नाही त्या क्षणी नेमके कसे वागायचे?
...काहीतरी घडवण्याचा
विचार करायचा
कि काहीतरी घडेल याची वाट बघायची ?
आपण जागीच थांबतो पण
वेळ मात्र निघून जाते ,
आणि त्या धावत्या वेळेतच काहीतरी घडून जाते.
हे
नेमके तेच घडते ज्याची वाट बघायची असते.

✍ प्रणिता कुलकर्णी

तिन्ही सांजेला
ऐन मौसमातल्या,
बहरांच्या आठवणी
विसरु म्हटलं तरी,
विसरायला नाही होत...
अन-मग-
उदासवानी संध्याकाळ मनभर रेंगाळते-
एक एक बहर पुसत-
गडद होउन!

गोविंद कुलकर्णी

पहिल्यांदा तू हसलीस
तेव्हाच माझ्या मनात भरलीस....
पण स्वप्न रंगायच्या आधीच
माझ्या आयुष्यातून तू दूर निघून गेलीस.....

---

आज सांगावे की उद्या सांगावे
त्यात वर्षे केव्हाच निघून गेली
.....वाटेत भेटलीस आणि हसलीस
तुझी खट्याळ मुल मला"मामा"म्हणून गेली......

---

तुंडुंब भरलेल्या उदराला
झोपेची नशा होती
उष्टी -खरख्व्यात अन्न शोधताना
गरिबीची "दशा"होती....

---

प्रत्येक वेळी भेटायचं आणि
प्रेमाविषयी बोलायचं
भेटण्याची वेळ संपली की
मुकाट्याने घरी जायचं

---


बागेत पानांचा सळ-सळ आवाज झाला
वाटल तू आलीस......
अजून विश्वास वाटत नाही
तू माझ्या जीवनातून गेलीस......


मंगेश धोंडी गावडे



अस्सल मैत्री
जीवनपुष्प......
फुले शिकवतात.....,
गुलाब सांगतो,
येता-जाता रडायचं नसतं,
काट्यात सुध्दा हसायचं असतं;
रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायचं नसतं,
काळोख्यातही फुलायचं असतं;
सदाफुली सांगते,
रूसून रूसून राहायचं नसतं,
हसून हसून हसायचं असतं;
बकुळी म्हणते,
सावळ्या रंगाने हिरमुसायचे नसतं,
गुणाच्या गंधाने जिंकायचं असतं;
मोगरा म्हणतो,
स्वत:चा बडेजावपणा सांगायचा नसतो,
सद्गुणांचा सुगंध मैलावरून ही येतो;
कमळ म्हणतो,
संकटात चिखलात बुडायचं नसतं,
संकटाना बुडवून फुलायचं असतं.
गिरीष महाजन



आग्रह तुझा . . .
आग्रह तुझा फार होता,
म्हणुन तोल माझा जात होता,
वाटले पडताना तु सावरशील,
माझ्या भावनांना तु आवरशील,
पण आवरणे नव्हे, सावरणं नव्हे,
तर पाडणे हाच तुझा उद्देश होता,
शब्द प्रत्येक खरा वाटत होता,
म्हणुनच स्वप्नात संसार मांडला होता,
पण हसुन एक दिवस तुच म्हणालीस,
विसर वेड्या हा तर टाइमपास होता.
अतुल देखणे



कविता केव्हा जन्म घेते..?
जेव्हा...
काळजाला होतात वेदना..
डोळ्यांतून वाहतात संवेदना..
अन्...
शब्दांना होते प्रसववेदना..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
जेव्हा...
दडून येतो उर..
भावनांचा वाहतो पूर..
अन्...
मनी लगते हूरहूर..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
जेव्हा...
वेदनेतून निघतात सूर..
दैवत्व मिळवतात असूर..
अन्...
शब्दांचे उठते काहूर..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
जेव्हा...
नात्यांचे बंध तुटतात..
हात हातातून सुटतात..
अन्...
अस्तित्वाचे प्रश्न उठतात..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
जेव्हा...
सर्वांच्या डोळ्यांत ममता दिसते..
बुरसटलेल्या समाजात समता दिसते..
अन्...
चहूंकडे प्रसन्नता दिसते..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
-रणजित-
जेव्हा..
अन्याय अत्याचाराचा वाढतो चिखल..
गुन्हे, बलात्कार, दरोड्यांचा वाढतो मल..
अन्...
कुणीच घेत नाही यांची दखल..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
जेव्हा...
कुणी प्रेमात असतो..
कुणी कुणाच्या प्रेमात फसतो..
अन्...
कुणी कुणाचा कुणीच नसतो..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
जेव्हा..
पांगळा चालू लागतो..
बहीरा धुंदित डोलू लागतो..
अन्...
मुका मोठ्याने बोलू लागतो..
तेव्हा...
जन्म घेते कविता.
जेव्हा...
कुणी निरागस जन्म घेतो..
कुणी अनंतात विलीन होतो..
अन्...
कुणी नियतीचा खेळ होतो..
तेव्हा...
जन्म घेते कविता.


मुसळधार पावसात कोरडाच मी भिजतो
दरवर्षी बरसत्या रिमझिम सरींत
यथेच्छ ओले चिंब होण्याचा आनंद मी घेतो
टीप टीप पाण्यात नाचून
मुसळधार पावसात कोरडाच मी भिजतो
कागदी होड्या पाण्यात सोडण्याची ती
आगळीच गम्मत जम्मत मनोमनीच साठवतो
इंद्रधनुष्य भला मोठा इथूनच मला दिसतो
मुसळधार पावसात कोरडाच मी भिजतो
मनमुग्द उडणारी फुलपाखरे आणिक
कडकडाट विजांचा नुसताच मी अनुभवतो
गंध मातीचा मनी कायम तो दरवळतो
मुसळधार पावसात कोरडाच मी भिजतो
माझ्याच वयाची मुले स्वच्छंदपणे
त्या पावसात बागडताना मला दिसतात
त्यांच्याबरोबर हुंदडण्याचे स्वप्न बाळगून मनी
मुसळधार पावसात कोरडाच मी भिजतो
बाहेर जाऊन भिजण्यासाठी उठण्याचा प्रयत्न मी करतो
नजर वळते पायांकडे अन मग
चाकाच्या गाडीवर बसूनच मी खिडकीतून बघतो सारे काही
मुसळधार पावसात कोरडाच मी भिजतो
कवि
प्रथमेश सुरेश शिरसाट


|| मस्तानी आणी बाजी ||
बाजी भरला तीच्या मनात
जेव्हा पाहिलं तिने त्याला रणात
तोही भाळला मस्तानीवरी
पाहून तिची नजर करारी
पाहूनं ते तेज रूप
आला बाजीसही हूरुप
तळपती त्याची समशेर
होता शाहूंचा तो सव्वाशेर
काय वर्णावा तिचा तो नूरं
बघताच काळजात माजे काहूरं
जाता बाजी रणा वरं
मस्तानीस लागे हूरं हूरं
नव्हते का जगास
अस्तित्व दोघांचे राजी
तरी राहीले नाव अमर त्यांचे
मस्तानी आणी बाजी......!
कविश्वर
http://kavishwar.blogspot.com


सांग सख्ये कसं करू कौतुक तुझं...
सांग सख्ये कसं करू कौतुक तुझं, ही अशी कवीता असताना,
अशीच आहेस तु, तशीच आहेस तु, कसं लीहु समोर तु नसताना... .
आठवतो तेव्हा तुला ... रमणीय काव्य लिहिताना,
पाहतो तेव्हा तुला... रिमझिम पाऊस झेलताना
मन माझं आतुर असतं वाट तुझी पाहताना,
नेमकी तु येत नाहीस अशीच वेळ असताना...
सांग सख्ये कसं करू कौतुक तुझं, ही अशी कवीता असताना...
सांगायचं आहे मला तृप्त तुझ्या या ओठांना,
जाणायचं आहे मला गुप्त तुझ्या या हृदयाला
फुगवलेल्या या गालांना गोड गुलाबी हसताना,
पाहायचं आहे मला तु माझ्या सोबत असताना...
सांग सख्ये कसं करू कौतुक तुझं, ही अशी कवीता असताना...
जाणशील तुच एक दिवस . . पाहशील सुद्धा तुच एक दिवस...
प्रेमाची ही रिमझिम वर्षा एक अतूल-नीय कृत्य करताना... आणी,
सांग सख्ये कसं करू कौतुक तुझं, ही अशी कवीता असताना,
अशीच आहेस तु, तशीच आहेस तु, कसं लीहु समोर तु नसताना... .
अतुल देखणे


"स्वागत"
अपमानाच शल्य कितिदा गिळायच?
गढुळलेल्या मैत्रिला कितिदा सावरायच?
तुटलेल्या ऋणानुबंधनांना कितीदा आवळायच?
त्याच त्याच घडामोडिना कितीदा सामोर जायच?
पाठोपाठ होणारया मनस्तापानी कितिदा तापायाच?
बघता बघता गुलाबी मस्तक अवघ रक्ताळलय,
त्याच रक्ताचा टिट लाऊन आतातरी मुसँडी मार,
होरपळलेल्या मना आतातरी पेटून उठ
दिलदारवृत्तीचा तुझ्या बाजार मांडण सोड
अहिंसेच्या लक्तरान सामर्थ्य झाकण सोड
अपमान गिळण्यापेक्षा ताठरपणा शिक
सारवासारवीपेक्षा नवे रुणानुबन्ध जोड
तोचतोचपणा सारुन नव्यान घडायला शिक
स्वागत करतय साम्राज्य तुझ्या अभंग यत्नाच
स्वागत करतय साम्राज्य तुझ्या असीम अस्तित्वाच
स्वागत करतय साम्राज्य तुझ्या मुक्त श्वासाच!!
- विशाखा


पुन्हा
भेट
पुढल्या वर्षी
तोपर्यंत
लोभ
असावा...